

**''वेष देख मत भूलिए ।**
**पूछ लिजिए ज्ञान ॥**
**मोल करो तलवार का ॥**
**पडा रहने दो म्यान ॥**

ते व्यक्तिगत नामस्मरण चिंतन करणारे पक्के ज्ञानमार्गी होते. कबीर एकांतात बसून आपल्या भक्तांना, शिष्यांना स्वत:च्या अंत:करणातील परमेश्वराला ओळखण्याचे आवाहन करीत. त्यांच्या मतानुसार भक्तीमध्ये संपूर्ण त्यागाची आवश्यकता असते. विविध मार्गाने परमेश्वर भक्ताची सत्त्वपरीक्षा घेत असतो. ईश्वर भक्ती ही निष्काम असली पाहिजे.

## गुरूला देवापेक्षा मोठे स्थान

संत कबीरांनी आपल्या जीवनात गुरुला अत्युच्च स्थान दिले आहे. त्यांच्या मतानुसार 'गुरू हा खरा मार्गदर्शक, ज्ञान देणारा, परमेश्वर रुपी असतो. गुरूच्याच मार्गदर्शनाने आपण भवसागर पार करून, यशस्वी जीवनाची वाटचाल करू शकतो. तसेच परमेश्वराची प्राप्ती करून शकतो. कबीर शिष्यांना सांगतात :-

**''गुरु और गोविंद (ईश्वर) दोनो खडे ।**
**काके लागौ पाय ॥'' (पाया पडणे)**

परंतु संत कबीरांनी प्रथम गुरुलाच वंदन केले. कारण गुरुच्याच मार्गदर्शनामुळे त्यांना परमेश्वराची प्राप्ती झाली होती.

गुरुकृपेशिवाय परमार्थात योग्य स्थान गाठता येणार नाही. या कबीराच्या म्हणण्याला ज्ञानेश्वरांच्या खालील ओव्यांवरून पाठिंबाच मिळतो - ते म्हणतात - ''गुरुद्वारा पाविजे ज्ञान । तेथे ईश्वराचा आभार कोण । येथ ईश्वरकृपेवीण । सद्गुरु जाण भेटेना ॥''

## मृतदेहाची फुले झाली

संतकबीराचे हिंदु-मुस्लिम असे दोन्ही धर्माचे बहुसंख्य शिष्य होते, शिवाय ते स्वत:ला विशिष्ठ धर्माचे, पंथाचे मानीत नव्हते. श्री साई बाबांचे सुद्धा सर्व धर्मीयांमध्ये असंख्य भक्त आहेत. कारण दोघांनीही प्रथमपासुन **''राम-रहीम एक है । सबका मालिक एक है ।''** हे त्रिकाल बाधित सत्य आपल्या प्रवचनातून काव्यातून व आचरणातून लोकांच्या मनावर इतके ठसविले, तरीसुद्धा देहान्त झाल्यावर त्यांच्या हिंदु-मुस्लिम शिष्यांमध्ये त्यांचा अंत्यविधी कोणत्या धर्माप्रमाणे करावा, या बद्दल वाद उत्पन्न झाला व भांडणे सुरु झाली.

एका मध्यस्थामार्फत भांडणे मिटविण्यासाठी त्यांनी देहावरील चादर दूर केली, तेव्हा त्यांच्या मृत शरीराऐवजी त्याठिकाणी गुलाबाची फुले विखुलरलेली दिसली.

संत कबीर हे रामाचे इतके नि:स्सीम भक्त होते की, प्रत्यक्ष राम त्यांच्या हातमागावर बसून कपडे विणीत असे, असे म्हणतात :

**'कबीराचे विणतो शेले । बाई घन:श्याम ॥**
**कौसल्येचा राम, बाई कौसल्येचा राम ॥**

संत कबीर' हे रहस्यवादी संत म्हणवीत असत. संपूर्ण विश्वामध्ये ते फक्त आपल्या प्रियतमाचा (ईश्वराचा) प्रकाशच पाहतात, जसे: -

लाली मेरे लाल की ।
जहाँ देखो वहाँ लाल ॥
लाली देखने मैं गई ।
मैं भी हो गई लाल ॥

ते जास्त शिकलेले नव्हते, परंतु त्यांनी आपल्या खडीबोली ग्रामीण भाषेतील दोह्यातून खेड्यातील अज्ञानी, अंधश्रद्धाळू लोकांना रोजच्या व्यवहारातील साध्या साध्या उदाहरणाद्वारा आपले म्हणणे पटवून दिले, ते म्हणतात :

**''सुख में सुमिरण ना किया ।**
**दु:ख में किया याद (स्मरण) ।**
**कहे कबीर दास की ।**
**कौन सुने फरियाद ॥**

त्यांच्या मतानुसार संपत्ती आणि कामिनी (स्त्री) या दोन्ही गोष्टी आत्म्याचा परमात्म्याशी संयोग होऊ देत नाहीत. मोक्ष प्राप्तीमध्ये त्यांचा मोठा अडथळा होतो, म्हणून ते सांगतात :-

**''माया के झरब जग जरै ।**
**कनक (पैसा) कामिनी लागी ॥**
**'कबीर इससे बचिऐ ।**
**रुई (कापूस) लपेटी आगी ॥**

संत कबीरांना छंद-भाषा-अलंकार इत्यादि गोष्टीचे ज्ञान नव्हते, तरी सुद्धा आपले म्हणणे, संसारिक जीवनाच्या अनुभवामुळे, सोप्या भाषेत व्यावहारिक उदाहरणाद्वारा पटवून देण्याच्या अप्रतिम कौशल्या त्यामुळे त्यांची काव्यरचना, इतर संताच्या काव्याइतकीच, रसाळ प्रासादिक व हृदयस्पर्शी झाली आहे.

卐 卐 卐

### सुविचार

**सामर्थ्य आहे सत्यनिष्ठेचे ।**
**असेल जयापाशी तयाचे ।**
**ह्याचे चि नाव व भगवंताचे ।**
**अधिष्ठान ॥**

**- विनोबा**

# गुरु आणि सद्‌गुरु

– चं. प. भिशीकर

**आपल्या भारतीय संस्कृतीने माता–पिता एवढेच गुरुला अग्रक्रमाचे पूजनीय स्थान दिलेले आहे. ईश्वराशी नित्यसंवाद करणाऱ्या बालभक्त नामदेव महाराजांनाही मुक्ताई गुरूचे महत्त्व पटवून देते. विसोबा खेचर यांना ते गुरु करतात. यावरुन गुरु हे ईश्वरप्राप्तीचे केवळ एक साधन नव्हे तर त्यापेक्षाही गुरूचा महिमा अगाध आहे.**

**पुणे तरुण भारतचे भूतपूर्व संपादक, संत साहित्याचे एक नामवंत चिंतक श्री भिशीकर यांचे गुरु महात्म्य विषयक निरुपण –**

सामान्य लौकिक व्यवहारातून आता गुरू आणि शिष्य हे शब्द हद्दपार होत आहेत. 'आमच्या आचार्यांनी किंवा गुरुवर्यांनी' असे म्हणण्याऐवजी 'आमच्या सरांनी' असे आपण सहज बोलून जातो. 'सरां' संबंधी आदर असतो, श्रद्धाही असते. पण गुरू आणि शिष्य या शब्दांतून व्यक्त होणारा भाव काही वेगळाच. याचे कारण हे असावे की, 'गुरू' या शब्दात केवळ ज्ञानदानाचे पवित्र कर्तव्य अभिप्रेत असते. आणखी असे असावे की, गुरू हा ज्ञान देण्यास 'अधिकारी' असावा हा संकेत होता. 'अधिकारी' म्हणजे जो विषय तो शिकविणार त्याचे समग्र व सखोल ज्ञान तर त्याला असावेच; पण व्यक्तिश: त्याचे चारित्र्यही निष्कलंक असावे. पूर्वी शतकानुशतके अशी प्रथा रूढ झालेली होती की, शिष्य गुरुंच्या आश्रमातच राहत असत आणि त्यांना आपल्या ज्ञानदात्याचे जीवन जवळून पाहता येत असे. या परस्परसंबंधात लौकिक द्रव्याच्या रूपाने द्यावयाच्या किंवा मागावयाच्या मोबदल्याचा प्रश्नच नसे. 'आपल्या पाठशाळेची फी किती?' हा प्रश्नच संपूर्णपणे संदर्भहीन होता. आश्रम किंवा पाठशाळा यांना साधनांची अडचण येत नाही आणि ज्ञानदात्या गुरूला चरितार्थाची अडचण पडत नाही, हे पाहण्याचे दायित्व समाजच अंगीकारीत असे.

व्यावसायिक शिक्षण देणारेही या संकल्पनेनुसार गुरूच असत. पण पोट भरण्याची अथवा अन्य कोणत्या प्रकारची विद्या शिकविणारे गुरू असले, तरी ते 'सद्‌गुरू' मात्र नव्हते. श्री समर्थांनी या मुद्द्यावर किती भर दिला आहे पाहा:

**जो यातीचा जो व्यापार।**
**सिकविती भरावया उदर।**
**तेही गुरु परी साचार।**
**सद्‌गुरू नव्हेती ॥**

**आपली माता आणि पिता।**
**तेही गुरुची तत्वतां।**
**परी पलावणार पावविता।**
**तो सद्‌गुरू वेगळा ॥**

**गायत्री मंत्राचा उच्चारु।**
**सांगे तो साचार कुलगुरू।**
**परी ज्ञानेविण पैलपार।**
**पाविजेत नाही ॥**

अखेर आशय हाच की, अनेक विद्या आणि कला यायोगे जीवन समृद्ध होत असते. चरितार्थाचे साधन तर लाभतेच, पण त्याबरोबर रसिकतेने जीवनाचा आस्वादही घेता येतो. कोणी संगीत शिकतो, कोणी नृत्य शिकतो, काणी साहित्य शास्त्राचा अभ्यास करतो, अनेक जण नाना प्रकारे भौतिक शास्त्रांत संशोधन करण्यामध्ये जीवन



घालवितात. या वास्तविक स्थूल गोष्टी आहेत. दृश्य जगतातील आहेत. पण जीवनाच्या सांस्कृतिक विकासाला पोषकही आहेत. अर्थात त्यांतील योग्य अभिरुची सांभाळली तर ! यांपैकी प्रत्येक गोष्ट उत्तम प्रकारे शिकण्यासाठी त्या त्या विषयाचा ज्ञाता मार्गदर्शक लागतोच. 'विद्यावाचस्पती' (पीएच.डी.) ही पदवी एखाद्या विषयावर शोधप्रबंधलिहून संपादनकरावयाची असली, तरी विद्यापीठाच्या नियमानुसार 'गाईड' म्हणजे योग्य मार्गदर्शन करणारा आवश्यक असतो. अशा बाबतीत 'खबरदार' राहावे लागते, असे संतही सांगतात. श्री समर्थांचा माणसाने 'सावधान' राहण्यावर फार भर आहे. माणूस परमार्थी होऊ इच्छित असेल तरी, प्रपंचातील कर्तव्ये त्याला लक्षपूर्वक पार पाडावीच लागतील. व्यावसायिक कौशल्यही लागेल. 'आधी मेळवी मग जेवी', 'प्रपंची पाहिजे सुवर्ण', ज्याचा जो व्यापार। तेथे असावे खबरदार' अशी अनेक सुत्रे दासबोधात प्रसंगाप्रसंगाने आढळतात आणि-

**प्रपंची जो सावधान।**
**तो परमार्थ करील जाण।**
**प्रपंची जो अप्रमाण।**
**तो परमार्थी खोटा॥**

हे आमच्या मनावर त्यांनी ठसविले आहे. पण हे सारे असले तरी प्रपंच, विद्या, कला, शास्त्र आदी गोष्टी म्हणजे काही मानवी जीवनाचे उद्दिष्ट नव्हे. लौकिक विद्या आणि कला शिकवणारे गुरू असले तरी सद्‌गुरू नसतात. समर्थांच्या या विधानात जीवनाच्या सार्थकाचा बोध करून देणाऱ्या व त्या सार्थकतेकडे आपल्याला नेणाऱ्या मार्गदर्शकाची आवश्यकता सूचित झाली आहे.

## ॥ श्री सद्‌गुरुंची कृपा झाली ॥

माणसाने प्रपंच केला, अगदी दक्ष राहू न प्रपंच केला, म्हणजे मानवी जीवनाचे सार्थक झाले का ? उदंड पैसा, लौकिक, प्रतिष्ठा, भौतिक सुखसाधने यांची प्राप्ती जीवनात झाली म्हणजे जीवनाचा हेतू साध्य झाला काय ? यावर संतांचे ठाम उत्तर 'नाही' असे आहे. या ज्या साऱ्या गोष्टी मिळविल्या त्या अशाश्वत आणि माणसाचा देह अशाश्वत. शास्त्रांचा सिद्धान्त तर असा आहे की, शाश्वत सुखप्राप्ती, अखंड आणि परिस्थितीनिरपेक्ष आनंदमयता यांची जोड जोवर होत नाही, तोवर खरे निरंतर समाधान माणसाला लाभणेच शक्य नाही. कारण आनंदमयताहेच माणसाचे खरे स्वरूप आहे. स्वरूपबोध त्याला होतो आणि स्वरुपाची अनुभूती त्याला लाभते, तेव्हा तो निखळ व शाश्वत आनंदाच्या साम्राज्यात प्रविष्ट होतो. प्रपंचाची अपूर्णता दूर करणारा एक परमार्थच आहे. परमार्थ म्हणजे आत्मदर्शन हे लक्ष्यअखंड दृष्टीपुढे ठेवून त्याच्या प्राप्तीसाठी करावयाचा प्रयत्न म्हणजेच साधना. आत्मदर्शन म्हणजेच अखंड आनंदमय अवस्थेची प्राप्ती. हीच अध्यात्मविद्या सर्व विद्यांचा राजा.

स्थूल अभ्यासासाठीदेखील मार्गदर्शक लागतो, तर हा सूक्ष्माच्या प्राप्तीचा अभ्यास काय मार्गदर्शकाविना होईल ? हा जो मार्गदर्शक असतो त्यालाच परमार्थमार्गात सद्‌गुरू अशी संज्ञा आहे. लौकिक जीवनात माणसाने कितीही यश संपादन केले, तरी आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी श्री सद्‌गुरूंच्या चरणांशी बसून त्याने साधनेचे पाठ घेतले पाहिजेत, गुरुकृपा संपादन केली पाहिजे आणि भवसागर पार करून शाश्वत सुखाची जोड करून घेतली पाहिजे. श्रीमंत आद्य शंकराचार्यांचे 'गुर्वष्टक' फार प्रसिद्ध आहे. त्यातील हा श्लोक पाहा -

**कलत्रं धनं पुत्रपौत्रादि सर्वम्।**
**गृहं बांधवा सर्वमेतद्धि जातम्॥**
**गुरोरंघ्रिपद्मे मनश्चेन्न लग्नम्।**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम्॥**

अरे पत्नी, पैसा, पुत्र, पौत्र, घर, दार सारे काही प्राप्त करून घेतले आहेस. पण अरे, हे सारे तू मिळविलेस तर काय मोठा पुरुषार्थ झाला? तुझ्या जीवनाला कोणती धन्यता प्राप्त झाली ? कारण जीवन खरोखर धन्य ज्या उपलब्धीमुळे होते ती मिळविण्याचा मार्ग सद्‌गुरू दाखवितात आणि तुझे मन तर अद्याप सद्‌गुरुचरणी लागलेलेच नाही! श्रीगुरुकृपा आणि आत्मसुखाची प्राप्ती याविना सारे भौतिक वैभव असार, अर्थहीन बनून जाते, हेच श्री शंकराचार्यांनी या अष्टकातील सर्व श्लोकांमधून परोपरीने सुचविले आहे.

शिष्याने गुरुकडे जाणे आणि त्याची कृपा संपादन करून आत्मज्ञान मिळविणे, ही आपली अतिप्राचीन भारतीय परंपरा आहे. गीतेमध्ये भगवंतांनी ज्ञानाची महती अर्जुनाला सांगितली. नंतर भगवंत सांगतात, अर्जुना, ते शाश्वताची जोड करून देणारे तुला हवे असेल तर एकच मार्ग आहे -

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**
**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः॥**

हात जोडून, नम्र होऊन महात्म्याकडे जा. प्रश्नविचार. सर्व शंकांचे निरसन करून घे. त्याची सेवा कर. सेवा कर म्हणजे त्यांनी सांगितलेल्या मार्गाने काटेकोरपणे वाटचाल कर. मग त्यांची तुझ्यावर कृपा होईल. तुझ्या अंतरी ज्ञानाचा प्रसन्न प्रकाश पसरेल. ज्ञानेश्वर माऊली अनुवाद करतात -



ते ज्ञान पैं गा बरवें।
जरी मनीं आथी जाणावें।
तर संतां या भजावे। सर्वस्वेसी ॥
तरी तनुमनुजीवें। चरणासी लागावें।
आणि अगर्वता करावें। दास्य सकळ ॥
ऐसे ज्ञानप्रकाशें पाहेल।
तैं मोहांधकारू जाईल।
जैं गुरूकृपा होईल। पार्था गा ॥

ज्ञानाची पहाट ज्यांच्या कृपेने होते व जीवन आनंदाने उजळून जाते, तेच सद्गुरु.

## ॥ तस्मै श्री गुरवे नमः ॥

आपल्या सर्व मराठी संतांच्या हृदयांतरी गुरुभक्तीचा भाव दुथडी ओसंडताना दिसतो सद्गुरू म्हटले की, त्यांचे अंत:करण नुसते उचंबळून येते. गुरूकृपेनेच जीवन धन्य झाले, हा सर्व संतांचा भाव आहे.

स्वामी म्हणे झाले कृतार्थ जीवन।
सद्गुरुचरण उपासिता ॥

या स्वामी स्वरूपानंदांच्या पंक्ती अगदी प्रातिनिधिक स्वरूपाच्या म्हणता येतील. निवृत्तीनाथ-ज्ञानदेव, जनार्दनस्वामी - एकनाथमहाराज, विसोबा खेचर-नामदेव, नामदेव-जनाबाई, समर्थ-कल्याण, तुकाराम-निळोबाराय अश कितीतरी जोड्या चटकन दृष्टीपुढे येतात. प्रत्येक शिष्याचा उत्कट भक्तीभाव त्या त्या रचनेत पदोपदी प्रकट झाला आहे. 'कवित्व माझे आहे' असे एकाही संताने म्हटलेले नाही. सारे श्रेय श्रीसद्गुरुंच्याच चरणी अर्पण केले आहे. ज्ञानेश्वरीसारखा ज्ञानदेवांचा अलौकिक ग्रंथ; पण त्यांचा भाव काय ? अकराव्या अध्यायाच्या अखेरीस श्री सद्गुरूंकडे पसायदान मागण्यापूर्वी माऊलींच्या प्रतिभेचा विलक्षण उन्मेष, त्यांची कल्पनातीत गुरुशरणता, पराकाष्ठेचा कृतज्ञताभाव यांचा आविष्कार स्तिमित करून सोडणारा आहे. केवळ दोनच ओव्या पाहा:

एवं गुरुकर्मे लाधले।
समाधिधन जे आपुले।
ते ग्रंथे बांधौनि दिधले। गोसावी मज ॥
किंबहुना तुमचे केले।
धर्मकीर्तन हे सिद्धी गेले।
येथे माझे जी उरले। पाईकपण ॥

ज्ञानियांच्या राजाचा सद्गुरुविषयीचा हा भाव त्यांना विलक्षण थोरवी देऊन गेला आहे. 'मी केले, माझ्यामुळे झाले' असे शब्द कोणाही संताच्या मुखातून कधी बाहेर पडणेच शक्य नाही.

माणसाची तळमळ शांत व्हावयाची असेल, तर गुरुकृपा परम आवश्यक असते. श्री समर्थ अगदी निश्चयात्मक पद्धतीने हे सांगून टाकतात,

सद्गुरुविण जन्म निर्फळ।
सद्गुरुविण दु:ख सकळ।
सद्गुरुविण तळमळ। जाणा नाही ॥
असो जयासी मोक्ष व्हावा।
तेणे सद्गुरु करावा।
सद्गुरुविण मोक्ष पावावा।
हे कल्पांती न घडे ॥

हे सारे खरे. पण कोणीही लुंगासुंगा म्हणेल की, मी सद्गुरु आहे, तर त्यावर भाविकांनी विश्वास ठेवू नये आणि भलत्यामार्गाने जाऊ नये, असा इशारा सर्व संतांनी वारंवार दिला आहे. भोंदू गुरु आणि कामी गुरु यांच्यावर सपासप कोरडे ओढले आहेत. संत निक्षून सांगतात, बाबांनो, सद्गुरुला शरण आवश्य जा, पण सद्गुरु पारखून घ्या. शब्दांमागे धावू नका, तर प्रत्यक्ष जीवन पाहा. श्री समर्थांनी दासबोधात एक स्वतंत्र समास (दशक ५, समास २) लिहून सद्गुरुंची लक्षणे उत्कृष्टरीत्या सांगितली आहेत.

नाही उपासनेचा आधार।
तो परमार्थ निराधार।
कर्मेविण अनाचार। भ्रष्ट होती ॥
म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन।
नीतिन्याये मर्यादा ॥
यामध्ये एक उणे असे।
तेणे ते विलक्षण दिसे ॥

उपासना आणि आत्मप्रचितीचे निश्चयात्मक ज्ञान या अधिष्ठानावर प्रसन्नपणे विराजित सद्गुरु प्रेमाचा आणि करुणेचा सागर असतात, त्यांची वाणी श्रोत्याला निववितं. शांती, दया, क्षमा, तितिक्षा आदी दैवी संपत्ती त्यांच्या ठायी असते. केवळ भूमात्रांच्या कल्याणासाठी ते झिजतात. म्हणून 'गुरुमाऊली' ही पदवी त्यांना प्राप्त होते. त्यांचे वर्णन शब्दांनी करताच येत नाही. त्यांचे स्मरण करावयाचे व त्यांच्या चरणी माथा ठेवावयाचा एवढेच आपण करू शकतो. गुरुपौर्णिमेला गुरुपूजन याच भावनिर्भरतेने केले जाते. अगणित मुमुक्षु आणि साधक, प्रत्यक्ष स्वर्गातील देवदेखील एकच घोष करता :

॥ तस्मै श्री गुरवे नमः ॥

卐 卐 卐

### सुविचार

**बुद्धि श्रद्धेसारखी दुबळी नाही. बुद्धि श्रद्धेसारखी बलवान नाही. बुद्धि प्रामाण्य असावे पण 'अहं' प्रामाण्य नको.**

**– विनोबा**





# ज्ञानदेवांचे दिव्य मागणे

## पसायदान

ह.भ.प.
भानुदास महाराज देगलूरकर



॥ श्री ज्ञानदेव ॥

ज्ञानेश्वरीच्या शेवटी येणारे पसायदान हे ज्ञानदेवांचे दिव्य मागणे आहे. ज्ञानदेवांच्या उदार-व्यापक वैश्विक दृष्टीक्षेत्र ते एक विलक्षण दर्शन आहे. आजकाल पसायदान सर्व समारंभात समारोपावेळी म्हटले जाते. ही त्यास मिळालेली सर्वमान्याताच आहे.

वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू वै. धुंडामहाराज यांचे सुपुत्र ह.भ.प. भानुदासमहाराज हे महाराष्ट्रातील एक नामवंत प्रवचन-किर्तनकार आहेत. त्यांनी पसायदानावर केलेले चिंतनात्मक निरूपण —





## ॥ पसायदान ॥

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवांचे ॥

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥

वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥

किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिही लोकी ।
भजिजो आदिपुरुषी । अखंडित ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥

येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो
येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया जाहला ।

ज्ञानेश्वरी
(अध्याय १८ वा)

पसायदान म्हटल की प्रथमत: ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या अंती जे विश्वात्मक देवाजवळ मागणे मागितले त्याचेच स्मरण होते. '**पसायदान**' हा शब्द ज्ञानदेवांनीच रुढ केला असे दिसते. कदाचित कुणी तो शब्द त्यांच्यापूर्वी वापरला दिले !

'पसायदान' हा शब्द ज्ञानेश्वरीत दोन दोन ठिकाणी आला आहे. प्रथमत: सोळाव्या अध्यायनाच्या अंती खालीलप्रमाणे -

**''म्हणोनि निजअवधान ।**
**मज वोळगे पसायदान ।**
**दीजो जी समर्थ होईन । ज्ञानदेवो म्हणे ॥''**

आणि दुसऱ्यांदा अठराव्या अध्यायाच्या अंती खालीप्रसिद्ध ओवीत

**''आता विश्वात्मके देवें ।**
**येणे वाग्यज्ञें तोषावें ।**
**तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ॥''**

'पसाय', 'पसावे' हा शब्द ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी आला आहे. पण त्यातील ही अधिक परिचित ओवी खालील आहे.

**''म्हणौनि तिये पुजे । रिझेलिन आत्मराजे ।**
**वैराग्यसिद्धी देईजे । पसाय लया ॥ १८-९१८**

पण 'पसायदान' म्हणजे जे आहे ते आपल्या ग्रंथसिद्धीचा सोहळा पूर्ण झाल्यानंतर ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीवच्या १८ व्या अध्यायाच्या शेवटी मागितले ते हे मागणे 'तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥' पासून प्रारंभ होते ते 'हा होईल दान पसावो ' पाशी थांबते. हे मागणे असून ही दान आहे कारण इथे हे मागणे हे केवळ मागणेच न राहता प्राप्तीच्या मुकाकामाला पोहचते, असे प्रसन्न आश्वासन आहे.

कोणताही संत, साधु व उदारमनस्क पुरुष जेव्हा परमात्म्याजवळ कांही मागतो तेव्हा ते मागणे संकुचित व तात्कालिक नसते. त्यांचे मागणे हे जगाचे भीक मागणे संपावे यासाठी असते. त्यात्या प्रसंगीच्या परिस्थिती आणि मनस्थिती प्रमाणे या मागण्यांमध्ये भिन्न भिन्न छटा असेल पण त्यात व्यापक कल्याणाचाच हेतू असतो. त्या सर्व मागण्यात ज्ञानदेवांचे 'पसायदान' हे आदर्श आहे.

### ॥ प्रसन्नतेचे दान ॥

हे 'पसायदान' एवढे प्रसिद्ध आहे की त्याचा शब्दश: अर्थ आपण येथे पाहणार नाही. आपण फक्त सिद्धान्त सूत्रे पाहणार आहोत. 'पसाय' शब्दाचा अर्थ 'प्रसाद' असा आहे आणि विश्वात्मक देवरुप असणाऱ्या सद्गुरुंनी हे प्रसादाचे दान आपल्याला आपण आपण केलेल्या धर्मकीर्तनरुप सेवेचे फळ म्हणून द्यावे ही





ज्ञानदेवांची प्रार्थना आहे. 'प्रसाद' शब्दाचा अर्थही प्रयन्नता असा आहे आणि ही प्रसन्नता कुणाची व्हावी ? तरी तिही लोकातीलभूम मात्रांची, प्रसन्न करणारे साधन म्हणजे त्याला प्रिय असणारा या केला पाहिजे. म्हणून ज्ञानदेव म्हणतात मी तुमची सेवा म्हणून वाग्यज्ञ केला. याच्याने तुम्ही स्वत: तोषावे म्हणजे प्रसन्न व्हावे आणि मला प्रसन्नतेचे दान द्यावे. माझी प्रसन्नता कशात आहे ? ती जगाच्या प्रसन्नतेत आहे. पण हे जग तर दु:खाने गांजलेले आहे.

जगात जी अप्रसन्नता असते त्याला मुख्य कारण जर कुणी असेल तर स्वत: सतत अप्रसन्न राहून जगातील अप्रसन्न ठेवणारे खल. या खलांच्या विकृत स्भावामुळे यांना कितीही भौतिक सुखाची प्राप्ती झाली तरी हे प्रसन्न होत नाहीत व इतरांनी प्रसन्न झालेले यांना चालत नाही. त्यामुळे हे सदैव दुष्कर्मामध्ये म्हणजे परपीडेमध्ये गुंतलेले असतात. समाजातील बरेचसे प्रश्न अशा उघडपणे अथवा प्रच्छन्नपणे कुटील उद्योग करणाऱ्या लोकांमुळे निर्माण होतात. पण ज्ञानदेव अशा लोकांकडे अत्यंत समजुतदारपणें आणि कनवाळूपणे पाहतात. ते त्यांच्यासाठीही देवाकडे शिक्षेची मागणी करीत नाहीत तर त्यांच्या मनोवृत्तीत बदल करण्याची मागणी करतात, हा बदल कोणत्या उपायामुळे होईल ?माणसाला परपीडेपासून होणाऱ्या आनंदापेक्षा सहस्त्रावधी पटीने अधिक आनंद इतरांच्या जीवनात प्रसन्नता करण्यामुळे होत असतो. पण विकासग्रस्त मनाला त्या आनंदाची ओळखच झालेली नसते. लोकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यात काय आनंद असतो हे कळण्यासाठी आधी लोकांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल झाला पाहिजे. त्यांच्या विषयी आत्मीयता निर्माण झाली पाहिजे. समाजाविषयीच्या शत्रुत्वाची भावना जाऊन त्याजागी मित्रत्वाची भावना निर्माण झाली पाहिजे. ही भावनादेखील तात्कालिक स्वार्थापुरती, निवडणुकीतल्या युतीसारखी नको. तर ते 'मैत्र जीवाचे' पाहिजे. अंत:करणपूर्वक, मनाच्या गाभ्यातून पाहिजे.

### ।। स्वधर्माचे भान ।।

माणसामाणसातील अशा शुद्ध मैत्र भावनेच्या येणारी फार मोठी अडचण कोणतील असेल तर त्यांच्या अंतरंगाच्या अंध:कारात अत्यंत खोल दडलेली पापवासना. ती इतकी खोल दडलेली असती की त्याची त्यादेखील ती आहे याचा पत्ता लागत नाही ! आणि पत्ता लागला तरी ती आपल्याजवळ आहे हे तो कधीही कबूल करणार नाही. ती पापवासना अशी तिरस्कारणीय असते की त्याला स्वत:लाही तिच्याकडून वळून पहावे असे वाटत नाही. पण पापवासनाच त्याच्या स्वत:च्या अप्रसन्नेतला आणि इतरांच्या दु:खाला कारणीभूत असते. ही पापवासना पोसते ती अज्ञानाच्या, अविवेकाच्या अंध:कारावर, विवेकाच्या सूर्यप्रकाशात ती जिवंत राहू शकत नाही. हा विवेक म्हणजेच सतत जागृत असणारे स्वधर्माचे भान, स्वधर्म भान म्हणजे स्वस्वरुपाची आणि स्वकर्तव्याची स्पष्ट जाणीव, यालाच ज्ञानदेवांनी स्वधर्म सूर्याचा उदय असे म्हटले आहे. प्रकाशात सर्व धर्म्य इच्छांच्या परिपूर्तीचे समाधान माणसाला लाभू शकेल.

मानवी जीवनामध्ये असे प्रसन्नेते मळे फुलविण्यासाठी समाजाच्या हिता करिता कष्टणारे, विवेकधनाने संपन्न, ईश्वरनिष्ठेने अविचल, मांगल्याचा वर्षाव करणारे समर्थ पुरुष लागतात. समाजात जे चांगले घडते ते अशा सज्जनांच्या परस्परपूरक कृतीतून घडत असते. त्यांच्यामुळे माणसाच्या आत असणारा सद्वासनांचा अंकूर उदयाला येतो. सत्कार्याच्या परस्पर सौहार्दाच्या आणि स्वधर्माच्या प्रेरणा अशा सज्जनवृंदाच्या अविरत संपर्कामधूनच समाजाला प्राप्तह होतात. समाजाच्या कल्पनांना फलद्रूप करणारे कल्पतरु लोकांत चैतन्य निर्माण करणारे चिंतामणी, माणसामाणसात माधुर्य निर्माण करणारे अमृतसिंधू, अकलंक चारित्र्याचा शीतर प्रकाश देणारे चंद्रमे आणि प्रखर ज्ञानाच्या तेजाने उजळून टाकणारे मार्तंड जर समाजाला आपले वाटले मग त्या समाजासठी सर्व समाजासाठी सर्व सुखाच्या राजमंदिराची द्वारे सहजच उघडली जातील.

अप्रसन्नतेच्या गर्तेत पडलेल्या एक एक माणसापासून प्रारंभ करुन परिपूर्ण प्रसन्नतेच्या साम्राज्यात नांदणाऱ्या समाजापर्यंतचा वैचारिक प्रवास ज्ञानदेवांनी आपल्या पसायदानात केला आहे. हे परिपूर्ण प्रसन्नतेचे साम्राज्य म्हणजेच तुमच्या आमच्या सर्वांच्या मूळ पुरुषाची, आदि पुरुषाची एकरुप होऊन केलेली भक्ती ही अनन्य भक्ती व्दैताचा ठाव पुसून टाकते. आदित्पुरुष हाच समाजपुरुष होऊन प्रकाटतो. त्याची सेवा प्रेमाने करणे ही फार मोठी भक्ती होय.

### ।। भगवंत्कृपेचे पाठबळ ।।

हे ज्ञान माणसाला शब्दाच्या माध्यमावाचून होणार नाही. समाजाच्या अनुभवाचा, विचारांचा साठा पुरातन काळापासून अनेक विचारवंतानी ग्रंथगत करुन ठेवला आहे. अपौरुषेय अशा श्रृति स्मृतिमध्ये माणसाच्या कल्याणाची मार्गदर्शक तत्त्वे अनादिकालापासून ग्रंथीत आहेत. गीता ही अशा सर्व वाङ्मयाचे मंथित आहे. संतांनी ते आपल्यासाठी विवरुन आपल्यापुढे ठेवले आहे. जो जीवनात त्या ग्रंथापासून मार्गदर्शन प्राप्त करुन त्याप्रमाणे मार्गक्रमण करील तो जीवनात सर्वार्थाने विजयी होईल.

पण हा प्रवास तसा सोपा नाही. त्यासाठी भगवत्कृपेचे पाठबळ लागते. हे आपल्याला प्राप्त व्हावे यासाठी जनाई माऊली आपल्यासाठी विश्वेश्वरावोपाशी प्रार्थना करते. या मार्गाने जाणारा निश्चितपणे शाश्वत प्रसन्नतेचा प्रसाद प्राप्त करणारच असा वरप्रसाद जेव्हा त्यांच्याकडून प्राप्त होतो तेव्हा ज्ञानदेव प्रसन्न होतात.

अशी **'पसायदान'** ही जगाच्या प्रसन्नतेसाठी प्रवृत्त झालेली प्रसन्न प्रार्थना आहे.

卐 卐 卐

# श्री साईबाबा संस्थान शिरडीचे अध्यक्ष श्री द. म. सुकथनकर यांचा अल्पपरिचय

✡ **जन्म** :- द्वैभाषिक मुंबई राज्यातील नवसारी (सध्या गुजरातमध्ये) येथे दि. २१ फेब्रुवारी १९३२ रोजी

✡ **शिक्षण** :- एम. कॉम.

✡ **अध्यापन** :- १९५४ - ५६ : गुजरात मधील सुरत येथील कॉमर्स महाविद्यालयात २ वर्षे प्राध्यापक म्हणून अध्यापन. त्याच काळात आय. ए. एस. आदी भारतीय प्रशासन सेवेत निवडीसाठी होणाऱ्या अ. भा. पातळीवरील स्पर्धापरिक्षांमध्ये उत्तीर्ण.

✡ **प्रशासन सेवेतील प्रदीर्घ कारकिर्द व भूषविलेली पदे** :-

- १ मे १९५६ रोजी भारतीय प्रशासन सेवेत नियुक्ती.
- १९५६ ते ६० प्रांतअधिकारी म्हणून मेहसाणा, पाटण व येवतमाळ येथे.
- १९६० साली 'महाराष्ट्र राज्याची स्थापना' झाली आणि महाराष्ट्र राज्य सेवेकडे वर्ग.
- पुणे जिल्हा परिषदेचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी होण्याचा मान.
- मुख्यमंत्री कन्नमवार आणि मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे खासगी सचिव म्हणून दीड वर्षे कार्य.
- ८ वर्षे शिक्षण उपसचिव.
- १९७२ ते ७६ दिल्लीला केंद्रीय वित्तमंत्रालयात बँकिंग विभागात संचालक.
- १९७६ महाराष्ट्र राज्य सेवेत पुनरागमन.
- १९७६ ते ७९ शिक्षण सचिव.
- १९७९ ते ८० उद्योग सचिव.
- ७ महिने मुंबई महानगर प्रदेशाचे मेट्रोपॉलिटन
- १९८१ ते ८४ मुंबई महापालिकेचे आयुक्त.
- १९८४ ते ८६ महसूल सचिव.
- १९८६ जून ते ८८ ऑगस्ट पर्यंत दिल्लीला नगरविकास मंत्रालयाचे सचिव.
- १ सप्टेंबर १९८८ महाराष्ट्रात पुनरागमन आणि महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती.
- ३१ ऑगस्ट १९९० रोजी मुख्यसचिव पदावरून निवृत्त.

✡ **विद्यमान पदे** :-

- महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचे सदस्य.
- महाराष्ट्र शासनाच्या व काही खासगी कंपन्याचे संचालक.
- केन्द्र व महाराष्ट्र शासनाच्या विविध समित्या व अभ्यास गटांचे आजतागायत अध्यक्ष/ सदस्य म्हणून कार्य.
- राष्ट्रीय नगर विकास संस्थानच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष.
- विश्वप्रकृती नीधी (W.W.F.) सार्वजनिक न्यासाचे मानद विश्वस्त व मुंबई-गोवा प्रादेशिक मंडळाचे अध्यक्ष.
- 'बॉम्बे फर्स्ट' या बिगर शासकीय स्वयंसेवी संस्थेचे मुख्य सल्लागार.

✡ **विशेष छंद** :- शास्त्रोक्त गायन ऐकण्याची आवड.





## अध्यक्ष सुकथनकर यांची मुलाखत

# साई भक्तांच्या सोई हाच आमच्या कार्याचा केंद्रबिंदू



*शिरडी येथील श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या, ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी म्हणून सर्वत्र नावलौकिक असलेल्या श्री द.म.सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखालील विश्वस्त मंडळाच्या कारभारास नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले आहे. त्यानिमित्त अध्यक्ष श्री सुकथनकर यांची कार्यकारी संपादक विद्याधर ताठे यांनी घेतलेली सविस्तर मुलाखत:*

**(१) आपली सर्व कारकिर्द प्रशासकीय सेवेत उच्चपदस्थ अधिकारी म्हणून आहे. शिरडी संस्थानचे अध्यक्षपद आपणास कसे वाटते.**

- शिरडी संस्थानच्या अध्यक्षपदी आपली निवड होईल असे मला कधीच वाटले नव्हते. अत्यंत अनपेक्षित अशीच ती घटना होती. गेली काही वर्षे महाराष्ट्र राज्यातील विविध प्रशासकीय पदांवर मी केलेल्या कामामुळे मी शिरडी संस्थानच्या अध्यक्षपदी उत्तम कार्य करू शकेन असा सरकारला विश्वास वाटला असावा व त्या विश्वासाचेच हे पद फळ असावे असे मला वाटते. सर्व संस्थांचा प्रशासनिक वा व्यवस्थापकीय गाभा एकच असतो. केवळ वरवर त्या त्या संस्थांच्या उद्दिष्टान्वये फरक असतो. त्यामुळे शिरडी संस्थानच्या अध्यक्षपदी काम करण्यात मला कोणतीही मानसिकसुध्दा अडचण आलेली नाही. या पदावर काम करताना मला आनंदच वाटतो. साई भक्तांच्या सेवेचे काम हे मी माझे भाग्य समजतो. 'सेवा परमो धर्म:' असे सेवेचे महत्त्व आहे. न मागता हे कार्य मला लाभले हे मी माझे पूर्वसुकृतच मानतो.

**(२) धार्मिक-अध्यात्मिक क्षेत्राची आपणास कितपत आवड आहे.**

- आमचा परिवार अत्यंत धार्मिक आहे. माझे वडिल दत्तभक्त होते. ते दर गुरूवारी सायंकाळी तास-दीड तास ह.भ.प. लक्ष्मणबुवा पांगारकर संपादीत 'भक्तीमार्ग प्रदीप' मधील अनेक अभंग-श्लोक-भजनें-आरत्या सुरेलपणे गात, म्हणत असत. तसेच ते निस्सीम साईभक्तही होते. माझी आई देखील साईभक्त असून रोज साईसच्चरित मधील अध्याय नेमाने वाचते. लहानपणी मी त्यांच्या समवेत काहीवेळा शिरडीस जाऊन आलेलो आहे. अर्थात मी सश्रद्ध असलो तरी भावडा नव्हतो. माझी श्रद्धा चिकित्सकच होती व आहे.





प्रशासकीय सेवेच्या धावपळीत नियमितपणे काही पूजन-नामस्मरण-ध्यान करण्याएवढा मला फारसा वेळ मिळाला नाही. किंबहुना माझें त्याकडे काहीं प्रमाणात दुर्लक्षच झाले असें म्हणता येईल. पण कामानिमित्त ज्यां ज्या प्रमुख क्षेत्री जाण्याचा योग येई तेथे तेथे मी वेळ काढून देवदर्शनास जातो. नासिक नगर भागात काही काम निघे तेव्हा मी शिरडीस जाऊन दर्शन घेत असें.

थोडक्यात, परिवारातील धार्मिक वातावरणामुळे माझा मुळचा पिंड हा धार्मिकच आहे. फक्त लोक गुंततात तेवढे मी कर्मकांडात गुंतलो नाही.

**(३) शिरडी संस्थानच्या अध्यक्षीय कारकिर्दीतील गेल्या वर्षातील आपले वैशिष्टपूर्ण कार्य कोणते ?**

- खरंतर एक वर्ष हा काळ फार मोठा नाही. संस्थानची सर्व प्रकारची माहिती समजून घेणें - विविध छोट्या-मोठ्या अडीअडचणींचा सूक्ष्मपणे विचार करणे हाच या प्रारंभिक वर्षाचा मुख्य भाग होता. या काळात आमच्या विश्वस्त मंडळाने त्या मानाने बरेंच कार्य केले असून वर्षभरातील कामाचे वैशिष्ट्य म्हणजे आमचे सर्व निर्णय हे 'साईभक्तांची सोय हा केंद्रबिंदू' ठेवून करण्यात आलेले आहेत.

**संस्थानचा कारभार अत्यंत पारदर्शक व सर्वांना बरोबर घेऊन सर्वांच्या सहमतीने करण्याची पद्धत मी अवलंबलेली आहे. कोणतेही काम मी विश्वस्त मंडळाला विश्वासात न घेता 'डिक्टेटर', हुकुमशहा पद्धतीने करीत** नाही. कोणीही येऊन आमचा कारभार पहावा, सर्वांना तो खुला आहे.

**(४) स्थानिक लोकांसाठी संस्थान काहीच करीत नाही अशी ओरड आहे. याबद्दल तुमचे मत काय ?**

- ही ओरड समस्त नागरिकांची नाही. ज्यांचे हितसंबंध साधले जात नाहीत अशा असंतोषी लोकांचीच ही ओरड आहे, असेही मी नम्रपणे पण ठामपणे सांगू इच्छितों.

१) संस्थानचे शिरडीत हॉस्पिटल आहे त्यामध्ये सर्वप्रकारच्या सोई आहेत. त्याचा लाभ कोण घेतो ? स्थानिक लोकांनाच होतो ना !

२) संस्थानच्या २ शाळा व १ आय.टी.आय. आहे त्यामध्ये स्थानिकांना प्रथम स्थान दिले जाते. संस्थानच्या शाळांमध्ये मुंबई-पुण्याचे विद्यार्थी शिकत नाहीत ना ?

३) संस्थानच्या सेवेतील नोकर भरतीमध्ये सुद्धा आम्ही स्थानिकांना अधिक वाव दिलेला आहे.

४) संस्थानच्या हद्दीबाहेरील सार्वजनिक रस्तेही आम्ही कॉंक्रीटचे केलेले आहेत.

५) शिरडीच्या पाणी पुरवठ्यासंबंधीही संस्थानने अग्रक्रमाने आर्थिक हातभार लावून कार्य केलेलें आहे.

स्थानिक लोकांच्या अपेक्षा फार मोठ्या आहेत पण आमच्या कार्याला कायद्याचे व संस्थानच्या व्यवस्थापनासाठीं मुंबई दिवाणी न्यायालयाने मंजूर केलेल्या योजनेत नमूद केलेली संस्थानची उद्दिष्टें व इतर तरतूदी यांचीं बंधने आहेत.

**(५) स्थानिक आमदार आपल्या शिरडी संस्थानवर नाराज असल्याचे आढळते-जाणवते. त्याबद्दल आपले मत काय ?**

- नाराजीचें वृत्त मी वृत्तपत्रातून जे आलें तें वाचलें. माझी व आमदार साहेबांची समक्ष भेट अद्याप झालेली नाही त्यामुळे त्यांची नाराजी असेलच तर तिचें खरे कारण मला समजलेलं नाही. वृत्तपत्रातून त्यांच्या नावावर ज्या बातम्या प्रसिद्ध झाल्या त्या कितपत विश्वासार्ह आहेत ते सांगता येणं कठीण आहे. आपण वृत्तपत्रात आलेल्या बातम्यावरूनच हा प्रश्न विचारला असेल तर मला असे सांगावेसें वाटते की -

संस्थानच्या विश्वस्त मंडळावर कोणाची नेमणूक व्हावी, कोणाची होऊ नये हें माझ्या-अध्यक्ष म्हणून हातात नाही. त्यामुळे आमदारसाहेबांची व त्यांनी सूचविलेल्या व्यक्तिंची निवड विश्वस्त मंडळावर होणे माझ्या हातात नाही. तसेच ती झाली नसेल तर तो आमचा दोष नाही. सरकार व धर्मादाय आयुक्त यांनी स्थानिक आमदार म्हणून त्यांची निवड केली तर आम्ही त्याचे स्वागतच करू. आम्हाला तें फायद्याचेंच ठरेल.

स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला आमदारसाहेब यांच्याबद्दल आदर असून त्यांच्या यथायोग्य सूचनांचा आम्ही नेहमीच मान राखू. त्यांनी आपलेपणाने संस्थानमध्ये यावं मोकळेपणाने बोलावे. वृत्तपत्र हे संवादाचे माध्यम नव्हे असे मला वाटते.

संस्थानकडून त्यांच्या अनेक अपेक्षा असल्याचे मी वृत्तपत्रातून वाचले आहे. पण विमानतळ बनविणे, मोठें धरण बांधणे, वीज प्रकल्प उभा करणे ही कार्यें संस्थानच्या कार्यकक्षेच्या मर्यादेत बसणारी नाहीत. संस्थानच्या ध्येय व उद्दिष्टांच्या मर्यादेत राहूनच





विश्वस्त मंडळाला कार्य करण्याचा अधिकार आहे. पैसा आहे म्हणून विश्वस्त मंडळाला कोणतेही कार्य करण्याचे स्वातंत्र्य आहे अशी कृपया कोणी गैरसमजानेही मनाची समजूत करून घेऊ नये.

मा. आमदारसाहेबांना आम्ही आता विश्वस्त मंडळाबरोबर चर्चेसाठी निमंत्रित केलेले आहे. ते आले तर त्यांची नाराजी दूर होईल असा मला विश्वास वाटतो.

**(६) आपल्या या पुढील वर्षातील नव्या योजना-संकल्प काय आहेत ?**

**संगणकीकरण:-** मंदिर परिसरातील सर्व विभागाचे कार्य तत्परतेने व्हावे व त्यात अधिक सुचारूपणा यावा यासाठी आम्ही संगणकीकरणाचा निर्णय घेतला असून साधारणत: दिवाळी पर्यंत संगणकीकरण होणार आहे. त्यामुळे भक्तांना खोल्याचे वाटप झटपट होईल. खोल्या रिकाम्या आहेत का नाहीत हे थेट भक्तांना चार्ट पाहून कळेल.

**मंडपातील फोटो :-** समाधी मंदिराच्या मुख्य मंडपात श्री साईबाबांच्या समकालिनांचे फोटो होते. ते एक लहान-एक मोठा अशा स्वरूपात होते. ते सर्व एकाच आकाराच्या फ्रेम मध्ये करून त्यांच्या नावासह बसविण्यात येणार आहेत. हे काम दसरा उत्सवापर्यंत पूर्ण होईल.

**ध्वनीयंत्रणा :-** मंदिरातील आरती व अन्य कार्यक्रम सर्व भक्तांना उत्तम प्रकारे ऐकू यावेत म्हणून मंदिर व परिसरात अत्याधुनिक ध्वनीयंत्रणा बसविण्यात येत आहे. हे कार्यही दिवाळीपर्यंत पूरे करण्याचा विश्वस्त मंडळाचा प्रयत्न आहे.

**स्वयंपाकघर सुधारणा :-** प्रसादालयात भोजन करणाऱ्या भाविकांची वाढती व अवाढव्य संख्या लक्षात घेऊन तेथील स्वयपाकघरात आधुनिक यंत्रे-साधने बसवून नूतनीकरण करण्यात येणार आहे. हे कार्य सुद्धा लवकरच पूर्ण होईल.

**सोलर वॉटर हिटर :-** प्रायोगिक तत्त्वावर मंदिर परिसरातील दोन इमारतीवर 'सोलर वॉटर हिटर' बसविण्यात येणार असून गरम पाण्यासाठी यापुढे अशा प्रकारे सौर उर्जेचा अधिकाधिक उपयोग करून घेण्याचा विचार आहे.

**विस्तारीकरण :-** या योजनेत हॉस्पिटलची इमारत, आय.टी.आय. इमारत, शैक्षणिक संस्थाच्या **इमारती बांधणे** आदीचा समावेश असून भक्तांच्या मोटरगाड्या बस यांची वाढती संख्या लक्षात घेऊन एक उत्तम असा **'वहानतळ'** तयार करण्याची ही योजना आहे. तसेच भक्तांच्या सोईसाठी फॅक्स-पोस्ट-एस.टी.डी. आदी सर्व प्रकारच्या सुविधा परिसरात अधिकाधिक चांगल्या-प्रकारे उपलब्ध करून देण्याची एक योजना आहे. तूर्त नजीकच्या काळातील हे काही संकल्प-योजना असून मंदिर परिसराच्या विकास आराखड्यासाठी राष्ट्रीय स्पर्धा घेणे व त्याद्वारे सर्व **मंदिर परिसर एक आदर्श असे संकुल** बनविण्याची पुढील योजना आहे.

**प्रश्न :- आपल्या गेल्या वर्षभराच्या कारकिर्दीतील, श्रीचे सोन्याचांदीचे दागिने वितळविण्याचा निर्णय हा अत्यंत वादग्रस्त ठरला असून त्याबद्दल काही प्रश्न आहेत. ते असे :-**

**(१) प्रश्न :- घाईने निर्णय घेण्यांत आला का?**

- दि. २९.१.९५ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या सभेत, गेल्या वीसहून अधिक वर्षापासून साठत आलेल्या सोने-चांदीच्या हजारों लहान-मोठ्या किंमती वस्तू सांभाळण्याची जोखीम दिवसेंदिवस वाढत होती. त्याबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यामध्ये साईबाबांच्या मूर्ती सोडून (श्री. सिद्धी विनायक आदि इतर मंदिर ट्रस्ट करतात त्याप्रमाणे) इतर वस्तू मुंबई येथील सरकार मान्य नॅशनल रिफायनरीकडे पाठवून वितळवून त्याच्या समप्रमाणात लगडी करून घ्याव्यात व त्यांचा उपयोग करण्यासंबंधी यथावकाश निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

दि. १९.२.९५ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या सभेत वरील निर्णय सर्वानुमते कायम करण्यांत आला. त्याचप्रमाणे या सभेत पूर्वीच्या निर्णयानुसार सदर वस्तू आवश्यक ती सर्व पूर्तता व तयारी करून दि. २३.३.९५ रोजी मुंबई येथे पाठविण्यांत याव्यात असेही सर्वानुमते ठरले व दि. १०.३.९५ रोजी झालेल्या पुढील बैठकीत हा निर्णयही सर्वानुमते कायम करण्यांत आला. हे सर्व लक्षांत घेतां घाईने निर्णय घेण्यात आला हा आरोप सपशेल खोटा असल्याचे स्पष्ट होईल.

**(२) प्रश्न :- अनेक दागिने उत्कृष्ट कलाकृतीचे नमुने आहेत काय ?**

- अशा प्रकारच्या कलाकुसरीच्या सोने-चांदीची एकही वस्तू वितळविण्यात आलेली नाही. मा. धर्मादाय आयुक्त यांनीही या वितळविण्यांकरीता आणलेल्या वस्तू आपल्या अधिकाऱ्यांकडून खास अंट रॅण्डम तपासून घेऊन याची खातरजमा करून घेतली आहे.

**(३) प्रश्न :- निर्णयाबद्दल गुप्तता पाळण्यांत आली. याबद्दल आपले मत काय?**





- भक्तांकडून भेट म्हणून आलेल्या वस्तूंची देखभाल करणे, त्या सुरक्षित ठेवणे व संस्थानला उपयोगात न आणता येण्या सारख्या व गरज नसलेल्या वस्तूंची विल्हेवाट करण्याची जबाबदारी व त्या सबंधातील अधिकार विश्वस्त मंडळाला आहेत. विश्वस्त मंडळाचे हे दैनंदिन कामच आहे. त्यासंबंधात गुप्तता पाळण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जरी २३ मार्च, ९५ रोजी या मौल्यवान वस्तू शिरडी येथून मुंबईला आणण्याचे पूर्वीच (दि. १९.२.९५ रोजीच्या सभेत) ठरलेले होते तरी त्या दिवशी त्या मुंबईला घेऊन जाणारे वाहन शिरडीहून केव्हा प्रयाण करणार याबद्दल मात्र, सुरक्षिततेच्या दृष्टीने, गुप्तता पाळणे आवश्यक असल्यामुळे तशी गुप्तता पाळण्यांत आलेली होती. यात काही गैर झाले असे म्हणणे अविचारी होईल.

**(४) नामांकीत सराफाच्या सहकार्याने प्रक्रिया पूर्ण झाली काय ?**

- सन १९८५ साली सोने-चांदीच्या वस्तूंच्या किंमती ठरविणेकामी त्यावेळचे विश्वस्त, सराफ श्री. नेमीचंद एम. जैन यांची नेमणूक करण्यांत आली होती. त्याच धर्तीवर यावेळी विश्वस्त, श्री. वैशंपायन, ज्यांच्या कुटुंबाचा सराफाचा पिढीजात धंदा आहे, यांची व दुसरे एक विश्वस्त, श्री. रोहोम, चार्टर्ड अकौंटंट, यांची नेमणूक करण्यांत आली होती.

**(५) वितळविलेले सोने किती शुद्ध असेल, त्यात किती घट असेल याबाबत अनेक भक्तांना शंका वाटते. त्याबद्दल आपले म्हणणे काय ?**

- सोने वितळविणेसाठी नॅशनल रिफायनरी, मुंबई या सरकार-मान्य रिफायनरीकडे सोने चांदी पाठविण्या-विषयीचा निर्णय घेण्यात आला. श्री. सिद्धी विनायक मंदिर ट्रस्ट, श्री. महालक्ष्मी मंदिर ट्रस्ट, गुरू वायूर, स्टेट बँक ऑफ इंडिया इ. प्रतिष्ठीतन्यास तसेच सरकारी संस्थांचेही सोने-चांदी नॅशनल रिफायनरीकडेच वितळविण्यासाठी व शुद्ध करण्यासाठी पाठविले जाते. शुद्ध केल्यानंतर त्यावर शुद्धतेचा आणि वजनाचा शिक्का मारण्यांत येतो. ही वितळविण्याची व शुद्धीकरणाची प्रकिया संस्थानच्या प्रतिनिधींच्या समक्षच करण्यांत आली आहे. हे लक्षात घेता व इतरही तत्सम मंदीर ट्रस्ट याच रिफायनरीकडून आपल्याकडील सोने-चांदीच्या वस्तू वितळवून घेत असल्यामुळे तेथे काही गैरप्रकार होईल असे म्हणणे अतिशयोक्तीचे व पूर्वग्रहदूषितच म्हणावे लागेल.

**(६) वितळविल्यामुळे तोटा होईल त्यापेक्षा लिलाव करावा. भक्तगण चांगल्या भावात खरेदी करतील. असे आपणास वाटले नाही काय ?**

- असे म्हणणे वस्तुस्थितीस धरून नाही. सन १९८५ साली संस्थानने सोन्याच्या वस्तूंचा लिलाव करण्यासाठी मान्यवर वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. त्यावेळी जाहिरातीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च आला होता. तसेच आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था पोलिस खात्यामार्फत मागविण्यांत आली होती. परंतु प्रत्यक्ष लिलावाच्यावेळी भक्तांची उपस्थिती अत्यंत अल्प प्रमाणात आढळून आली व सराफांची उपस्थिती मात्र गटागटाने होती. सराफांनी केलेल्या रिंग (साखळी) मुळे सोने वस्तूंची वाजवी किंमत न आल्यामुळे संस्थानला ... जाहिरात, संरक्षण ह्या साठी आलेला भरमसाठ खर्च सोसून लिलाव मात्र रद्द करावा लागला. हा अनुभव लक्षात घेता व अनेक वर्षांपासून साठलेल्या वस्तूंची विविधता व फारच थोडी मागणी लक्षात घेता त्या वस्तूंचा लिलाव करणे सुरक्षिततेच्या व व्यवहारीपणाच्या दृष्टीने अशक्य आहे असा निर्णय मंडळाने पूर्ण विचारांती घेतला.

**प्रश्न :- संस्थानच्या मालकीचे सुमारे अडीच कोटी रूपयांचे सोने-चांदीचे अलंकार मुंबईत आणले हा प्रकार केवळ धोक्याचाच आहे असे नसून त्यात संस्थानचे व सर्व तमाम साईभक्तांचे आर्थिक व भावनीक नुकसान आहे. असे काही साई भक्तांचे मत आपण विचारात घेतले का ?**

उत्तर :- सदर वस्तू मुंबईस योग्य त्या पोलिस संरक्षणाने, विमा उतरवून, आणण्याची खबरदारी संस्थानने घेतली.

बाबांच्या दैनंदिन वापरातील कोणत्याही वस्तूंचा यात समावेश नाही. बाबांसाठी प्रत्यक्ष वापर करता न येणाऱ्या अशाच वस्तू यात समाविष्ट आहेत. या वस्तू वर्षानुवर्षे तशाच पडून राहिल्याने त्यांची जास्तीभ वाढत होती. त्यातून आर्थिक लाभ काहीच मिळत नाही, हाही मुद्दा गौण मानला तरी अगदी नजरआड करण्याजोगा नाही. उरला प्रश्न भावनीक नुकसानाचा. आपण एकदा देवाला वस्तू अर्पण केल्यानंतर त्यातून पुन्हा काही तरी आपणास मिळेल अशी भावना सर्वसाधारण भक्त ठेवत नाही असे वाटते. अशा वस्तूचा बाबांना काहीही उपयोग न होता नुसत्याच वर्षानुवर्षे पडून राहिल्या तर त्यातून भावनेला



अधिक तडा जातो. त्यापेक्षा अशा वस्तुपासून आर्थिक निधी उभारल्यास भक्तांनी दिलेली वस्तू बाबांपर्यंत पोहोचली एवढेच नव्हें तर दिलेल्या देणगीचा विनियोग धर्मादाय व लोक-कल्याणाच्या कार्यासाठी झाला याचे समाधान निश्चतपणे भक्तांना मिळेल.

**प्रश्न : नामवंत प्रशासकीय अधिकारी म्हणून आपली प्रदीर्घ कारकिर्द व दांडगा अनुभव लक्षात घेता शिरडी संस्थानच्या व्यवस्थापन कारभारात मात्र त्याचा पाहिजे एवढा प्रभाव दिसून येत नाही, पूर्वीप्रमाणेच गलथानपणा जाणवतो, अशी टीका ऐकण्यात येते. कदाचित आपण मुंबईत असता म्हणून असे घडते काय ?**

उत्तर :- मी मुंबईत राहत असलो तरी माझा शिरडीशी नित्याचा संपर्क असतो. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सभा मी कटाक्षाने शिरडी येथेच घेतो व त्यामुळे तेथे जाणे हे नियमीतपणे होतेच. शिवाय इतरही प्रयोजने वेळोवेळी येतात व त्यावेळीही मी जातो. कोणताही विशेष दिवस वा उत्सव असला की मी शिरडीस २-३ दिवस राहातो. शिरडी येथील माझ्या वास्तव्याचे दरम्यान मी सर्वांना मुक्तपणाने भेटतो, खुलेपणाने चर्चा करतो. मला तरी कारभारात लोक म्हणतात तसा गलथानपणा वाटत नाही. आक्षेप घेणारे लोक नेमके कशाला गलथानपणा म्हणतात तेच मला कळत नाही. त्यांचे मोजमाप काय हेही मला समजत नाही.

दैनंदिन व्यवहारावर शिरडीत बसून पंतोजीसारखे नियंत्रण ठेवावे अशी लोकांची अपेक्षा असेल तर ती पूर्णपणे चुकीची आहे. दैनंदिन कार्य संचालन हा तेथील कार्यकारी अधिकाऱ्याचा प्रांत आहे, अध्यक्षाचा नव्हे. हे लोकांनी लक्षात घेतले पाहिजे. संस्थानला पाहिजे तेव्हढे कार्यक्षम अधिकारी पूर्णवेळ स्वरुपात मिळत नाहीत. ही सर्वात मोठी समस्या आहे. त्याचे कारण म्हणजे तेथे होणारा विविध प्रकारचा हस्तक्षेप व काकदृष्टीने कोणाला तरी, अनेकदा अतिशयोक्तीने वा काल्पनिकपणे, दोषी ठरविण्याची, अपराधी म्हणण्याची वृत्ती आणि पद्धत. अशा वातावरणात कोणीही अधिकारी तेथे जाण्यास नको म्हणतो. जे अधिकारी मिळतात ते टिकत नाहीत. हा तेथील वातावरणाचा दोष आहे असेच म्हणावे लागेल. दैनंदिन कारभारात काही त्रुटी असू शकतात पण त्याला गलथानपणा म्हणणे व त्याबद्दल थेट अध्यक्षांनाच दोष देणे अत्यंत गैर आहे.

गलथापणामुळे खरेदी व्यवहारात भ्रष्टाचार झाला वगैरे काहीजण आरोप करतात पण ते बिनबुडाचे आहेत. त्यांनी पूर्ण माहिती न घेताच तसे आरोप केलेले आहेत. उलट प्रसादालयातील धान्य खरेदी असो वा अन्य कोणीतीही खरेदी असो, त्याबाबत आम्ही रीतसर वृत्तपत्रात नोटीस देतो, टेंडर मागवितो, उपस्थित विश्वस्तांपुढे टेंडर फोडतो. टेंडर भरणाऱ्या प्रत्येक उपस्थित पुरवठादाराशी वाटाघाटी करतो आणि सर्वात कमीदर असेल त्यास ऑर्डर-काम देतो, त्यांचेकडून खरेदी करतो. यामुळे इतका पारदर्शक व्यवहार ज्यांना नको असतो ते लोकच ओरड करण्याची शक्यता अधिक. भक्तांच्या निवासासाठी ४५० जादा खोल्या खुल्या केल्या त्यामुळे म्हणे शिरडीतील अनेक हॉटेलांवर बंद पडण्याची पाळी आली. आता ही ओरड कितपत योग्य आहे ? स्वत:च्या हितसंबंधाना बाधा आली की लोक ओरडतात आणि बहुतांश आक्षेपांच्या मुळाशी प्रामुख्याने हाच हितसबंधांचा विषय आहे.

हे लक्षात घेऊन आम्ही साईबाबांना स्मरून व तुकाराम महाराज म्हणतात तसे 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही।'' या भावनेने स्वत:च्याच सद्सद्विवेकबुद्धीला साक्षी ठेवून कार्य करत राहण्याच्या दृढ निश्चय केला आहे. आपल्या कार्याने ९९ माणसे संतुष्ट होतात. दुवा देऊन निघून जातात. पण जो १ माणूस असंतुष्ट राहतो तो मात्र जागोजाग ओरडत राहतो. काही हितसंबंध दुखावलेले असंतुष्ट लोक हेतू पुरस्सर गोबेल्स नीतीचा वापर करतात. त्यामुळेही गैरसमज होतो व खात्री करून न घेण्याच्या प्रवृत्तीमुळे तो वाढत जातो असे मला वाटते. बाबांसह अनेक साधूसंतांनाही काही विघ्नसंतोषी माणसांनी विविध दोषारोपाने छळलेले आहे, हेंही तुम्ही लक्षात घ्या. आमच्या कारभारात सर्व अगदी आलबेल आहे. सुधारणेला कांही वावच नाही असे मात्र मला मुळीच म्हणावयाचे नाही. हेतुपुरस्सरपणे वा निष्काळजीपणे गैरव्यवहार सतत वा मोठ्या प्रमाणावर होत आहेत, त्याकडे कुणाचेच लक्ष नाही या आक्षेपात मात्र मुळीच तथ्य नाही हे मात्र पुनश्च ठामपणे सांगू इच्छितो. प्रशासनात कोणकोणत्या सुधारणा केल्या वा हाती घेतल्या आहेत हें सविस्तरपणे या पुढे वेगळ्या मुलाखतीद्वारे अवश्य सर्वांपुढे मांडेन.

卐 卐 卐



# दत्त संप्रदायी योगेश्वर




– गजानन कुलकर्णी

महाराष्ट्रात दत्त संप्रदायाची परंपरा अगदी प्राचीन आहे. या संप्रदायातील योगी सत्पुरूषांनी आपल्या कार्याने समाजात धर्मभावना सतत जागती ठेवली. गजानन महाराज (शेगाव), अक्कलकोटचे स्वामी समर्थ आणि श्री साईबाबा यांना दत्त संप्रदायी अवतार मानले जाते. या संप्रदायात अनेक योगी झाले रघुनाथ भटजी नाशिककर हे त्यापैकीचे एक होत.

श्री रघुनाथ महाराज यांना भृगूंचा अवतार मानले जाते. नाशिकला गोदातीरी त्यांची समाधी असून त्या स्थानास अद्वैतेश्वर म्हणून ओळखले जाते.





महाराष्ट्रात श्री दत्त संप्रदायाची परंपरा फार प्राचीन आणि मोठी आहे. महाराष्ट्राच्या काना कोपान्यात दत्त भक्ती रुजलेली आहे. घराघरात श्रीदत्तपूजन, भजन, आर्चन आजही अव्याहत सुरू असलेले दिसते. प्रत्यक्ष श्री दत्ताने या भूमित वास्तव्य करून ही भूमी पुण्य पावन करून टाकलीच परंतु त्यानंतर अनेक अवतारी, साक्षात्कारी दत्त संप्रदायी योगेश्वरांनी ही भूमि आपली म्हणून निवडली. येथे वास्तव्य केले, लाखो भाविकांना संकटमुक्त केले आणि ह्या दत्त संपद्रायी भक्तीची ध्वजा गगनोदरी अविरत तळपत ठेवली. अर्वाचिन काळातील तीन दत्तावतार म्हणजे अक्कलकोटचे श्री स्वामीसमर्थ, शिर्डीचे श्री साई बाबा आणि शेगांवचे श्री गजानन महाराज ही तर आज महाराष्ट्राची प्रमुख दैवतेच आहेत. परंतु यातील प्रमुख अवतारी पुरुषां व्यतिरीक्त महाराष्ट्रात असे अनेक लहान मोठे योगेश्वर आजवर होऊन गेले आहेत. काही आपल्या किर्तीने त्या त्या काळी प्रसिद्ध तर काही अज्ञातच राहीले. अशा योगी पुरुषांची माहिती आपण या लेख मालिकेद्वारे आपण करून घेणार आहोत.

इ. सनाच्या सतराव्या रघुनाथ भटजी नाशिककर शतकात नाशिक शहरात रघुनाथ भटजी नाशिककर नावाचे फार मोठे योगी पुरुष होऊन गेले आपण आज प्रथम त्यांच्याविषयी माहिती घेऊ. याची पूर्वपीठिका सांगताना असे म्हणतात की पूर्वी कृतयुगात रेवातीरी म्हणजे नर्मदा नदीच्या तीरी एका रम्यस्थळी भृगुऋषी अनुष्ठानास बसले होते. त्यांनी भगवंताचे ध्यान करून समाधी लावली. त्यांची ही समाधी बहुकाळ पर्यंत टिकली. कृत, त्रेता, द्वापार अशी तीन्ही युगे संपली तरी त्यांची समाधी उतरली नाही. पुढे कलियुग आले, बरीच वर्ष लोटली एके दिवशी मुनीसमाधीतून अकस्मात जागे झाले व शिष्यास हाक मारून विचारू लागले की, 'हे युग कोणते चालू आहे ?' त्या शिष्याने सांगितले महाराज कृत त्रेता, द्वापार अशी तीन्ही युगे जाऊन सांप्रत कलियुग प्राप्त झाले आहे. तीन युगापर्यंत समाधि अवस्थेत काळ गेला हे पाहून भृगु मुनीस आश्चर्य वाटले.

## ॥ भृगूक्षेत्र ॥

रेवातीरी त्यावेळी इतरही काही मुनी तप करीत बसले होते. एके दिवशी भृगुमुनींनी गोदावरीचे महात्म्य ऐकले व तेव्हांपासून गोदावरीत वास करावा अशी इच्छा त्यांस झाली. मुनींच्या बरोबर जे इतर शिष्य, ऋषी गण होते त्यास मुनी म्हणाले की एखाद्या सुचिष्मंत ब्राह्मणाच्या पोटी मी जन्म घेऊन गोदातटाकी वास वास करतो; तुम्ही ही अशाच प्रकारे जन्म घेऊन मजकडे या. मी तुम्हांस बोध देऊन मुक्त करीन. संसार बंधात पडू देणार नाही. याप्रमाणे सांगताच सर्व शिष्यास आनंद झाला व मुनीबरोबर आपणही जन्म घ्यावा असे त्यांनी ठरविले.

ठरल्याप्रमाणे भृगुमुनी सर्व शिष्यांसह रेवातीरी सौराष्ट्रात एका रम्य उपवनी येऊन दाखल झाले. तेथे त्यांनी एक सुंदर मठाची स्थापना करून भगवच्चिंतन सुरु केले. त्या स्थानास आजही भृगुक्षेत्र असेच संबोधले जाते. जेथे नर्मदा समुद्राला मिळाली आहे त्याच्या निकट सौराष्ट्रात हे स्थान आहे.

## ॥ त्रिकालज्ञानी पुत्राची मागणी ॥

त्या भृगुक्षेत्रात 'ज्ञानवर्धन' नावाचा एक सदाचारी ब्राह्मण रहात असे. त्यास पुत्र नव्हता. त्याची पत्नी आणि तो दोघेही निस्सिम शिवभक्त होते. ते नित्य शिवलिंगाची पूजा करून 'हे प्रभो शिवशंकरा मला भृगुसमान त्रिकालज्ञानी उत्तम पुत्र दे' अशी प्रार्थना करीत असत. बराच काळ गेला परंतु पुत्र प्राप्तीची लक्षण दिसेना अखेर एक दिवस कंटाळून त्या दांपत्याने नित्याप्रमाणे शिवपूजन व प्रार्थना करून नर्मदेमध्ये आपला देह विसर्जित केला. शंकराला तात्काळ ही गोष्ट कळली; त्याबरोबर स्वत: शिवशंकर उमेसह रेवातीरी जेथे भृगुऋषी अनुष्ठानास बसले होते त्या ठिकाणी येऊन दाखल झाले शिवशंकराबरोबर दत्तात्रेय, याज्ञवल्क्य, वसिष्ठ, व्यास, अत्री आदी ऋषीमंडळीही त्या ठिकाणी आली. साक्षात शंकर उमेसह आपल्या आश्रमात आले आहेत असे पाहताच भृगुमुनींनी आनंदीत होऊन उमा शिवास साष्टांग वंदन करून त्यास आदराने आसनावर बसविले व काय आज्ञा आहे म्हणून विचारले. त्यावर शंकर म्हणाले 'हे भृगो ! शिवभक्त ज्ञानवर्धन द्विज पत्नीसह माझे स्मरण करीत पुत्रार्थ या नर्मदेत देहत्याग करिता झाला हे मला कळले; म्हणून मी येथे त्वरित आलो आहे. त्याच्या उदरी तुम्हाला आणि आम्हालाहि जाणे जरुर आहे. त्या भक्ताचे मनोरथ पूर्ण करणे प्राप्त आहे. शिवाच्या अशा तऱ्हेच्या बोलण्यास पार्वतीनेही संमती दर्शविली. तिचे व शिवाचे बोलणे ऐकून दत्तात्रेय, वसिष्ठ वगैरे मंडळी म्हणाली 'हे भृगो ! हे सर्वश्रेष्ठा सर्वज्ञा ! तू त्या द्विजाच्या पोटी जन्म घेणार, असेच उमा व शिवही घेणार हे ऐकून आम्हास आनंद झाला. आम्ही सर्व आपल्या संगतीचा व दर्शनाचा लाभ घेण्यासाठी अवश्य गोदातटाकी अवश्य येऊ. असे म्हणून ते सर्व अदृश्य झाले. उमा आणि शिवशंकरही अंतर्धान पावले. शिवाचीच आज्ञा झाली असल्याने त्या द्विज दांपत्याच्या पोटी जन्म घेणे प्राप्त आहे असा विचार भृगु मुनींनी केला; आणि आपल्या शिष्यगणास सांगितले की 'तुम्हीही निरनिराळ्या सत्पात्र द्विजांच्या उदरी जन्म घ्याल व माझ्याकडे पुन्हा येऊन पुनीत व्हाल. त्यावेळी मी तुमचा मोहपाश छेदून तुम्हांस मुक्त करीन. असे सांगून भृगु पुन्हा रेवातीरी तपश्चर्येस बसले आणि ठरल्या वेळी त्या द्विजापोटी जन्म घेण्यासाठी देहत्याग करीते झाले.





पुढे कर्नाटक प्रांतातील मलप्रभा नावाच्या नदीच्या तीरी अशोक नावाचे एक क्षेत्र आहे, तेथे विश्वनाथ भट अळवणीकर नावाचे एक सत्वस्थ ब्राह्मण राहात असे. त्याच्या पत्नीच्या उदरी शिवभक्त ज्ञानवर्धन विप्राने जन्म घेतला. त्याचे जन्मप्रसंगी मलप्रभेच्या जलात साक्षात भागीरथी तीन दिवस पर्यंत राहिली होती. दरवर्षी त्या दिवसात तेथे भागीरथी येते अशी साक्ष अद्याप आहे असे म्हणतात. त्या दिवसात तेथे स्नान केले की; भागीरथी स्नानाचे पुण्य लाभते अशी आख्यायिका आहे.

## ॥ स्वप्नदृष्टांत ॥

ह्या बालकाच्या जन्माच्या वेळी तेराव्या दिवशी विश्वनाथ भटजींनाएक स्वप्न पडले. त्यांच्या स्वप्नात साक्षात गणपती आला आणि म्हणाला, 'विश्वनाथ! तुझ्या पोटी जो मुलगा जन्मला आहे तो सामान्य जीव नसून तो पूर्वीचा मोठा तपस्वी ब्राह्मण आहे. त्याचे नाव गणपती ठेव. त्याचे पोटी भृगुऋषी, शंकर व पार्वती असे जन्म घेऊन जगाचा उद्धार करतील. म्हणून तू त्या तिघांचा चांगला सांभाळ कर' असे सांगून गणपती अदृश्य झाले. सकाळी उठल्यावर विश्वनाथ भटजीने ते सर्व स्वप्न आपल्या पत्नीस सांगितले. तिलाही ते स्वप्न ऐकून अत्यानंद झाला. तिने अनेक सुवासिनींना बोलावून त्या बाळाचे बारसे केले आणि बाळाचे नाव गणपती असे ठेविले. हळूहळू बाळ मोठा होऊ लागला. आठ वर्षाचा झाल्यानंतर त्याची मुंज करण्यात आली. त्याच सुमारास त्याच श्रेत्री काशीनाथ भटयोगी यास एक कन्या झाली. तिचे नाव त्यांनी चिमाबाई असे ठेवले. त्या श्रोत्रीच्या स्वप्नात गणपती गेले आणि म्हणाले, 'तुझी मुलगी विश्वनाथभटाचा मुलगा गणपती यास दे'' नंतर काशीनाथ भटांनी या स्वप्नाची हकीकत आपल्या पत्नीस सांगून तीचि संमती घेतली आणि चिमाबाई गणपतीला देण्याचे निश्चित केले; आणि एक उत्तम सुमुहुर्त पाहून त्यांचे लग्नही लावून दिले.

लग्न झाल्यावर आणखी एक चमत्कार घडला. गणपती तसा वयाने लहानच होता तरी नित्य त्रिकाल स्नान, संध्या, शिवपूजा असा त्याचा नेम होता. शिवरात्र, एकादशी अशीव्रते तो नियमाने पाळीत होता. एकदा माघ वद्य एकादशीच्या दिवशी सोमवार होता त्यामुळे त्या दिवशी महापर्वकाळ आला होता ही पर्वणी साधण्याच्या निमित्ताने त्या दिवशी कडक ऊन पडून, जमिन तापली असताना बालगणपती दुपारच्या वेळी मलप्रभेत उतरला. त्याने मलप्रभेच्या डोहात बुडी मारली. त्याच वेळी त्या ठिकाणी जलदेवता जलक्रिडा करण्यासाठी तेथे आल्या होत्या. त्याच्या दृष्टीस हा गणपती पडला आणि त्यांनी त्यास उचलून नेले आणि एका उत्तम अशा जलमंदिरात नेऊन ठेवले.

## ॥ शिवोपासना फलद्रूप ॥

इकडे काठावरील लोक गणपती बुडाला म्हणून आक्रोश करू लागले. पाण्यात उतरून त्याचा शोध घेऊ लागले. परंतु गणपती कुणास सापडेना अखेरही वार्ता विश्वनाथभटाच्या पर्यंत जाऊन पोहोचली त्याक्षणी ती माता पिता फार शोक करू लागले. नदीतीरी जाऊन त्यांनी टाहो फोडला; आणि शंकराचा धावा सुरु केला. स्वप्न खोटे कसे ठरले म्हणून ते शोक करू लागले. त्या दोघांना शोक अनावर झाला आणि पूत्रापाठोपाठ आपणही त्या डोहात देहत्याग करावा असे वाटू लागले. तीन दिवस पर्यंत अन्नपाणी वर्ज करून ते दोघे डोहावर शंकराची प्रार्थना करीत बसले. त्यांची हाक शिवाच्या कानी पोहोचली त्याबरोबर त्रिशूल हाती घेऊन शिव उठले आणि त्या नदीतीरी आले. त्यांनी तात्काळ डोहात शिरुन जलदेवतांच्या मंदीरामधून गणपतीस उचलून वर आणले आणि त्याच्या मातापित्याच्या स्वाधीन केले. तो दिवस शिवरात्रीचा होता. त्यांची शिवोपासना अशा तऱ्हेने फलद्रूप झालेली पाहून त्यास अत्यानंद झाला. मृत्युशय्येवर पडलेल्या व्यक्तीला अमृत मिळावे किंवा दरीद्रयास अचानक द्रव्यकुंभ हाती यावा तसेच त्या माता पित्यांना होऊन गेले. त्यांनी अतिप्रेमाने आपल्या पुत्राला अलिंगन दिले आणि ते शिवाची स्तुती करू लागले आणि ज्या ठिकाणी पुत्र बुडाला आणि परत मिळाला त्या ठिकाणी त्यांनी स्वयंभू शिवलिंगाची स्थापना करून ब्राह्मणा कडून त्याचे पूजन आणि ब्रह्मसंतर्पण केले.

त्यांनतर गणपती उर्फ गणेशभट व त्यांची पत्नी चिमाबाई मोठ्या आनंदाने नांदू लागली. चिमाबाई महान पवित्र आणि मोठी लावण्य खाणी होती. दोघेही परमशिवभक्त होते. एके दिवशी कर्पूरगौरांनी चिमाबाईच्या उदरात प्रवेश केला व नऊ महीने पूर्ण होताच गणेशभटाच्या घरी जन्म घेतला. चिमाबाईला एक सुंदर पुत्ररत्न झाले. त्याचे नांव 'नारायण' असे ठेवण्यात आले. दुसऱ्या वर्षी चिमाबाईस एक मुलगी झाली. ती साक्षात पार्वतीच तिच्या उदरी आली होती. तिचे नाव 'जीऊबाई' असे ठेवण्यात आले.

इकडे रेवातीरी तपश्चर्येस बसलेल्या भृगुमुनीस अंतर्ज्ञानाने कळले की, शिव पार्वतींनी चिमाबाईच्या पोटी जन्म घेतला आहे. तेव्हा आता आपल्यालाही जन्म घेण्यास गेले पाहिजे. नंतर त्यांनी आपल्या सर्व शिष्यगणास बोलाविले व सांगितले की, मी चिमाबाईच्या उदरी जन्म घेत आहे. तुम्हींही स्वेच्छेने या कलीत अवतरण करावे व मला गोदातटाकी भेटण्यास यावे; असे सांगून आपण एका गुहेत गेले आणि गुप्त झाले.

काही वर्ष गेली एके दिवशी गणेशभटाची बायको निद्रिस्त असता तिच्या नेत्राद्वारे भृगुमुंनीनी तिच्या उदरात प्रवेश केला. नऊ महिने पूर्ण होताच ती प्रसूत झाली तिची ही प्रसूती अतिविचित्र होती. गणेश भटाची बायको तिसऱ्या मजल्यावर निद्रिस्त असता तिला स्वप्न पडले की, आपणास पुत्र झाला आहे व तो नऊ





महीन्याचा असतानाच रांगू लागला आहे. दिसायला तो अत्यंत गोजिरवाणा आणि मोहक आहे. ती जागी झाली आणि पाहते तो काय एक अत्यंत लावण्यवंत पुत्र तिला तिच्या जवळ असलेला दिसला. या बाळंतपणात तिला कोणत्याही प्रकारे त्रास झाला नाही. 'दर्शनें प्रशस्तीसी ठावो' या ज्ञानेश्वर महाराजांच्या वचनाप्रमाणे त्या मुलास पाहताच त्रिदेहातीत होऊन ती स्वरुपी निमग्न झाली. आपपरभेद सर्व मावळला; इतक्यात समाचारार्थ गणेशभट तेथे आले ते हसत असलेले बालक पाहताच त्यांचे देहभान गेले व मन उन्मन झाले आणि त्यांनाही सहजसमाधि अवस्था प्राप्त झाली. सात दिवस पर्यंत दोघांचीही समाधि उतरली नाही. मात्र त्यांची स्थिती पाहून लोकांना वाटले की या दोघांना भूतांनी पछाडले असावे. काहीजणांना तर वाटले की यांना वेड लागले असावे. सात दिवसपर्यंत बाळाचे संगोपन घरातील इतर मंडळींनीच केले. मातेला शुद्धच नव्हती. आठव्या दिवशी दोघांची समाधी उतरली त्यावेळी ती इतरांस म्हणाली आम्ही केवढ्या आनंदसागरात निमग्न होतो आम्हांला जागे कां केले ?

## ॥ रघुनाथ महाराज ॥

त्यांनतर पुत्रप्राप्तीच्या आनंदाप्रित्यर्थ गणेशभटजींनी द्विजवृंदास पाचारण केले आणि त्यांना वस्त्रभूषणे देऊन संतुष्टित केले. बाराव्या दिवशी घरात सुवासिनी चा मेळा जमला. बाळाचे बारसे करण्यात आले आणि सुमुहुर्त पाहून बाळाचे नांव 'रघुनाथ' असे ठेवण्यात आले. हेच पुढे रघुनाथ भटजी महाराज म्हणून प्रसिद्धीस आले.

शुक्लेन्दुवत रघुनाथ वाढू लागला. एके दिवशी रघुनाथला पाठीशी घालून माता निजली होती. तीन प्रहर रात्र होऊन गेली होती. अचानक जाग आली. ती उठून बसली आणि बाळाला शोधू लागली. त्यावेळी तो बाळा देवघरात मांडी घालून ध्यानस्थ बसलेला तिला दिसला. नंतर बऱ्याचे वेळाने तो शुद्धीवर आला. हा प्रकार पुढे तर नित्याचाच होऊन गेला. बाळाचे हे अतर्क्य पाहून गणेशभटाची भार्या त्यास म्हणाली की, हा मुलगा पूर्वीचा कुणीतरी योगीराज असावा. या मुलास झोप मुळीच नाही. आसन घालून हा नेहमीच ध्यानस्थ बसलेला असतो. भार्येचे ते बोलणे ऐकून गणेशभटास आठवण झाली की, आपल्या वडीलांच्या स्वप्नात गणपती आला होता; व त्याने सांगितले होते की शंकर, पार्वती व भृगू हे तुमच्या मुलाच्या पोटी येतील. ते स्वप्न खरे ठरले व आपले पूर्वपुण्य उदयास आले. परंतु ही मुले कार्तिकस्वामीप्रमाणे केव्हाच उठून निघून जातील; म्हणून जपले पाहिजे. गणेशभटजीचे लक्ष चुकवून ही दोन्ही मुलें अगदी पहाटेस उठून अरण्यात जात आणि मध्यान्ह टळून गेल्यावर पुन्हा घरी परत येत.

पुढे त्या दोघांही मुलांचे उपनयन आणि जीऊबाईचे लग्न लावून दिले. त्यांनतर नारायण आणि रघुनाथास मुली सांगून येऊ लागल्याने त्यांच्या लग्नाची तयारी सुरु झाली. दोघांसाठी दोन मुली पसंत करून लग्नाच्या तिथी ठरविणेत आल्या. प्रथम तिथीला नारायणाचे लग्न लावण्यात आले. दुसऱ्या तिथीला रघुनाथाचे लग्न व्हावयाचे होते ही गोष्ट रघुनाथाला कळली त्याबरोबर रात्रीच्या वेळी माता पित्याचा त्याग करून रघुनाथ घरातून निघून गेला. गिरीकंदरे ओलांडून तो पुढे जाऊ लागला. तिथे अनेक हिंस्त्र पशूंशी त्याची गाठ पडली. परंतु ते हिंस्त्र पशू त्याच्याकडे नुसते पहात आणि पुढे निघून जात. ''चित्तशुद्ध तरी शत्रू मित्र होती। व्याघ्रही न खाती सर्पतया ॥'' या तुकाराम महाराजाच्या वचनाप्रमाणे अरण्यात व्याघ्रसिंहाच्या गाठी पडूनही रघुनाथ सुरक्षित आणि निवांत राहीला.

प्रवास करीत करीत रघुनाथ एका उपवनात आला. पाच दिवस सारखा पायी, अनवाणी एका वस्त्रानिशी काहीही न खाता पिता प्रवास झाला. त्यामुळे शरीराला अत्यंत शीण आला म्हणून एका झाडाखाली त्याने विश्रांती घेतली आजूबाजूला पडलेली फळ भक्षण करून जवळून वाहणाऱ्या झऱ्याचे पाणी प्राशन करून हरी चिंतनात रघुनाथ निमग्न झाला.

## ॥ नाशिक येथे आगमन ॥

येणारे जाणारे मार्गस्थ प्रवासी त्याच्याकडे पहात आणि त्याचे तज पाहून हा कुणीतरी योगी असावा असे म्हणून त्यास नमस्कार करून पुढे जात. त्यावेळी रघुनाथाचे वय होते अवघे बारा वर्षाचे. एका प्रवाश्याने मात्र थांबून नम्रपणे त्याला विचारले महाराज! आपण कोण ? कोठे जावयाचे ? रघुनाथाने आपले नाव सांगून मला नाशकास जावयाचे आहे असे सांगितले. त्यावर ते मार्गस्थ म्हणालेआम्हांलाही तिकडेच जावयाचे आहे. आपण आमच्याबरोबर चलावे. रघुनाथ त्यांच्याबरोबर पुढे जावू लागला. जाता जाता दोन प्रहराचा समय झाला. लोक म्हणाले, 'महाराज ! आम्ही थोडा फराळ करतो आपण आमच्या बरोबर थोडे खाणार काय ? त्यावर तो बालयोगी उत्तरला गोदातटाकी गेल्यावाचून मी निराहारी राहणार आहे. पुढे दरमजल करत ते नाशकास येऊन पोहोचले. ती पावन (गंगा) गोदवरी पाहताच रघुनाथास अत्यंत आनंद झाला व त्याने तिला सादर प्रणाम केला. गोदावरीलाही हा महात्मा मला पवित्र करण्यासाठी येथे आला आहे हे पाहून आनंद झाला. तिने उत्साहाने उचंबळून तरंगित होऊन आपला आदर आणि आनंद व्यक्त केला आहे. साधुपुरुषांच्या दृष्टीक्षेपानेही तीर्थास तीर्थत्व येते; मग त्या जलात स्नान केल्यावर कां येणार नाही ? तीर्थे पाण्यांचे पाप घेताल आणि ते पाप पुण्यवंताच्या दर्शन, स्पर्शाने नाहीसे करतात. दोघांनाही मंनोमनी आनंद झाला; अशा प्रकारे रघुनाथ नाशकास येऊन स्थीर झाला.





इकडे रघुनाथ घरातून नाहीसा झाल्यामुळे घरात सर्वत्र चिंतेचे वातावरण पसरले चहुकडे त्याचा शोध सुरु झाला. परंतु त्याचा कुठेच पत्ता लागेना. माता पिता दोघेही शोकमग्न झाले. नारायणाचे लग्न झाल्यावर दुसऱ्या तिथीस चारपांच दिवसांनी रघुनाथाचे लग्न व्हायचे होते. त्याप्रमाणे सर्व तयारी दोन्ही पक्षाकडून झाली होती. परंतु अचानकपणे रघुनाथ नाहीसा झाल्यामुळे त्यांना परमावधीचे दुःख झाले. माता चिमाबाई तर धरणीवर अंग टाकून रडू लागली. दोघांनी अन्नपाणी वर्ज्य केले. रघुनाथ ! रघुनाथ ! तू आम्हांस कधी भेटशील ? असा दोघांनी टाहो फोडला. लोकांनी त्यांचे सांत्वन करण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु त्यांचा शोक मात्र काही केल्या कमी होईना. अखेर त्या दोघांनी निश्चय केला की रघुनाथाच्या शोधार्थ काशीस जावयाचे तेथे तो सापडला तर ठीक अन्यथा नश्वरदेह गंगेला अर्पण करावयाचा. मनोमनी असा निश्चय करून दोघे काशीस गेले. तिथे त्यांनी आपल्या पूत्राचा रघुनाथाचा खूप शोध केला पण तो कुठेच आढळून आला नाही. रघुनाथ तिथे नव्हताच तर सापडणार कुठून ? अखेर निराश होवून दोघांनी काशी विश्वेश्वराचे दर्शन घेतले आणि भागिरथीच्या अथांग पात्रात आपले देह विसर्जित केले.

नाशिकात आल्यावर रघुनाथ गोदावरीच्या दक्षिण तीरी गोदावरी न्याहाळीत बराच वेळ उभा होता. नंतर त्याने स्वच्छ जागा पाहून तिथे थोडी विश्रांती घेतली. काही वेळानंतर रघुनाथाने गोदावरीत स्नान केले. संध्यावंदन आणि ध्यान धारणा आटोपली; आता त्याला भूक लागली होती. परंतु त्याने कोणाकडेही अन्नाची याचना केली नाही. गोदावरीचे जलपान करून तो स्वस्थ पडून राहीला. या प्रमाणे सात दिवस निघून गेले. रघुनाथ स्वस्थ चित्ताने पडून होता. भगवद् चिंतनात निमग्न होता. गोदावरी तटी अनेक यात्री जमत होते. परंतु रघुनाथ कुणाजवळही बोलत नव्हता की काही सांगत नव्हता. त्याने मौनव्रत धारण केले होते.

## ॥ फडकेंच्या घरी वास्तव्य ॥

त्याचवेळी नाशिकातील बाजीराव बळवंत फडके नावाचे सदाचारी गृहस्थ फिरत फिरत गोदावरीतटी आले आणि त्यांचे लक्ष रघुनाथावर पडले त्यांना पहिल्या दृष्टीक्षेपातच ह्या बाल योगेश्वरांचे आकर्षण वाटू लागले आणि ते अधिक विचारपूस करण्यासाठी पुढे सरकले. त्यांनी रघुनाथाची आस्थापूर्वक चौकशी सुरु केली. परंतु रघुनाथ काहीच बोलेना. परंतु फडके यांनी आपला हेका सोडला नाही. अखेर रघुनाथाने त्यांना आपली ओळख सांगितली. त्यावर फडके यांनी आपल्या घरी चलावे असा आग्रह धरला. रघुनाथ तयार होईना. परंतु त्यांचा फारच आग्रह झाल्याने रघुनाथ त्यांचे घरी आला. त्यांनी त्यांस जेऊ घातले आणि आता इथे आमच्याकडेच रहा असे सांगितले. हे पहा; देवघरात आमचे देव आहेत. त्यांची पूजा करायची आणि जोगळेकर शास्त्र्यांकडे जाऊन संस्कृत ग्रंथांचे अध्ययन करायचे एवढेच तुझे काम. बोल आहे ना कबूल ?

रघुनाथाने त्यांचे म्हणणे मान्य केले आणि दररोज घरची पूजा वैगेरे झाल्यावर तो नित्य रघुनाथ दीक्षित जोगळेकर यांचेकडे शिकण्यास जाऊ लागला. त्यावेळी जोगळेकर हे मोठे पंडित म्हणून गणले जात असत. त्यांच्याजवळ रघुनाथाने समग्र दशग्रंथ थोडक्या दिवसातच मुखोद्गत केले.

ते पाहून जोगळेकर व इतर सर्व शास्त्री मंडळीस आश्चर्य वाटले; व रघुनाथाची त्यांनी फार प्रशंसा केली. रघुनाथ हा ज्या वेळी जोगळेकर शास्त्री यांच्याकडे शिकण्यासाठी जात असे त्या वेळी जायला उशिर झाला तर तो भूमीला पाऊल न लावता अधांतरी वेगाने जात असे हे कांही विद्यार्थ्यांनी पाहिले आणि त्यांनी ही हकीकत आपल्या गुरुजींना सांगितली; परंतु गुरुजींना ही गोष्ट मात्र खरी वाटेना मात्र कालांतराने मुलाचे हे म्हणणे खरे असल्याचे सर्वांच्या लक्षांत आले आणि रघुनाथाची योग्यता त्यांना पटू लागली

त्यानंतर एके दिवशी फडके यांच्याघरी असाच एक प्रसंग घडला. देव घरात रघुनाथ पूजेला बसला होता. पूजा आटोपल्यावर त्याची ध्यानधारणा सुरू झाली. ती सुरु होताच रघुनाथ एकाएकी गुप्त झाला. फडके यांनीबराच शोध केला परंतु तो कुठेच दिसला नाही, म्हणून त्यांनीदेवघराचे दार बाहेरून लावून घेतले. थोड्यावेळाने फडके यांनी देवघराच्या दाराच्या फटीतून हळूच आत डोकावून पाहिली तर काय आश्चर्य ! रघुनाथ जमीनीपासून दोन हात उंचीवर आधांतरी ध्यानस्थ बसलेला त्यांना दिसला. हे दृष्य पाहताच फडके यांना फारच आश्चर्य वाटले. हा कोणीतरी महायोगी आहे, सामान्य मुलगा नाही, ही त्यांची पक्की खात्री झाली. देवघराची कडी हळूच त्यांनी उघडली आणि रघुनाथाची ध्यानधारणा संपून तो बाहेर येताच त्यांच्या पायावर त्यांनी डोके ठेवले; आणि सद्गदीत होऊन म्हणाले

रघुनाथा आजपासून तू आमच्या घरी पुजारी नूसन आम्ही तुझे पूजारी आहोत. तुला आम्ही ओळखले नाही; तुझ्यावर हे देवपूजेचे काम सोपवून तुझ्याकडून आम्ही सेवा करून घेतली. याबद्दल आम्हाला उदार होऊन क्षमा कर. रघुनाथा ! तुला 'अरे ! तुरे !' असे आजपर्यंत आम्ही एकेरी नावाने संबोधले क्षमा कर. तू कुणी सामान्य मानव नाहीस महान योगीराज आहेस याची आज आम्हांला खात्री पटली आहे. आजपासून आम्ही तुला महाराज म्हणूनच म्हणणार. त्या दिवसापासून फडके यांनीदेवपूजेचे काम त्यांना कधीच सांगितले नाही. उलट एक महान साधू पुरुष योगेश्वर असे समजून ते रघूनाथ भटजींची सेवा करू लागले.



## ॥ भृगू अवतार रघुनाथ ॥

भटजी महाराजांचा नित्यक्रम असे की, पहाटेस उठून गोदावरीचे स्नानकरावयाचे; तेथे संध्या, जप वैगेरे सूर्योदयापर्यंत केल्यावर फडेक यांच्या घरी यावयाचे; तेथे मानसपूजा ध्यानधारणा करीत दुपारपर्यंत बसावयाचे; नंतर भोजन व नंतर कोणी आल्यास त्याचेशी प्रेमळपणे संभाषण, चर्चा अगर शंकानिरसन करणे, हा त्याचा क्रम असे. सायंकाळी संध्येसाठी गंगेवर गेल्यावर तिच्या दक्षिण तीरी सुदंर नारायणाच्या समोरच एक पडकीशी माडी असे, तेथे ध्यानास बसावयाचे. पहाटेस पुन्हा गंगेचे स्नान वैगेरे करून फडके यांच्या घरी जावयाचे. कधी कधी ध्यानासाठी गावाबाहेर लांब वनातही ते जात असत. एके दिवशी ध्यानासाठी रात्रीवनात गेले असता वाटेतच त्यास दत्तात्रेयांची स्वारी दिसली. त्यास पाहताच भटजींनी त्यास साष्टांग नमस्कार केला. भटजीस पाहताच श्री दत्तांनी हा भृगु आवतार रघुनाथ आहे हे ओळखले; व आपल्या निकट बसविले. दोघांचे प्रेमळ संभाषण सुरु झाले. बोलता बोलता 'रात्रिरेव व्यरंसीत्' या उक्तीप्रमाणे रात्र केव्हाच निघून गेली. मग दत्तांनी भटजीस विचारले की, तुम्ही रात्री ध्यानास कुठे बसला ? भटजी महाराजांनी लगेच श्रीदत्तांच्या हातात हात घालून त्यास गोदावरीच्या प्रवाहाच्या अगदी निकट असलेली ती माडी दाखविली; 'येथे आपण येत जावे' अशी श्रीदत्तांना विनंती केली.

पुढे भटजी महाराज आणि श्रीदत्त दररोज रात्री त्या माडीत एकत्र येऊ लागले. आणि त्या दोघांचे परस्पर अध्यात्मपर संभाषण होऊ लागले; दोघेही ब्रह्मरसात निमग्न होऊ लागले.

नाशिक क्षेत्राच्या पूर्व बाजूस सुमारे सात आठ मैल लांब एक तपोवन आहे. त्या तपोवनात पूर्वी त्यावेळी श्री कचेश्वराचे मंदिर होते. गोदेच्या काठी असलेले ते मंदिर खरोखरीच फार रम्य होते. एकदा फिरत फिरत भटजी महाराज त्या मंदिरात गेले. देवदर्शन घेतल्यावर थोडावेळ ते ध्यानस्थ बसले. ध्यानधारणा समाप्त होताच भटजी महाराज उठले आणि त्यांनी देवास प्रदक्षिणा घालणे सुरु केले. बराच वेळ झाला. मध्यान्ह समय झाला. त्यांचे पाय उन्हाने पोळू लागले. वरून उन खूपच वाढले होते. पाय पोळत होते परंतु भटजी महाराज प्रदक्षिणा घालण्याचे थांबेनात. त्यांचा हा अव्याहत क्रम सुरु झालेला पाहून श्री कचेश्वर देवास करुणा उत्पन्न झाली. कचेश्वर मूर्ती फडके यांच्या स्वप्नात गेली व म्हणाली, 'ऊठ! निजलास काय? मला ऊन लागत आहे. माझा भक्त रघुनाथ कष्टी होत आहे; म्हणून माझ्या मंदिराभोवती मला छाया करून दे. हे स्वप्न पडताच फडके जागे झाले. त्यांनी चैन पडेना. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून त्यांनी श्री कचेश्वर मंदिराचा रस्ता धरला. तिथे जाऊन पाहतात तो काय, भटजी महाराज खरोखरच उन्हात प्रदक्षिणा घालीत होते आणि त्यांचे पाय पोळून निघत होते. फडक्यांनी ताबडतोब सामान मागविले, कामगार जमा केले आणि मंदिराभोवती छाया निर्माण केली.

याच मंदिरात त्यावेळी अनेक ब्राह्मण अनुष्ठानासाठी येत असत. त्या ब्राह्मणांच्या स्वप्नात कचेश्वर प्रभू गेले आणि म्हणाले, 'रघुनाथ सर्व तपस्व्यांत श्रेष्ठ आहे; त्याला माझ्या ठिकाणी माना, त्याच्या आज्ञेत रहा. त्यायोगे तुमचे कल्याण होईल. ब्राह्मणांना असा दृष्टांत होताच त्यांनी महाराजांच्या चरणी लोटांगण घातले आणि ते भटजी महाराजांची सेवा करू लागले. कांही दिवसांनतर महाराजांनी त्यांना सांगितले की, 'जा, तुमचे मनोरथ पूर्ण होतील.' महाराजांच्या आशिर्वादाप्रमाणे खरोखरीच प्रत्येकाचे मनोरथ पूर्ण झाले.

## ॥ श्री दत्ताशी संवाद ॥

भटजी महाराजांचे जे अनेक शिष्य होते त्यामध्ये निरंजन स्वामी नावाचे एक आवडते शिष्य होते. त्यांना महाराजांनी ग्रंथ लेखनाची आज्ञा केली होती. ज्यावेळी महाराजांनी ही आज्ञा केली त्यावेळी निरंजन स्वामी महाराजांच्या सतत सेवेत होते. त्यामुळे भटजी महाराज आणि श्रीदत्त यांचा रात्री होणारा संवाद ऐकण्याचे आणि पाहण्याचे भाग्य त्यांना प्राप्त झाले होते. भटजी महाराज व श्रीदत्त वेगळे नाहीत ते एकरूप आहेत हा अनुभव त्यांना आला होता. महाराज स्वत: अत्यंत विरक्त होते. एकदा एक तरुण स्त्री महाराजांची परिक्षा पाहण्याकरिता एकांत पाहून महाराजांच्या जवळ गेली आणि कामचेष्टा करु लागली परंतु निर्विकार वृत्तीचे महाराज जराही विचलीत झाले नाहीत. अखेर तीच लाजली आणि महाराजांना शरण आली.

नाशिकात गोदातटी येऊन स्थिर झालेल्या रघुनाथ भटजी महाराजांनी अखेर तिथेच जिवंत समाधी घेतली. गोदावरीनदीच्या दक्षिणतीरावर असलेल्या 'व्हीक्टोरिया पुलाजवळ त्यांची जिवंत समाधी आहे. समाधीवर एका शिवलिंगाची स्थापना करण्यात आली असून या स्थानाला 'अद्वैतेश्वर' म्हणून संबोधले जाते. आजही या ठिकाणी स्वामीचे हजारोभक्त अनन्य भावाने येतात. नित्य सेवा करीत असतात. अनेकांना इथे उत्तम अनुभव आले आहेत. आजही येतात. आपण नाशिकात गेला तर जरूर या स्थानाचे दर्शन घेऊन या.



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विक्रीसाठी उपलब्ध प्रकाशित फोटोंची यादी

| अ. क्र | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | - |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रू. ९.०० आहे.

## श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



**आ**ज- काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.





# श्री क्षेत्र शिरडी येथील दर्शनाची पवित्र स्थाने

**(१) खंडोबा मंदिर :**

हे ठिकाण श्री साईनाथ रूग्णालयाजवळ आहे. चाँद पाटलाचे वऱ्हाडाबरोबर बाबा जेव्हां परत शिरडीत आले. त्यावेळी वडाचे झाडाखाली असलेल्या श्री खंडोबा मंदिराजवळ तेथील पुजारी म्हाळसापती यांनी ''या साई'' असे उद्‌गार काढून त्यांचे स्वागत केले.

**(२) गुरूस्थान मंदिर :**

बाबा सोळा वर्षे वयाचे असतांना ज्याठिकाणी प्रथम शिरडी येथें प्रकट झाले ते हे ठिकाण. बाबा हे ठिकाण त्यांचे गुरूचे आहे, असे सांगत असत. साईचरित्रात उल्लेख असलेले प्रसिद्ध निंबाचे झाड येथेच आहे. या ठिकाणी गुरूवारी व शुक्रवारी ऊद (लोबान, धूप) जाळल्यास भाविकांचा दु:ख परिहार होतो असा सत्चरित्राचा दाखला असून तसा अनुभवही येतो.

**(३) साईबाबांचे समाधी मंदिर :**

हे मुख्य मंदिर आहे. ही इमारत नागपूरचे साईभक्त श्री. गोपाळराव बुट्टी यांनी बाबांच्या आज्ञेवरून बांधली असून ''बुट्टीवाडा'' या नावानेही ओळखली जाते. या ठिकाणी श्री बाबांची पवित्र समाधी व मूर्ती आहे. बाबांनी हाताळलेल्या वस्तू या मंदिरात प्रदर्शित केल्या आहेत. नित्याचे दर्शन व अभिषेक पूजा व चार आरत्या या ठिकाणी होतात.

**(४) द्वारकामाई मशीद :**

श्री साईबाबा शिरडीस आल्यापासून समाधिस्त होईपर्यंत त्यांचे वास्तव्य सलग ६० वर्षे या ठिकाणी होते. असंख्य भक्तांना या ठिकाणी बाबांनी कृपाप्रसाद दिला. बाबा ज्या शिळेवर बसत असत ती येथेच आहे. शिवाय बाबांनी प्रज्वलित केलेली धुनी या ठिकाणी अखंडपणे तेवत आहे. भक्तांच्या जीवनातील आकांक्षा पूर्ण करण्यासाठी बाबा याच धुनीतून त्यांना उदी देत असत. आता भक्तांना दिली जाणारी उदी याच धुनीतून प्राप्त होते.

**(५) चावडी :**

एक दिवसाआड बाबा या ठिकाणी मिरवणुकीने द्वारकामाईतून येत असत व मुक्काम करीत असत. आता प्रत्येक गुरूवारी रात्री ९.१५ ते १०.०० यावेळी द्वारकामाईतून चावडीकडे पालखी मिरवणूक निघत असते. या पालखीत बाबांची तसबीर, पादुका व सटका ठेवलेल्या असतात.

**(६) इतर स्थाने :**

श्री साईबाबांच्या सान्निध्यात राहिलेले साईबाबांचे परमभक्त श्री. तात्यापाटील कोते, श्री. भाऊ महाराज कुंभार, श्री. व्ही. पद्मनाभ अय्यर, श्री. नानावली, श्री. अब्दुलबाबा यांच्या समाध्या संस्थानचे परिसरातच कारंज्याजवळ आहे.

**(७) लेंडीबाग :**

या ठिकाणी बाबा फेरफटका मारावयास जात असत. बाबांनी स्वत: या ठिकाणी लावलेल्या पिंपळ वृक्षाशेजारी नंदादीप अखंडपणे तेवत ठेवलेला आहे. शिवाय या ठिकाणी दत्त मंदिर असून बाबांचा आवडता घोडा ''श्यामकर्ण'' (श्यामसुंदर) जवळच चिर-निद्रा घेत आहे. या ठिकाणी असलेल्या विहीरीस ''बाबांची शिवडी'' असे म्हटले जाते.

(८) याशिवाय संस्थान परिसरात श्री गणेश मंदिर, श्री शनि मंदिर व श्री महादेव मंदिर अशी तीन मंदिरे आहेत.

卐 卐 卐



# श्री सद्‌गुरू साईबाबांचे भक्तांना अभय

शिरडीस ज्याचे लागतील पाय।
टळती अपाय सर्व त्याचे ॥१॥

माझ्या समाधीची पायरी चढेल।
दु:ख हे हरेल सर्व त्याचे ॥२॥

जरी हे शरीर गेलो मी टाकून।
तरी मी धावेन भक्तासाठी ॥३॥

नवसास माझी पावेल समाधी।
धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी ॥४॥

नित्य मी जिवंत, जाणा हेची सत्य।
नित्य घ्या प्रचिती अनुभवे ॥५॥

शरण मज आला, आणि वाया गेला।
दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥६॥

जो जो, मज भजे, जैशा जैशा भावे।
तैसा तैसा पावें, मीही त्यासी ॥७॥

तुमचा भी भार वाहीन सर्वथा।
नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥८॥

जाणा येथे आहे सहाय्य सर्वास।
मागे जे जे त्यास ते ते लाभे ॥९॥

माझा जो जाहला काया-वाचा-मनी।
तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥१०॥

साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य।
झाला जो अनन्य माझ्या पायी ॥११॥

रचियता : श्री: मोहनीराज पंडित

卐 卐 卐






श्री साईबाबांचे प्रत्यक्ष व दुर्मिळ छायाचित्र

नोव्हेंबर – डिसेंबर १९९५ रु. ८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ

श्री. द. म. सुकथनकर

(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर

श्री. रमेश दा. सोनी

श्रीमती रेखा ग. दिघे

श्री. प्रकाश व. कारखानीस

श्री. मुकेश र. पटेल

श्री. मधुकर द. जोशी

श्री. प्रकाश पी. वैशंपायन

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील

श्री. देवकीनंदन सारस्वत

श्री. आप्पासाहेब खं. कोते

श्री. रायभान ग. चिने

श्री. भास्कर शं. बोरावके

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील

श्री. दयालाल हि. पटेल

श्री. राजीव पुं. रोहोम

श्री. संभाजी कि. काळे

श्री. अशोक भि. खांबेकर

सौ. प्रेमाबाई सी. बज

श्री. रामचंद्र नि. गोसावी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. सोपान मा. धोर्डे

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे,
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७४ अंक ८-९

नोव्हेंबर - डिसेंबर
१९९५

संतसंग विशेषांक

संपादक

✱ द. म. सुकथनकर ✱

कार्यकारी संपादक

✱ विद्याधर ताठे ✱

कार्यालय

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई -४०० ०१४
दूरध्वनी : ४१२२५६१
फॅक्स : (०२२) ४१५०७९८

मुद्रक
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई
अक्षर जुळवणी
आयकॉन सिस्टीम्स पुणे.

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव समासद वर्गणी - रु. १,०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी - रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत रु. ८/- फक्त

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेत', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०००१४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



## श्री साईलीला संतसंग विशेषांक

### अंतरंग

| | | |
|---|---|---|
| संपादकीय | द. म. सुकथनकर | २ |
| हेमांडपंतांचा श्रीसाई संग | – | ४ |
| विज्ञानयुग आणि संतसंग | विद्याधर ताठे | ५ |
| महापुरुषसंश्रय | वेदमूर्ती स. कृ. देवधर. | १० |
| संत येती घरा | ह.भ.प. रामपुरी महाराज | १३ |
| मी अनुभवलेले संतसंगाचे पावन क्षण | राजा मंगळवेढेकर | १५ |
| संतसंगाचा कृपाप्रसाद | ग. के. कुलकर्णी | १८ |
| संतसंगतीचे काय सांगू सुख। | प्र. द. निकते | २० |
| सदा संगती सज्जनांची धरावी | पद्माकर बोंडाळे | २३ |
| निळा म्हणे साधूसंग। महाभाग्याचे भाग्य | प्र. दि. कुलकर्णी | २७ |
| शैव साहित्यातील संतसंग महती | डॉ. ग. वा. तगारे | ३१ |
| झाल्या संतांचे दर्शन। साक्षात भेटे नारायण | डॉ. ग. प्र. परांजपे | ३४ |
| संतांचे संगती मनोमार्ग गति | सौ. मनोरमा फणसे | ३७ |
| संतसहवासाचे एक स्मरण | वेदमूर्ती स. कृ. देवधर | ४० |
| सत्संगति महिमा नहिं गोई | संत तुलसीदास | ४२ |
| प्रपंच आणि परमार्थ | डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे | ४३ |
| पुस्तक परिचय | विद्यानंद | ४५ |
| अभिप्राय | -- | ४७ |



## संपादकीय

**नलगे मुक्ती, धन, संपदा ।**
**संत संग देई सदा ।।**

संत तुकाराम महाराजांची ही प्रार्थना, संतसंगाचे महात्म्य सार्थपणे वर्णन करणारी असून अशा प्रकारे बहुतेक सर्वच संतांनी संत संगाची-संत कृपेची-मागणी आपल्या अभंगवाणीतून आपल्या इष्ट देवतेकडे केलेली आहे असे दिसते. **'श्री साईलीला'** चा प्रस्तुतचा नोव्हेंबर-डिसेंबर ९५ चा अंक आम्ही **'संत संग'** या विषयाला प्राधान्य देऊन सिद्ध केलेला आहे. आजवरच्या अंकाप्रमाणेच हा आमचा प्रयत्नही आपण गोड मानून घ्याल अशी अपेक्षा आहे.

श्री साईबाबा यांच्या सहवासाचा सत्संगाचा परिस्पर्श प्राप्त होऊन जीवनाचे सोने झालेले अनेक भक्त होऊन गेलेले आहेत. कवी **हेमाडपंत**, संतकवि **दासगणू** ही मंडळी साईसंगाने धन्य झालेल्यांपैकी असून ते दोघेही साईदर्शन होण्याआधी शंकेखोर - कुतर्कवादी होते आणि साईदर्शनाने त्यांच्यामध्ये परिवर्तन होत गेले. 'किमर्थ जावे शिरडीप्रती ।' असा प्रश्न करणारे हेमाडपंत साईदर्शनानंतर म्हणतात-

**नानासाहेब सांगूनि गेले ।**
**त्याहूनि अधिक प्रत्यक्ष पाहिले ।**
**दर्शने म्या धन्य मानिले ।**
**साफल्य झाले नयनाचे ।।**

**लाधलो साईंचा चरणस्पर्श ।**
**पावलो जो परामर्ष ।**
**तोचि या जीवचा परमोत्कर्ष ।**
**नूतन आयुष्य तेथूनि ।।**

साईसच्चरित लिहिणाऱ्या हेमाडपंतांची ही अवस्था साईसंगाची यथार्थ महती वर्णन करणारी आहे. संतकवि दासगणूंचा अनुभवही अगदी असाच आहे. खर तर वामनशास्त्री इस्लामपूरकर यांचे दासगणू शिष्य. वामनशास्त्री काशीला गेले तेव्हा, 'यापुढे मला साईबाबांमध्ये पहा असे सांगून गेले. पण दासगणूंच्या मनाला ते मानवेना! पुढे साईबाबांच्या सहवासात दासगणूंच्या मनात अपार परिवर्तन झाले. त्यांनी 'साईस्तवन मंजिरी' मध्ये लिहिलेल्या पुढील ओव्या अत्यंत बोलक्या आहेत -

**म्हणून तुमच्या दिव्यचरणां**
**मी करितो वंदना ।**
**महाराज माझ्या दुर्गुणा । पाहू नका किमपीही ।**

**हे साईनाथ सद्‌गुरू ।**
**तूच माझा कल्पतरू ।**
**भवाब्धीचे भव्य तारू ।**
**तूच असती निश्चये ।।**

कवी हेमाडपंत व दासगणू ही साई भक्तांची प्रातिनिधीक उदाहरणे असून साईबाबांच्या सहवासाने जीवन धन्य-धन्य झालेले असंख्य अगणित भक्त आहेत. एवढेच नव्हे तर आजही श्री साईबाबांचा निर्गुण सहवास, अंतरंग स्तरावर अनुभवणारे, अर्तक्य



संपादकीय

वाटावे असे अनेक अनुभव सांगणारे साईभक्त आहेत. अर्थात हा अनुभव सर्वांनाच येईल असे नव्हे कारण त्यासाठी सुद्धा भक्तभाविकाची एक पात्रता असावी लागते. तुकाराम महाराज एका अभंगात यादृष्टीने एक मार्मिक दृष्टांत देतात. ते म्हणतात-

**परिसाचे अंगी लाविले खापर । पालट अंतर नेघे त्याचे ।।**
**तुका म्हणे वेळू चंदना संगती । काय ते असती जवळीके ।।**

परिसाचा स्पर्श लागताच सोने होण्यासाठी भक्ताचे मन लोखंडाचे असावे लागते ते खापराचे (मातीचे) असून चालत नाही. असो.

**प्र**स्तुतच्या संतसंग विशेषांकात आम्ही ज्येष्ठ विचारवंत डॉ. ग.वा. तगारे, डॉ. ग. प्र. परांजपे, मान्यवर साहित्यिक राजा मंगळवेढेकर, वेद-उपनिषद ग्रंथाचे अधिकारी प्रवक्ते वेदमूर्ती स. कृ. देवधर तसेच संतसाहित्याचे विलक्षण अभ्यासक सर्वश्री डॉ. श्री अनिल सहस्रबुद्धे, प्र. द. निकते; प्र. दि. कुलकर्णी, युनायटेड वेस्टर्न बँकेचे शाखाधिकारी पदमाकर बोंडाळे, आमचे विश्वस्त श्री. रा. नि. गोसावी आदींचे लेख समाविष्ट केलेले आहेत. सध्याचे युग हे विज्ञानयुग असून आपणास सर्व गोष्टींचा विचार त्या पार्श्वभूमीवर वर्तमानकाळाचे भान ठेवून केला पाहिजे. नेमकी हीच गोष्ट या अंकातील, आमचे कार्यकारी संपादक विद्याधर ताठे यांनी लिहिलेल्या 'विज्ञानयुग व संतसंग' या लेखात आढळणार आहे. भक्तीचे डोळा ज्ञान व्हावे अशा आशयाची ज्ञानदेवांची एक ओवी आहे, ती डोळ्यापुढे ठेवूनच श्री ताठे यांनी संतसंगाची विज्ञानवादी दृष्टिकोनातून चिकित्सा केलेली आहे. वाचकांनी अशाच डोळसपणे भक्तीमार्गावरील वाटचाल करावी अशी आमची नम्र सूचना आहे.

**प्र**स्तुतचा अंक **'नोव्हेंबर-डिसेंबर'** चा असून तो निदान डिसेंबर महिन्याच्या अखेरीस प्रसिद्ध होत आहे, ही आनंदाची नव्हे तर काहीशा दिलास्याची घटना आहे. मागील अंकात 'प्रलंबित सर्व अंक डिसेंबर अखेर प्रसिद्ध करून जानेवारी ९६ पासून 'श्री साईलीला' चे अंक वेळेवर प्रकाशित करू' असे मी वाचकांना आश्वासन दिले होते. श्री साईबाबांच्या कृपेने ते पूर्ण होत आहे. जानेवारी-फेब्रुवारी ९६ चा श्री साईलीला अंक फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात आपल्या हाती यावा तर त्यापुढील अंक पहिल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आपल्या हाती पडावेत असा आमचा प्रयत्न आहे. मराठी प्रमाणेच 'श्री साईलीला' चे इंग्रजी-हिंदी अंकही बरेच प्रलंबित असून सध्या त्याकडे आमचे विशेष लक्ष आहे. साईभक्तांचे **श्रद्धा-सबुरी** अधिष्ठित प्रेम हेच आमचे भांडवल असून यापुढे आपले प्रेम-सहकार्य असेच वृद्धिंगत होत जावे ही प्रार्थना.

हा अंक हाती येईल तेव्हा संक्रांतीचा महासण उंबरठ्यावर असेल. त्या सणाच्या शुभेच्छा व्यक्त करून संपादकीय लेखाची समाप्ती करतो.

*तीळगुळ घ्या / गोड बोला /शुभसंक्रमण //*

**द. म. सुकथनकर**
संपादक





# हेमाडपंतांचा श्रीसाई संग

श्री साईसच्चरित ग्रंथाचे लेखक कवी हेमाडपंत यांनी श्री साई सहवासातील आपण अनुभवलेल्या पावन क्षणांचे, त्यांच्या ग्रंथात ठिकठिकाणी वर्णन केले आहे. श्रीसाईचिंतन, साईदर्शन, साईशक्ति, साई आशीर्वाद अशा प्रकारे त्यांनी साईसंग अनुभवला असून त्यांच्या ग्रंथातील काही निवडक ओव्यांचे संकलन

श्रवणे साईगुणश्रवण । मने साईमूर्तीचे ध्यान ।
चित्ते अखंड साईचिंतन । संसार बधंन तुटेल ॥

गुरूनाम आणि गुरूसहवास । गुरूकृपा आणि गुरूचरण पायस ।
गुरुमंत्र आणि गुरूसहवास । महत्प्रयास प्राप्ती ही ॥

प्रचंडशक्ती यथा पोटी । अनन्य भक्ती घेतली कसवटी ।
भक्तांसी मोक्षदारवंटी । नेतील लोटीत नकळता ॥

गुरुसंगति गंगाजळ । क्षाळिते मळ करिते निर्मळ ।
मनासम दुजे काय चंचल । करते निश्चल हरिचरणी ॥

पाहता श्रीसाईचे मुख । हरून जातसे तहानभूख ।
काय तयापुढे इतर सुख । पडे भवदु:खविस्मृती ।
पाहता बाबांचे नयनाकडे । आपआपणा विसर पडे ।
आतुंती येती जै प्रेमाचे उभडे । वृत्ति बुडे रसरंगी ॥

हेचि कर्मानुबंधस्थिती । वाढली साईपदासक्ती ।
प्रत्यया आली अतर्क्य शक्ती । काय म्या किती वर्णानी ॥

जे शक्ती उपजावी भक्ती । समर्थ साईचरणासक्ती ।
संसारी राहून संसारनिवृत्ती । आनंदवृत्ती जे देई ॥

असता संतांची आशीर्वचने । तैचि उपक्रम ग्रंथरचने ।
विना आपुल्या कृपावलोकने । निर्विघ्न लेखन चालेना ॥

ऐसे ऐकूनि घाई घाई । धावलो बाबा होते त्या ठाई ।
धुळीत घातले लोटांगण पाई । आनंद न माई मनात ।
नानासाहेब सांगूनि गेले । त्याहूनि अधिक प्रत्यक्ष पाहिले ।
दर्शन म्या धन्य मानिले । साफल्य झाले नयनांचे ॥



# विज्ञानयुग आणि संत संग

- विद्याधर ताठे -



विज्ञान युगात संत संग वगैरे गोष्टींची गरज काय ? असा प्रश्न अनेक नवशिक्षित - साक्षर तरूण विचारतात. हा प्रश्न इतर अनेकांच्या मनातही डोकावत असेल. या प्रश्नाचे श्री साईलीलाचे कार्यकारी संपादक विद्याधर ताठे यांनी दिलेले उत्तर अनेकांच्या शंकाचे समाधान करेल असे वाटते.

सध्या सर्वत्र दिसणाऱ्या व्यक्तिमत्व विकासाच्या शिबीरांवर जर आपला विश्वास आहे तर मग संत संगात होणाऱ्या परिवर्तनाचा तुम्हाला होकारात्मक विचार केलाच पाहिजे. विज्ञानयुगातील भोगलोलुप जगात उपभोगाच्या तारतम्यासाठी संत संग ही काळाची गरज आहे.





**सत्संगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो।'** या व अशा संस्कारक्षम आर्यांनी, ओव्यांनी, अभंगांनी महाराष्ट्र संस्कृतीचे अमृतसिंचन केलेले आहे. **'पहिली माझी ओवी ग ----।'** म्हणत पहाटे गृहिणींची जाती फिरू लागताच घरातील बाळगोपाळांना भल्या रामप्रहरीच संत ज्ञानदेवांचा परिचय घडायचा. सडासंमार्जन - रांगोळी करताना त्या गृहिणींच्या मुखातून भूपाळ्या व अभंगांचे सिंचन व्हायचे व बाळगोपाळांना त्याद्वारे संत तुकारामादी संतमंडळीचे नित्य दर्शन घडायचे. असे सात्त्विक बाळकडू घेत घेतच बाळगोपाळ लहानाचे - मोठे होत.

औद्योगिकरणामुळे भारताचे एकेकाळचे रमणीय असे ग्रामजीवन उध्वस्त झाले असून आता ना पहाटे ओवी रंगते, ना जात्याच्या साथीने लोकगीते फुलतात, ना सडा, सहिला, ना रांगोळी काढण्या इतपत उसंत राहिली. औद्योगिकरणाने केवळ जाती गेली नाहीत, तर लाख मोलाचे संस्कार गेले. नव्या गिरण्यांनी भाकरीचे पीठ झटपट मिळू लागले पण संस्कारांची उणीव भरून काढणारी नवी व्यवस्था आली नाही. ती पोकळी कायमच राहिली. हा दोष कोणाचा? विज्ञानाचा ? नव्हे ! हा दोष ना विज्ञानाचा; ना नव्या औद्योगिक प्रगतीचा. हा दोष आपलाच. आपण नव्या विज्ञानाबरोबरच संस्कारांचा वारसा जतन करणारी - वहन करणारी - संवर्धन करणारी नवी व्यवस्था निर्माण करण्याची गरज होती. पण आपण ती जबाबदारी यशस्वी पार न पाडताच विज्ञानालाच दोष देत - विज्ञानाच्या नावे बोटे मोडीत बसलो.

### नव्हती ते संत

**नव्हती ते संत करिता कवित्व।**
**संतांचे ते आप्त नव्हती संत॥**
**येथे नाही वेश सरत आडनाव।**
**निवडे घावडाव व्हावा अंगी॥**
**नव्हती ते संत धरिता भोपळा।**
**करता वाकळा प्रावरणाशी॥**
**नव्हती ते संत करिता किर्तन।**
**सांगता पुराणे नव्हती संत॥**
**नव्हती ते संत वेदांच्या पठणे।**
**कर्म आचरणे नव्हती संत॥**
**नव्हती ते संत माळामुद्रांच्या भूषणे।**
**भस्म उधळणे नव्हती संत॥**

## नाही निर्मळ मन।

आजच्या विज्ञानयुगात भौतिकप्रगतीने डोळे दिपवून टाकण्याएवढी प्रगती केलेली आहे. उपभोगांच्या साधनांची रेलचेल झालेली आहे. उपभोगांच्या नव्या नव्या साधनांनी बाजारपेठा भरून वहात आहेत. लोकांच्या अभिरूचीमध्ये विलक्षण परिवर्तने होत आहेत. पूर्वी घरामध्ये पहाटे उठून गृहिणीस रोजचे दळण जात्यावर दळावे लागत होते. आज पीठच नव्हे तर पोळ्या करून देणारे यंत्रही उपलब्ध आहे. पूर्वी ताक-दही-पीठाने वा रिठ्याच्या पाण्याने लोक शारिरीक स्वच्छता करीत होते आता त्यासाठी शेकडो कंपन्यांची, हजारो प्रकारची साबणे टी.व्ही. वरील जाहीरातीतून तुमचे लक्ष वेधून घेत आहेत. उपभोगांची संपन्नता वाढली आहे हे हातच्या काकणाला आरसा कशाला ? म्हणण्याइतपत ढळढळीत सत्य आहे. ते कोणीच नाकारणार नाही. नाकारतील ते वेड्याच्या नंदनवनात वावरत असतील. पण प्रश्न साधनांच्या संपन्नतेचा-विपुलतेचा नाही. प्रश्न आहे सुखाचा !

## तारतम्याची गरज

कालच्यापेक्षा आजचा विज्ञानयुगातील माणूस गाडी - बंगला - उंची कपडे - आणि नाना उपभोगांनी संपन्न जरूर आहे. त्यात वादच नाही. पण आजचा हा विज्ञानयुगातील उपभोगसंपन्न माणूस कालच्या माणसाएवढा सुखी-समाधानी आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर 'निश्चितच नाही' असेच आहे. ते कोणीही, अगदी एखादा वैज्ञानिकही नाकारू शकणार नाही असे वाटते. अणूचा शोध मानवजातीच्या कल्याणासाठी लावणाऱ्या शास्त्रज्ञाला अणूयुद्धाने पेटलेला वडवानल पाहून काय वाटले असेल ? आनंद झाला असेल की दारूण दुःख झाले असेल ? शोध वाईट नाही. तसेच उपभोगांच्या वस्तूंची रेलचेल वाईट नाही. साधनांची विपुलता वाईट नाही. पण हा उपभोग जो मानवसमाज घेणार आहे त्यास उपभोगाचे तारतम्य कळत नसेल तर विज्ञान हा वरदान ठरण्याऐवजी शापच ठरणार आहे. केवळ उपभोगात सुख नाही तर संयमितपणे, आपली कुवत पाहून, पचनी पडेल एवढा उपभोगच सुख आहे. उपभोग स्वातंत्र्याचा तारतम्याने वापर करण्याची गरज आहे, अन्यथा ते स्वातंत्र्य स्वैराचार ठरून त्याचा शेवट अनाचार - व्यभिचार - दूराचार हाच असू शकतो. अटळ शेवट, पर्याय नसलेला. यासाठी विज्ञानयुगातही उपभोगाचे तारतम्य कळण्यासाठी मानवजातीवर काही संस्कार होण्याची गरज पदोपदी जाणवत असून हा संस्कार संतसाहित्यातून - संत सहवासातून - संतसंगातूनच होऊ शकतो. त्यामुळे आजच्या साधन संपन्न उपभोगी विज्ञानयुगात संतसाहित्य - संतसंग -

याचे महत्त्व केवळ अनन्यसाधारणच नव्हे, तर अपरिहार्य आहे हे जाणवते. टी.व्ही. च्या जाहीरातयुद्धातील साबणाच्या शेकडो जाहीराती पाहून गोंधळलेल्या अवस्थेतील केविलवाण्या मनुष्यप्राण्याच्या, संत तुकारामांचे **'नाही निर्मळ मन । काय करिल साबण ।'** हे वचन जेव्हा लक्षात येते, तेव्हा त्याच्या संभ्रमाच्या - गोंधळाच्या गाठी जागचेजागी बर्फासारख्या वितळून जातात. उपभोगाचे तारतम्य शिकविणारा संत तुकारामांचाच पुढील अभंग मोठा उद्‌बोधक आहे -

**परिमळ म्हणून चोळू नये फूल ।**
**यंत्र भेदूनि नाद पाहू नये ।**
**कर्मफळ म्हणूनि इच्छू नये काम ।**
**तुका म्हणे वर्म दावूं लोका ॥**

फुलाचे फुलपण ठेवून परिमळाचा आनंद घ्यावा, परिमळासाठी फुल कुसकरून टाकू नये. यंत्र मोडून त्यातून घंटेचा नाद होतो का पाहू नये. तसेच कर्मफळ म्हणत अनावश्यक उपभोग घेऊ नये. हे उपभोगाचे वर्म सर्वांनी समजून घ्यावे. हे वर्म कळले की उपभोगाचा यथायोग्य आनंद घेता येतो. खरे समाधान वाटते. हे वर्म आपणास तटस्थ मनोवृत्तीने - साक्षीभावाने जीवन जगलेले संत तुकारामांसारखे संतच सांगू शकतात. **'सिगारेट ओढणे शरिरास अपायकारक आहे'** असे केवळ कायद्याच्या धाकाने वैधानिक इशारा देऊन, सिगारेटची मात्र अत्यंत प्रभावी जाहीरात करणाऱ्या कंपन्यांचा वैधानिक इशारा तुम्हाला तारतम्य शिकवू शकणार नाही. ते तारतम्य संतांचा उपदेश - संत सहवास यातूनच लाभते. म्हणूनच जोपर्यंत तारतम्याची मानवजातीला गरज आहे तोपर्यंत संतसाहित्य - संतसंग - यांचे महत्त्व राहणार आहे. अशा प्रकारे संतसाहित्य - संतसंगाचे मूल्य त्रिकालाबाधित सत्य आहे.

## व्यक्तिमत्व विकास

संतसंग ही काही जादूची कांडी नाही. हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. संतांच्या संगतीत, जगाकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टीत, विचारधारणेत, परिवर्तन होते आणि केवळ या परिवर्तनामुळे जग तेच असूनही तुम्हास सुखाचा स्वर्ग - आनंदाचे वर्म सापडल्याचे लक्षात येते. संत संगतीत कळत नकळत एक संस्कार तुमच्यावर होतो की जो संस्कार तुमच्या एकूण धारणा बदलून टाकतो. तुमचा अहंकार, तुमचा मीपणा, तुमचा राग, तुमच्या हावीचा लोभ, संतसंगाच्या अग्नीत जळून जातो. अहंकार संपल्याने तुमच्या मैत्रीचे क्षितीज विस्तिर्ण होते; लोभ नष्ट झाल्याने स्वार्थ संपतो व परार्थ उरतो; मी व माझे असा




**उपभोगांच्या विपुलतेचे एक दर्शन : चॉकलेटचे शेकडो प्रकार**





संकुचितपणा जाऊन अवघे विश्व आपले वाटते, राग विरल्याने क्षमाशिलत्व वाढते. लोकांची मांदियाळी वृद्धिगत होत जाते. लोकांच्या मनातील स्नेह-आपलेपणा वाढत जातो. 'तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता' अशी स्थिती प्राप्त होते. विज्ञानयुगातील नव्या-आधुनिक परिभाषेत बोलायचे झाले तर तुमचा 'व्यक्तिमत्व विकास' होतो. आज सभ्यता (एटीकेट-मॅनर्स) शिकण्यास क्लास लावावा लागतो व अशा क्लासद्वारे व्यक्तिमत्व विकास शिबीरांद्वारे माणूस स्वतःस अधिकाधिक 'अपटूडेट' बनविण्याचा प्रयत्न करीत आहे.

संतांचा संग, संतसहवास हा असाच विनामूल्य म्हणजेच अमूल्य असा व्यक्तिमत्व विकासाचाच प्राचीन काळापासून चालत आलेला क्लास आहे. फरक एवढाच की आजच्या क्लासमध्ये खाणेपिणे-पोषाख घालणे व संभाषण याच ठराविक दर्शनीय गोष्टींचा समावेश आहे तर संत संगाचा क्लास हा अंतरंग व्यक्तिमत्व विकासाचा, दृष्टिकोन विकासाचा, विचारधारणा विकासाचा क्लास आहे, एक 'बेसिक क्लास (Besic Class) आहे. क्लासमध्ये फी देऊन व्यक्तिमत्व विकास होतो हे मानणाऱ्या आजच्या पीढीला संतसंगात-संतसहवासात होणाऱ्या व्यक्तिमत्व विकासाला नकार देता येणार नाही. तसे झाले तर नव्या पीढीची ती आत्मवंचनाच ठरेल असे वाटते.

**संतांचा संग तोचि स्वर्गवास :-** अशी संत संगास स्वर्गीय सुखाची, उच्च स्थान प्राप्तीची उपमा अनेक अभंगातून दिली गेलेली आहे. संतांच्या सहवासात होणाऱ्या संस्कारा प्रमाणेच संत सहवासात होणाऱ्या सद्गुणवृद्धीचेही मानवी जीवनात विशेष महत्त्व आहे. माणसाच्या मनात-मेंदूत 'सुष्ट व दुष्ट', दैवी व असुरी' अशा गुणावगुणाची बीजे एकाच वेळी वसत असतात. त्यापैकी कोणत्या गुणांना लक्षपूर्वक वृद्धींगत करायचे व कोणत्या अवगुणांना संयमाने नीपटून काढायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. प्रेम-वात्सल्य या भावनाभावनांप्रमाणेच मानवीमनात मत्सर-द्वेष-क्रोध याही भावना असतात. त्यांपैकी प्रेम-वात्सल्याची भावना अधिकाधिक वृद्धींगत कशी होईल. क्रोध-द्वेष-मत्सराची भावना कशी लोप पावेल हे पाहणे, तसे प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. सुजनत्वाची तीच खरी लक्षणे होय.

## तुका म्हणे संत संग बरा

**ढेकणांच्या संगे हिरा जो भंगला।**
**कुसंगे नाडला साधु तैसा॥**
**ओढाळच्या संगे सात्त्विक नासली।**
**क्षण एक नाडली समागमे॥**
**डाकाच्या संगती सोने हीन जाले।**
**मोल ते तुटले लक्ष कोडी॥**
**विषाने पक्वान्ने गोड कडू जाली।**
**कुसंगाने केली तैसी परी॥**
**भावे तुका म्हणे संतसंग हा बरा।**
**कुसंग हा फेरा चौऱ्याशीचा॥**

सद्गुणांची वृद्धी होण्यासाठी खास प्रयत्न करावे लागतात. दुर्गुण आपोआप फोफावतात. जसे शेतात पीक घेण्याआधी मशागत करावी पेरावे लागते, तण, गवत आपोआप उगवते. दुसरी गोष्ट म्हणजे सद्गुणवृद्धी हळूहळू बेरीज पद्धतीने होते तर दुर्गुण वृद्धी गुणाकार पद्धतीने-पटीपटीने होते. (उदा : बेरीज पद्धती २० + २० + २० = ६० गुणाकार पद्धती २० x २० x २० = ८००० यावरून लक्षात येते की गुणांची वृद्धी ६० होईपर्यंत दुर्गुणांची वृद्धी ८००० होऊ शकते. समाजात सुसंस्कार रूजवावे लागतात पण दुर्गुण मात्र शाळा, क्लास, वर्ग न घेता वाढतच असतात. तंबाखू खाणे-ओढणे हे न शिकविता समाज शिकतो. केवळ पाहून मुले त्या गोष्टी शिकतात पण अनेक गोष्टी शिकवूनही शिकत नाहीत. ही सद्गुण व दुर्गुणांची बलस्थाने आपण लक्षात घेतली पाहिजेत. आणि त्या दृष्टीने समाजात आपोआप फोफावणाऱ्या दुर्गुणांशी यशस्वी लढा देण्यासाठी समाजात जाणीवपूर्वक सद्गुणवृद्धीचे प्रयत्न नेटाने केले पाहिजेत. सद्गुण वृद्धीचे प्रमुख साधन म्हणजे सत्संग ! म्हणून सत्संगाचे व्यापक सामाजिकरण ही आजची गरज आहे. पारमार्थिक मार्गावर वाटचाल करताना जेव्हढी सद्गुणांची गरज आहे. तेव्हढीच गरज व्यावहारिक जगातील व्यवहार करतानासुद्धा आहे. त्या सद्गुणांमुळेच आपले व्यवहार परस्परांना कल्याणकारी ठरू शकतात. मंगलकारी ठरू शकतात. आजच्या नव्या युगात कोणत्याही प्रकारचे शोषण न होणारी समाजव्यवस्था आदर्श म्हणून, उद्दिष्ट म्हणून समाज धुरिणींच्या डोळ्यापुढे आहे. पण अद्यापी अशी व्यवस्था निर्माण होऊ शकलेली नाही. समाजात सद्गुणांची व्यावहारिक पातळीवर वृद्धी झाली तर मात्र असा शोषणमुक्त समाज निर्माण होण कठीण असले तरी अशक्य नाही. आज दानधर्म करणारे शेठश्रीमंत धार्मिक असतात पण त्यांची ती दयाबुद्धी बन्धुभाव त्यांच्या व्यवहारात दिसत नाही. शेठ सावकाराच्याच नव्हे तर 'वेल टू डू' समाजातील सर्वच लोकांना 'नाही रे' वर्गाबद्दल बन्धूभाव जेव्हा वाटेल तो दिवस खऱ्या अर्थाने मानवगौरव दिन ठरेल. तोवर शेठ सावकार





शोषण करून गैरमार्गाने पैसा मिळवणार व त्या पैशावरच दानधर्म करून - देवळे बांधून प्रतिष्ठा कमविणार हे असेच चालायचे. या दृष्टिने प्रस्थापित वर्गाला जेव्हढा संत संग लाभेल तेव्हढी त्यांची उपेक्षित समाजाबद्दलची बन्धूभावाची भावना अधिकाधिक व्यापक होत जाईल. वरच्या थरातून पाणी खालच्या थरात येते - झिरपते तसे मग प्रस्थापित वर्गातील करूणा-बन्धूभाव-परोपकारवृत्ती हे सद्‌गुण खालच्या समाजात आपोआप झिरपतील. प्रस्थापितांच्या बन्धूभावयुक्त सहकार्याने खालचा वर्ग मग 'उपेक्षित वर्ग' म्हणून गणला जाणार नाही. हळूहळू दोन्ही समाज सद्‌गुणसंपन्न समाज म्हणून ऐक्य पावतील. आणि असे मनोमिलन - असे ऐक्य हेच खरे सामाजिक ऐक्य असेल ते कायद्याने निर्माण होणाऱ्या एकतेपेक्षा अधिक दृढ असेल असे मला वाटते.

'संत सग' म्हणजे बुवाबाजी करणाऱ्या - प्रसिद्धीच्या सदैव झोतात राहण्याची दक्षता घेणाऱ्या - पंचतारांकित हॉटेलसारखे ऐषारामी आश्रम बांधणाऱ्या - सत्तारुढ मंत्र्यांच्या बरोबरीने बैस ऊठ करणाऱ्यांचा सहवास नव्हे. कृपया कोणी गैरसमज करून घेऊ नये. एवढ्याचसाठी हा खुलासा करावा वाटतो. भगवेगपडे व रुद्राक्ष माळा-कपाळी मोठ्ठाले गंधाचे पट्टे आणि हातभर दाढी संतांची लक्षणे नव्हेत. ऋतुजा-सात्त्विकता-मृदुता-मधुरता-निर्गर्विता- अपरिग्रहीवृत्ती आणि मनुष्यजातीबद्दल जातीनिरपेक्ष पंथनिरपेक्ष असीम करूणा ही संतत्त्वाची खरी लक्षणे होत. या लक्षणांनी मंडित अशी व्यक्ती मग ती पॅन्ट बुशशर्ट घालो वा केशरी वस्त्रे परिधान न करो. खरी संत म्हणून पूजनिय, अनुकरणीय समजली जावी. अशा व्यक्तिंचा संग-सहवास-उपदेश-शिकवण हाच खरा संतसंग होय !

सद्‌गुण वृद्धीचा एवढा आग्रह-आटापिटा का? दुर्गुणांचा एवढा दु:स्वास का? असेही काही महाभाग प्रश्न विचारतील, विचारतात. ही माणसे - प्रश्नकर्ते आज अहंकाराने मीपणाने असे प्रश्न विचारतात. पण कालांतराने टक्केटोणपे खाऊन वृद्धापकाळी, वेळ निघून गेल्यावर पश्चात्ताप करीत देवधर्माच्या-संतसंगाच्याच वाटेने जातात. एक छोटीशी गोष्ट या बाबतीत लक्षात घेण्यासारखी आहे. एक अट्टल दरोडेखोर होता. दरोडे घालून तो अफाट पैसा मिळवितो. एके दिवशी पकडला जातो. 'तू दरोडे का घालतोस?' असा प्रश्न त्याला विचारला जातो तेव्हा तो सांगतो - 'माझे लहानपण-तरुणपण खूप गरिबीत-उपासमारीत गेले, आपल्या मुलबाळांचे लहानपण-तरुणपण असे उपासमारीने जाऊ नये म्हणून मी दरोडे घालण्यास सुरूवात केली. माझ्या मुलाने शिकून लई मोठं डॉक्टर-फाक्टर व्हाव असे मला वाटते. त्यासाठी मी दरोडे घालून पैसा जमवितो.' गोष्ट संपली. मतितार्थ एवढाच की- दरोडे खोरालाही आपला मुलगा डॉक्टर व्हावा असे वाटते. अट्टल दरोडेखोर व्हावा असे वाटत नाही. असे का? दरोडेखोराच्या ठायी वसत असलेल्या सद्‌गुणवृद्धीच्या निसर्गदत्त ओढीमध्ये उत्तर दडलेले आहे. मात्र या ओढीला कृतीचे जोड व योग्य संगत भेटण्याची गरज असते. अन्यथा ही गोष्ट न फुलणाऱ्या कळ्यासारखी मनातच कोमेजून तिचे निर्माल्य होते.

सत्संगमहतीचे महत्त्व लक्षात येण्यासाठी पुढील आर्या चिंतनीय आहे.

**तोयाचे परि नावही न उरते, संतप्त लोहावरी।**
**ते भासे नलिनीदलावरी पहा, सन्मौक्तिकाचे परी।**
**जे स्वाती स्तव अब्धिशुक्तिपुटक, मोती घडे नेटके।**
**जाणा उत्तम मध्यम अधम दशा, संसर्ग योगे टिके ।**

या आर्येत पाण्याच्या थेंबाच्या तीन वेगवेगळ्या वस्तूंच्या संसर्गामुळे होणाऱ्या अवस्था वर्णन केल्या आहेत. तापलेल्या लोखंडावर पडलेल्या पाण्याच्या थेंबाचे नावही उरत नाही; फुलाच्या पाकळीवर पडलेला थेंब मोत्यासारखा वाटतो तर स्वातीनक्षत्री शिंपल्यात पडलेला थेंब खरा मोतीच होतो. या वरुन उत्तम- मध्यम अधम दशा संसर्गामुळे कशा प्राप्त होतात हे समजून येते. माणसाच्या बाबतीतही तेच खरे आहे. त्याला संस्कारा बरोबरच संगत कशी लाभते. यावर त्याचे भवितव्य ठरत असते. म्हणून शहाण्या सूज्ञ माणसाने संतसंग संत सहवासाचा लाभ घेऊन आपले दुर्मिळ असे मनुष्य जीवन अधिकाधिक कल्याणकारी अधिकाधिक मंगलमय करण्याची आजच्या विज्ञानयुगातही पूर्वी इतकीच गरज आहे.

✿ ✿ ✿

चंद्र आणि चंदनापेक्षाही संत सज्जनांचा सहवास अधिक शितल व शांतीप्रद असतो.

- महाकवी कालिदास



# महापुरुषसंश्रय

– वेदमूर्ती स. कृ. देवधर –

**मनुष्यत्व, मुमुक्षुत्व आणि महापुरूषसंश्रय या तीन गोष्टी प्राप्त होणे हे अत्यंत दुर्लभ आहे असे आद्य शंकराचार्यांनी 'विवेकचुडामणी' मध्ये म्हटलेले आहे. वेदमूर्ती स. कृ. देवधर यांचा वेद-उपनिषद ग्रंथे आणि संस्कृत वाङ्मयावरील अधिकार महाराष्ट्रातील वाचकांना परिचित आहे. अशा अधिकारी पुरुषाने आपल्या जीवनात अनुभवलेला महापुरुषसंश्रय. –**

### सन्तांचे संगती

पूज्यपाद श्रीमत् आद्य शंकराचार्य अनुभूतीपूर्ण विवेक चूडामणि नावाच्या ग्रंथात सन्तसहवास, सन्तदर्शन किती दुर्लभ आहे याचा मागोवा घेताना म्हणतात –

**दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रहहेतुकम् ।**
**मनुष्यत्वं मुमुक्षत्वं महापुरुषसंश्रयः।**

मनुष्य जन्म, मोक्षाची तीव्र इच्छा आणि आत्मसाक्षात्कारी पुरुषांचा सहवास ह्या तीन गोष्टी अत्यंत दुर्लभ आहेत परंतु परमेश्वराच्या कृपेने मात्र त्यांचा लाभ होतो.

यांपैकी मागील जन्माच्या सुकृती-पुंजीमुळे आपणास मनुष्य देह प्राप्त झालेला आहे. या देहामुळेच माणसाला ईश्वरात्वापर्यंत जाता येते. इतकेच नव्हे त्या परमेश्वरामध्ये एकरूप होता येते. अर्थात त्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रयत्न करावे लागतात. याची उत्तरे सर्व ग्रंथातून मिळतात. त्यामध्ये सन्तसज्जनांचा सहवास प्रामुख्याने आहे. संत सहवासाशिवाय अन्य साधने उपलब्ध असली तरीसुद्धा त्यांचा परिणाम अनेकदा त्रुटीमय असतो. भगवान् श्रीकृष्ण श्रीमद्भगवद्गीतेंत म्हणतात – **बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते ।** (भ.गी. ७.१९.) अनेक जन्म ज्ञानप्राप्तिमध्ये जातात आणि असा ज्ञानवान् पुरुष अनेक जन्मानंतरच माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो असे म्हणतात. अशा अनेक जन्मांच्या पसाऱ्यात सन्तदर्शन आणि सहवास यांना मोठे मानाचे स्थान आहे. एका जन्माच्या सामग्रीवर पुढचा जन्म चांगला येतो, त्या जन्मातील बरवेपण आणि सन्तसहवास यांमुळे प्रत्येक प्राणिमात्रांमध्ये उत्तम फरक होत जातो आणि अखेर तो ईश्वरनामक सत्तेमध्ये एकरूप होतो.

सर्व सन्तमहात्मे सतसंगतीचा आग्रह धरतात कारण त्यांच्या अनुभूतीमध्ये याचा फार मोठा वाटा असतो. अशा महात्म्यांचा सहवास काय करतो याचा अनुभव मी स्वत: घेतला आहे. गुरूवर्य रघुनाथ केशव उर्फ दादा म्हाळगी हे ज्ञानेश्वर आणि ज्ञानदेवी यांचे महान भक्त होते. त्यांनी आपले सर्वच आयुष्य एकाच गोष्टीसाठी वेचले. ते नेहमी म्हणत की ज्ञानेश्वरीची प्रत्येक ओवी हा दैवी आचाराचा आदर्श आहे. ज्ञानदेवांच्या ओवीतील सूक्ष्म आशय लक्षात घेवून त्याप्रमाणे आचरण केले तर देव जवळ करता येतो, यावर मी विचार केला. प्रत्येक आचार अतीशय अवघड आणि लौकीक जगात फारशी मान्यता नसणारा आहे. ते माझ्याजवळ बोलत होते. एक उदाहरण म्हणून त्यांनी मला सांगितलं – 'ही माऊलींची ओवी बघ ---'

**नाना कृषिवळू आपुले । पांघुरवी पेरिले ।**
**तैसे झाकी निपजले । दानपुण्य ।. (ज्ञा. १३)**

आपण आपल्यावर झालेल्या संस्काराप्रमाणे जी कर्मे प्रत्यक्षही करतो ती चांगलीच असतात. असा आपला गोड समज असतो. परंतु आपणास गोड वाटणारे कधी काळी कडू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण परमेश्वराची भारी उपासना करतो. त्यामध्ये आपणास आनंदाचा लाभ होतो. आपण या बाबतीत फार मोठे झाल्याचा भ्रम निर्माण होतो. आणि त्या मोठेपणामुळे अधिक मोठेपण प्राप्त व्हावे किंवा आपल्या मोठेपणाची स्तुती व्हावी, चार चौघात आपले नाव घेतले जावे असे वाटू लागते. आपण काय करतो आणि आपणास कसा अनुभव येतो ते आपण मोकळेपणाने आणि अधिक रुचिर होईल अशा पद्धतीने लोकांना सांगतो. लोक त्याचा फायदा घेतात. आणि त्याप्रमाणे अनुभव प्राप्त झाला नाही. म्हणजे तेच लोक नावे ठेवतात. हे पारमार्थिक दैन्य आहे. म्हणून ज्ञानेश्वर महाराज एक लौकीक उदाहरण देतात. ज्या शेतकऱ्याला आपले उत्पन्न उत्तम प्रकारे यावे असे वाटतें किंवा आपल्या मेहनतीला उत्तम फळ प्राप्त व्हावे असे वाटते तो शेतकरी आपण जे बी शेतात पेरतो ते त्यावर माती टाकून झाकून टाकतो कारण त्याला माहीत असते की हे बी असे झाकून न टाकता उघडेच ठेवले तर बियांचे दाणे पक्षी किडे, कीटक खाऊन टाकतील आणि आपल्या हाती काहीही येणार नाही. अशा झाकलेल्या एका बीजापोटी अगणित गोमटी फळे प्राप्त होतात. सर्व मेहनतीचे फळ प्राप्त झाल्याचा आनंद मिळतो आणि तो कायम टिकतो. या उदाहरणाप्रमाणे आपण जे करतो ते उघड केले नाही तर ते करणे बीजाप्रमाणे अंकुरत जाते आणि त्याचा विश्रांती आणि छाया प्रदान करणारा वृक्ष होतो. गुरुवर्य दादांच्या सहवासामुळे आपण कोणी मोठे आहोत निदान मोठे होण्याचा तीव्र प्रयत्न कसा चालू आहे हे सर्वांना कळावें म्हणून बोलणारे माझे तोंड गप्प झाले आणि त्यामुळे बाह्य-जनसंपर्क कमी झाला. सर्व आपल्या उपासनेमधून परमेश्वराकडे लागावे असा सर्वोत्तम बदल झाला आहे.

पुढे ज्ञानेश्वरीवरील प्रवचने ऐकताना एक आगळा आनंद लाभू लागला. जे ज्ञानेश्वरीचे अंतरंग अधिकारी प्रवचन करीत त्यांचा शब्दबीजांचा रुजवा हृदयात होई आणि त्या बीजातून निघालेल्या हरितवर्ण लोभांची लवलव ज्ञानदेवांच्या आर्द्र हृदयाची आठवण करून देत. याच्या विरुद्ध ज्ञानेश्वरी केवळ शब्द पांडित्यासाठी ज्यांनी जोपासली त्याचे भावशून्य आणि राकट शब्द मनाला तेथून बाजूला नेतात. ज्ञानदेवांच्या प्रेमळ शब्दसरितेच्या काठांवरील मवाळ वारा मनाला शान्ती प्रदान करतो. या ओवीच्या प्रभावामुळे शब्दार्द्रता कोठे आहे आणि रुक्षता कोठे जाणवते, याचे ज्ञान आपोआप होते.

असाच एकदा गुरुवर्य दादांजवळ बोलत असतां ज्ञानदेवीतील आचारदर्शनाबद्दल ते म्हणाले -

**सुखी संतोषी न यावें । दुःखी विशादा न भजावे।**
**लाभालाभ न धरावे । मनामानी ॥**

प्रापंचिक सुखाने संतोषावे हे मानवी वर्तन आहे. दुःखाने विषाद वाटावा हा मानवी स्वभाव आहे. या दोघांनाही उलटपणे भोगण्याचा प्रयत्न केला तर जीवन आनंदमय होते. विष्णुसहस्त्रनामामध्ये **'भयकृत, भयनाशन्'**। भगवंताची ही दोन्ही कीर्तिनामे एकत्र आली आहेत. भय निर्माण करण्याचे कार्य भगवान् करतात आणि त्यातून चांगले प्रत्ययाला यावे असा भयनाश पण भगवंतच करतात म्हणून भगवंताला नावे ठेऊ नयेत.

गुरुवर्य दादांच्या सहवासांत दादांना उदासीन अगर दुःखी पाहाण्याचा प्रसंग मला कधीच जाणवला नाही. प्रपंचात एखादी अप्रिय घटना घडली की यापुढे काहीतरी चांगले निश्चितपणे आहे असा निश्चय करून मी अविचल राहाण्याचा प्रयत्न केला तरी मनाचा एखादा कोपरा मात्र कधी काळी कुरकुरायचा त्याच्याकडे दुर्लक्ष केले की त्याचे कुरकुरणे कानी येत नसे.

१७ नोव्हेंबर १९७५ साली मला रेल्वेचा फार मोठा अपघात झाला. मनाचा एक कोपरा कुरकुरला पण त्याला मी गप्प बसविले. पुढे शस्त्रक्रियादी संस्कार झाले, पाय जोडला गेला होता. परंतु चालता येत नव्हते. अनेक लोक मला भेटायला यायचे. दुःख आणि सहानुभूति प्रदर्शित करायचे. त्याचे शब्द थांबले म्हणजे मीच त्यांना सांगत असे. भगवान किती कृपाळू आहेत ते तुम्हाला सांगून समजणार नाही. असं पडून राहिल्यानं चिंतनात सर्वांचा विसर पडतो. आणि धावरे मन भगवंताच्या पायाशी लडिवाळी करीत राहाते. पुढे दीड महिन्यानी बसता येवू लागल्यावर १९६३ साली सुप्तपणे केलेल्या गायत्रीमंत्रावर काही लेखन करण्याच्या संकल्पाला जाग आली. पूर्वीची अनुभवाची टिपणे आणि संदर्भ काढायला सांगितले आणि ज्ञानेश्वर माऊलीला सांगून लेखनास प्रारंभ केला. पुढील पांच महिन्याच्या काळांत पुस्तक लिहून पूर्णविले आणि प्रकाशात आलें तेव्हा अतीव आनंद झाला. वाटले गुरुवर्य दादांच्या सहवासाने ज्ञानदेवांच्या एका ओवीचा पुसटश्या





झालेल्या परिचयाने केवढे मोठे कार्य करवून घेतलें. असे असतांना मी आपघाताबद्दल देवाला कसे दूषण देऊ? तसे दूषण देत बसलो असतो तर या प्रापंचिक आणि पारमार्थिक दोन्ही आनंदाना मी कायमचा मुकलो असतो.

सन्त, स्वानुभवी वयोवृद्ध, तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध यांच्या सहवासाचा त्याग कधीही करू नये केवळ त्यांचे अस्तित्त्व सुद्धा सामान्यांची संकटे नाहीशी करतात आणि सुखाला जागा करून देतात. शुल्लक आणि तरीही उपयुक्त अशी एक कथा मी पूर्वी वाचली होती. या बाबतीत ती बरेच काही सांगून जाते.

एकदा एका खेडेगावात लग्न होतं. वऱ्हाडी मंडळी आणि नवरदेवांनी रुसावे आणि मुलीच्या बापाला अडचणीत आणून धन-प्राप्ती करून घ्यावी असं नवरदेवांकडील मंडळींनी ठरविले. नवरदेवांचे वडील मुलीच्या वडिलांकडे आले आणि म्हणाले - नवरदेव म्हणतो आमच्या सगळ्या मित्रांना एक महिनाभर रोज जिलबीचे जेवण द्यावयाचे आहे. त्यासाठी साजुक तूप तुम्ही पुरवा.

ठीक आहे. किती तूप लागेल? मुलीचे वडील म्हणाले.

आमची मागच्या दारी विहिर आहे ती भरून तूप लागेल.

वधुपिता घाबरला त्याला काही सुचेना. तो म्हणाला जरा विचार करून सांगतो.

बघा. लवकर सांगा. असं म्हणून वरपिता निघून गेला.

वधुपित्याने आपले सर्व मित्र बोलावले. त्यांना अडचण सांगितली. पैसे कोठून आणायचे आणि एवढं तूप तरी कोठे मिळणार? सर्वांचे चेहरे प्रश्नांकित आणि काळजीयुक्त झाले. लग्न घरावर एकदम बिकट प्रसंग आल्याने आनंद संपला. घाई नाही. गडबड नाही हे पाहून वधू-पित्याच्या आजोबांनी विचारलं कां रे सारे गप्प गप्प का? आजोबांची अडचण होईल म्हणून त्यांनी लग्नाला येऊ नये असे ठरवले होते. पण मागच्या गाडीने आजोबा आले होते. अशा आजोबांनी नको तो प्रश्न विचारला. तेव्हा वधुपित्याने सर्व सांगितले ते ऐकून घेऊन आजोबा पिंक थुकत म्हणाले एवढंच ना? मग जा त्या वर पित्याला सांग ठीक आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणे तूप घेवून येतो. एवढं सांगून वधुपिता परत आला. त्याला आजोबांनी पुन्हा पाठविले आणि निरोप दिलास. तुमची विहीर ताबडतोब रिकामी करून द्या. गाड्या आता येतील. तूप विहिरीत ओततील आणि लगेच निघतील. अर्ध्या तासांत उरका. एवढं सांगून तो परत आला. त्याला आजोबांनी परत पाठविलं आणि विचारायला सांगितलं झाली का विहीर रिकामी. वरपित्याजवळ उत्तर नव्हते. त्याने वधुपित्याचे पाय धरले आणि सांगितलं आमचं चुकलं आम्हाला क्षमा करा. तुमच्या तुपाचे आणि गाडीभाड्याचे पैसे मी देतो पण याची चर्चा मात्र करू नका. वधुपिता परतला तेव्हा त्याला आजोबा म्हणाले, 'अरे **म्हातारी माणसं टाकाऊ नसतात. त्यांचा असा उपयोग होतो.**

म्हणून असं म्हणतात की ज्या ठिकाणी तपोनिष्ठ भक्त, ज्ञानवृद्ध आणि वयोवृद्ध असतील त्यांच्या नेहमी सहवासांत राहावे. त्या श्रेष्ठांच्या केवळ गप्पा म्हणजे सुद्धा ऐकणाऱ्याला अमोलिक मार्गदर्शन असते. सन्तश्रेष्ठ तुकाराम महाराज या संतसंगतीचा लाभ वर्णन करताना म्हणतात. -

**काय सांगो आंता संतांचे उपकार ।**
**मज निरंतर जागविती ।**
**काय द्यावे त्यांचे व्हावे उतराई ।**
**ठेविता हा पायी जीव थोडा ।**
**सहज बोलणे हित उपदेश ।**
**करुनि सायास शिकविती ॥**
**तुका म्हणे वत्स धेनुवेच्या चित्ती ।**
**तैसे मज येती सांभाळीत ॥**

अशा लाभासाठी सन्तांच्या सान्निध्याचा ध्यास घ्यावा । त्यांच्या सांनिध्यात जावे आणि ज्ञानेश्वर माऊली सांगतात. त्याप्रमाणे -

**तरी तनुमनुजीवे । चरणांसी लागावे ।**
**अगर्वता करावें । दास्य सकळ ॥ (१६७)**
**मग अपेक्षित ते आपुले । तेही सांगतील पुशिले ।**
**जेणे अंत:करण बोधले । संकल्पा न ये ॥ ज्ञा ४-१६८**

पूर्वीच्या अशा सन्तवचनांचा मागोवा घेत चाळत असतां गु. दादा म्हाळगी यांची भेट झाली. आणि

**मग आलिंगिली पौर्णिमा । उणीव सांडी चंद्रमा ।**
**तैसे होय वीरोत्तमा । गुरुकृपा तया ॥ ज्ञा. १८-९६९**

याप्रमाणे माझ्यामधील नित्यसमाधानातील असलेली आणि भविष्यात येणारी उणीव संपुष्टात आली. हेंच भाग्य.

✿✿✿



# संत येती घरा

**- ह. भ. प. रामपुरी महाराज -**

**संत संगाचे महत्त्व वेगवेगळ्या छोट्या छोट्या कथा - गोष्टींद्वारे पटवून देणे ही प्रवचनकार - कीर्तनकाराची खास हातोटी असते. आमच्या संस्थानचे एक विश्वस्त श्री. रा. नि. गोसावी उर्फ रामपुरी महाराज हे उत्तम कीर्तनकार आहेत. त्यांनी आपल्या खास गोष्टीरूप शैलीत सांगितलेली संत संगाची महती-**

संत शब्द उच्चारताच सज्जनत्व आलेच. सज्जनांचा क्षणाचा सहवास देखील जीवाचे कल्याण करू शकतो. संतपरिसाशी जडमुढजिवाचा स्पर्श व्हावा कि त्याचे सुवर्ण होण्यास विलंब तो काय? परंतू

**लोह परिसाशी रूसले ।**
**सोनेपणाशी मुकले ॥**
**येथे काय बा कुणाचे गेले ।**
**ज्याचे त्याने अनहित केले ॥**

सज्जन हा एक समाजातील क्रियाशिल कारखाना आहे. जसे साखर कारखान्यात गव्हाणीमध्ये ऊस टाकल्यावर पुष्कळ प्रक्रियानंतर पांढरीशुभ्र गोड साखर जन्म घेते तद्वत् सज्जनाचे कारखान्यात एका बाजूने दुर्जन टाकल्यास दुसरे बाजुने विकाररहित निर्मळ सज्जन बाहेर पडतो.

आजच्या विज्ञानयुगात व भोगाकडे प्रवृत्त झालेल्या समाजात सज्जन दुर्मिळ झालेत. जे आहेत त्यांचा लाभ घेणारे अती दुर्लभ झालेत. भोगवादाने निरस झालेल्या या जीवसृष्टीत आन्तरिक शांती देणारे फक्त संत सज्जनच आहेत.

## ॥ चिंता रोगी राजा ॥

काही गर्भश्रीमंताकडे उपलब्धता असून उपभोगण्याचे सामर्थ नाही. उदा. ज्याचे कडे पुष्कळ साखर आहे त्यास मधुमेह झालाय, अशा प्रकारे प्रत्येक मनुष्य उद्विग्नतेच्या भोवऱ्यात व दुःखात आहे त्यास त्यातून सोडविणारे फक्त संत-सज्जन व संतपिठेच आहेत म्हणून

**जाऊ संताचिया गांवा ।**
**घेऊ तेथेची विसावा ॥**

संत वचनामृताशिवाय मन विश्रांत होत नाही

एका धनाढ्य राजास संपत्तीप्राप्त करण्याचे हव्यासाने 'चिंता' नावाचा रोग झाला व तो दिवसेंदिवस कृश होत गेला. त्यांची चिंता एकच की माझी संपत्ती दुसऱ्या राजाने लुटली तर मी व माझी भावी पीढी दरिद्री होऊ. पुष्कळ वैद्यांनि त्याचेवर औषधोपचार केले परंतु चिंतारोग बरा होईना. त्याच नगरीतले एक संतमहात्मे राजाकडे आले व त्यांनी राजास रोगमुक्त करण्याचे आव्हान स्विकारले. बाकी वैद्य हासू लागले कारण त्यांनी अनंत उपचार केले होते पण राजाचा चिंता रोग हटेना, कारण - **चिंतासे घटे शरीर । कह गये दास कबिर।**

या साधूने राजास औषध सांगीतले की महाराज दररोज पाच पोते धान्य चौकात उभे राहून गोरगरिबांना मुक्त वाटणे. या प्रमाणे पांच दिवस हे औषध चालू ठेवणे. प्रतिदिवशी त्यात दुपटीने वाढ करणे. झाले औषध ऐकूण राजाचा रोग आणखी वाढला. कारण कजुंषास दान म्हटले की विषमज्वर अंगात भरतो. परंतू साधु महाफक्कड होते त्यांनी राजास या गोष्टीस तयार केले.

थरथरत्या हातांनी आपली संपत्ती राजा गरीबांना धान्य रूपाने वाटू लागताच धान्य घेणारे धाऊ लागले. तिसरे दिवशी एक मोळी विक्या डोक्यावर मोळी विक्री करत त्या ठिकाणी आला. तेंव्हा राजा त्यास म्हणाला 'अरे वेड्या काय मोळी विकत बसलाय पुष्कळ धान्य





घेऊन जा. ये इकडे' तेव्हा मोळी विक्या म्हणाला, 'मायबाप आपण मोप धान्य द्यायला तयार झालात. पण मी जरा माझ्या कारभारणीला विचारून येतो.

आणि तो त्याच्या पत्नीला घरी जाऊन धान्य आणण्याबद्दल विचारून आला व राजास म्हणाला, ''महाराज कारभारणीस आपल्या दानधर्माविषयी खूप खूषी वाटली माझ्या कारभारणीने घरात पिठाचा डबा तपसला आणि निरोप तुम्हासी दिला की सरकार दोन दिस पुरेल एवढं पिठ घरात हाय, ते सरलं तर नक्कीच तुम्हा मायबाप सरकारचं दान पत्करु.''

बस्स ज्याच्याकडे चार भाकरीचे पिठ शिल्लक आहे तो चिंतामुक्त असून सातपिढ्यांना पुरून ऊरेल एवढी संपत्ती माझेकडे असून मी चिंतारोगाने त्रस्त आहे. हा विचार येताक्षणीच राजा रोगमुक्त झाला.

## ज्ञानदेव-नामदेवाची कथा

संत कुठलाही प्रकारे जीवाचेसोने बनवतात घटना सुमारे ७०० वर्षापूर्वीची आहे. संत शिरोमणी महावैष्णव ज्ञानेश्वर महाराज व त्यांची भावंडे, संत नामदेव महाराज व अनन्त भक्त वारकरी पंढरपूरहून तिर्थाटनास पायी प्रयाण करते झाले. टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामाने प्रत्येक पाऊल मार्गावर पडत होते. रस्त्यात मिळणारे प्रत्येक गाव नगर पावन बनत होते. प्रती मुक्कामी किर्तन-प्रवचनाने लोक सुखावत होते. भक्ती रसात न्हाऊन निघत होते.

पुण्याचे मुक्कामाहून हा जनसमुदाय दिंडी सोहळा चाकण ग्रामी पोहचला राजे महिपतींनी त्यांचे स्वागत भोजन व्यवस्था पार पाडली. ज्ञानोबांचे तत्त्व प्रवचन झाले रात्री नामदेवांचे रसाळ व भक्तीरसाने ओथंबलेले हरिकिर्तन झाले. सकाळी दिंडी प्रयाणास सज्ज झाली तेंव्हा राजे महिपतीने ज्ञानोबांना विनंती केली की माऊली आपण एकवेळ कऱ्हाडला जाऊन दामाद राजा रामराय यांचेवर कृपा करावी कारण ते मोगलाधिन होऊन नास्तिक प्रवृत्तीचे बनले माझी खात्री आहेत. आपण त्यांचेवर कृपा करावी.

अशा ज्ञानदेव-नामदेवांनि कऱ्हाड ग्राम गाठले. परंतु त्यांना शिपाई लोकांकरवी ग्रामप्रवेशाला मज्जाव झाला आणि त्यांनी मग कृष्णा-कोयनेच्या वाळवंटात किर्तनारंभ केला. किर्तनास कऱ्हाड ग्रामीचे सज्जन प्रतिदिन गर्दी करू लागले. आणि राजे महीपती चाकणकर यांची सुकन्या रामरायाची साध्वी पत्नी किर्तनास जाण्यास पतीकडे परवानगी मागू लागली. परंतु धर्मविरोधी राजाने परवानगी नाकारली. या बाईने अन्नपाणी सोडले. शेवटी रामरायास परवानगी द्यावी लागली. किर्तनासी जाणे, परंतु पालखीत बसून, किर्तन पालखितून ऐकणे व बुवांचे दर्शन न घेता परत येणे सोबत हत्यारबंद पहारेदार असतील.

या प्रमाणे ही माऊली पांचवे दिवसांचे नामदेवांचे किर्तन श्रवण करून राजवाड्यात आली. रात्रभर झोप नाही. कारण थोर संत नगरीजवळ येऊन त्यांना ग्रामप्रवेश नाही. साधे दर्शन नाही.

सकाळी राणीने एक प्रयोग केला एकुलत्या तीन वर्षाच्या आपल्या मुलास अंगठीमधील हिरकणी या चूर दूधातून पाजला. तिला ठाऊक होते या हिरकणीने मुल मृत्यू पावणार आहे. परंतु संत संगाचे ध्येयाने वेडी झालेली ही माऊली बैचेन झाली होती. तिचा विश्वास होता की या प्रयोगाने दुरावलेले संत गावात येतील.

मुलाचे पोटात हिऱ्याचे कण गेल्यावर मुलगा कासाविस करू लागला. संपूर्ण राजवाड्यात बातमी पसरली. राजा स्वत: हजर झाला. मुलास काय होते. कुठला रोग आहे हे कळेना वैद्य हकीम थकले. तेव्हा राणीसाहेब रडून म्हणू लागली की माझा मुलगा आता कुठल्याही उपायाने वाचू शकत नाही कारण हा सर्व त्या वाळवंटातील संत महात्म्यांच्या अव्हेराचा प्रताप आहे. ज्यांच्या संगतीने पतित पावन होतात, मृत जिवंत होतात, मुढ पंडीत होऊन वेद बोलू लागतात. त्या थोर संतांनी माझ्या राजकुमारावर साधा कृपाकटाक्ष टाकलातरी माझा बाळ या मरणासन्न रोगातून मुक्त होईल. परंतु आमच्या राजेसाहेबांना सांगावे कुणी.

राजा लगेच म्हणाला, 'बोलवा त्या लफंग्या गोसाव्यांना.'.

ते संतच आहेत आणि माझा दृढ विश्वास आहे की त्यांचे पावन स्पर्शाने माझा बाळ रोगमुक्त होईल.

आपल्यावर आलेले संकट टाळण्यासाठी मनुष्य निर्मित सर्व उपास वापरुन संकट टळत नाही असे खात्रीने उमजलेवर काही माणसे फक्त तेवढ्या संकटनाशापुरते देव व साधू यांना शरण जातात मात्र खात्री पटलेवर त्या देवाचे व महात्म्यांचे श्रद्धाळू अनुयायी बनतात. रामरायाचे बाबतीत तसेच घडले. ज्ञानोबा- नामदेवांचे सन्मानाने कऱ्हाडगावात वाजत-गाजत आगमण झाले. विठ्ठल नामाने संपूर्ण राजमहाल दुमदुमला मरणासन्न सुपुत्र ज्ञानोबांचे दोन्ही हातावर आडवा देऊन राणीने माऊली ज्ञानोबा व नामदेवांचे दर्शन घेतले. तिचे आज भाग्य उदयासी आले. मुलगा मरतो की काय या दु:खाचा विसर पडून संतसंग झाल्याच्या आनंदात ती माता न्हाऊन निघाली.

ज्ञानदेवांनी ते मुल नामदेवांचे हाती सोपविले. नामदेव घाबरले , पण ज्ञानोबा म्हणाले, ''नामा घाबरू नको, कारण भक्ती मार्गात आधी 'नाम' व नंतर 'ज्ञान.' नामदेवांनी मुल पोटाशी धरले. टाळ निनादले व मृदुंग दुमदुमले. विठ्ठलनामाने आकाश दुमदुमले. लोक ब्रह्मानंदात डुंबले आणि नामदेवांचे हातून आवेशाने बाळ उडी मारुन टाळ्या पिटू लागले. एकच जयघोष निनादला.

**पुंडलीक वरदा हरी विठ्ठल !**

# मी अनुभवलेले संतसंगाचे पावन क्षण

**– राजा मंगळवेढेकर –**

**'नव्हती ते संत करिता कवित्व ।' हा संत तुकाराम महाराज यांचा अभंग वाचला की संत कोणास म्हणावे ते आपणास कळते. पारमार्थिक क्षेत्राप्रमाणेच समाजकारणातही अनेक संतमहात्मे कार्यरत असतात. सत्प्रवृत्ती, सुजनत्वाची–मानव कल्याणाची दृष्टि आणि सत्कर्म रती अशा गुणांनी मंडीत व्यक्ती ही भक्ती मार्गी नसली तरी संतच! ज्येष्ठ साहित्यिक राजा मंगळवेढेकर यांचे जीवन गाडगे महाराज, विनोबा भावे व साने गुरुजी यांच्या सहवासाने धन्य–धन्य झालेले आहे. अशा धन्यतेच्या पावन क्षणांना शब्दांकित करणारा त्यांचा लेख**

पंढरपूर म्हणजे पंढरी. संतांची भू–वैकुंठनगरी. या पंढरीतच मी जन्मलो, शिकलो. वाढलो. विशीपर्यंत या विठुरायाच्या नगरीत, संतांच्या माहेरघरी 'आषाढी–कार्तिकी भक्तजन येती ...' अशा वारकरीगर्दीत मी हिंडलो. टाळ–मृदंगाच्या गजरात दिंड्यांमधून फिरलो. भजन–किर्तनात आणि प्रवचनात रंगलो. त्यावेळी कळलं थोडं, पण भावलं फार !

पंढरी क्षेत्रात ठिकठिकाणी मठ आणि मठाधिपतींची वस्ती. साधू–महाराजांची, संत–महंतांची चलती. हेही सगळं त्या वयात मी धांडोळलं आणि कसं कुणास ठाऊक माझ्या मनानं ते सगळं गुंडाळलं.

पण या गुंडाळण्यात एक मात्र राहून गेलं ते गुंडाळताच आलं नाही. मनात राहिलं ते एका वेगळ्याच आदर भावनेनं कायमचं चिकटून राहिलं. रुतून बसलं– ते ठिकाण होतं पंढरीच्या दक्षिणेला गावकुसाच्या बाहेर मराठी मुलुखात किंबहुना कदाचित देशातही असेल– अस्पृश्य बांधवांच्यासाठी ऊन–पावसाच्या वेळी गोरगरीब दलितांच्यासाठी बांधलेली पहिली धर्मशाळा. तिचं नाव ठेवलं होतं 'संत चोखामेळा धर्मशाळा' आणि ती बांधली होती डेबूजी, गोधड्या किंवा गाडगेबाबा म्हणून लळागाळातल्या जनलोकांत ओळखल्या जाणाऱ्या एका साधूवृत्तीच्या संत माणसानं. हा वेगळाच संत माणूस होता. त्याचं वागणं,बोलणं, करणं, गावोगाव फिरणं भजन–किर्तन करणं, धर्मशाळा बांधणं ... हे सगळंच आगळं वेगळं होतं. चिंध्यांच्या ठिगळाचा वेश, फाटके–तुटके जोडे, हातात झाडू आणि डोक्यावर थाळीसारखं खापर असा त्याचा अवतार. गावोगाव हातातल्या झाडूनं झाडायचा. एखाद्या घरी चटणी भाकरी मागून घ्यायचा. झाडाखाली बसून खापरीत खायचा. खापरीनंच पाणी प्यायचा. तीच डोक्यावर पालथी ठेवायचा. त्याची ती हॅटच !

मी गाडगेबाबांचं एकदा कीर्तन ऐकलं. त्यांच्या कीर्तनाचा थाट वेगळाच! रांगड्या वऱ्हाडीत ते पाच पाच हजार श्रोत्यांशी हृदयसंवाद साधायचे. ऐकणाऱ्यांना बोलकं करून सोडायचे. श्रोत्यांतील अंधश्रद्धेवर, दुष्ट रुढींवर, अज्ञान आळसावर मोठ्या मार्मिक विनोदानं फटकारे हणायचे. लोक हसून हसून सोसायचे... मी हे पाहिलं, ऐकलं आणि अनुभवलंदेखिल संत–साधुत्त्वाच्या खुणा उमगल्या आणि त्याच क्षणापासून माझ्यात आणि गाडगेबाबात निनावी पण आदर–जिव्हाळ्याचं नातं निर्माण झालं. यात्रेच्या वेळी पंढरीत येऊनही देवळाकडे पाठ फिरविणाऱ्या आणि जनलोकांत जनार्दन पाहणाऱ्या या संत माणसाची मी पुढं आणखी काही किर्तनं ऐकली. नातं दृढावलं.





एकदा चोखामेळा धर्मशाळेतच गेलो. बाबा अंगण झाडत होते. ते संपल्यावर एका खांबाशी टेकले. एकाला हाक मारली आणि हिशेब सांगू लागले. तो कागदावर टिपून घेऊ लागला. कुठली कुठली गावं, कुठली कुठली माणसं आणि कुणी कुणी काय काय दिलं यांची यादीच बाबा आठवून आठवून सांगत होते. पै न् पैचा हिशेब देत होते. त्यांना लिहिता-वाचता येत नव्हतं. अक्षरओळख नव्हती पण निर्लेप, निरिच्छ आणि निर्मोहीपणाची दोस्ती होती. स्मरण ताजं टवटवीत होतं.


मी दौंड गावी रेल्वे मजदूर पंचायतीचं काम करीत होतो. त्यावेळची गोष्ट. एकदा जेऊर नामक लहानश्या स्टेशनवर गेलो होतो. काम झाल्यावर दौंडकडे जाणाऱ्या रेल्वेची वाट पाहात होतो. तेवढ्यात कुर्डुवाडीकडून एक मालगाडी आली. मी युनियनचा कार्यकर्ता. बहुतेक ओळखीचे. शेवटच्या गार्डाच्या टपरीत चढलो. पाहतो तर मोकळ्या उघड्या जागेत देहाचं मुटकुळं करून गाडगेबाबा झोपलेले. गार्ड भला माणूस होता. त्यानं बाबांना झोपू दिलं होतं. मी तिथंच टेकलो. गाडीनं एक जोरदार धक्का दिला आणि चालू लागली. बाबांनी डोळे किलकिले करून विचारलं, ''कोनच टेसन गेलं ओ?'' मी सांगितलं, ''जेऊर'' ऐकलं आणि बाबांनी पुन्हा डोळे मिटून घेतले. तासाभरानं दौंड स्टेशनावर गाडी थांबली. बाबांनी लख्ख डोळे उघडून विचारलं, ''दौंड आलं का?'' मी म्हणाले, ''हो'' बाबा उठले आणि खाली उतरू लागले. मालगाडी फलाटाला लागलेली नव्हती आणि त्या ओबडधोबड डब्याच्या पायऱ्याही उंच होत्या. मी पुढं होऊन आधाराला हात देऊ लागलो. तशी त्यांनी मान हलवून नकाराची खूण केली. त्यांचे तेच सावरीत खाली उतरले. अनेकांना आधार देणाऱ्या बाबांनी स्वत:साठी कधी दुसऱ्याचा आधार घेतला नाही. बाबा उतरले आणि रुळाच्या कडेकडेनं चालू लागले. एका पोर्टरनं त्यांना ओळखलं. त्यानं ओरडून 'अरे गाडगेबाबा गाडगेबाबा' असं दोघातिघांना सांगितलं. त्यांनीही तेच केलं. हातातलं काम टाकून ते चार-पाच जण बाबांच्या दर्शनासाठी धावले. बाबांनी ते ऐकलं-पाहिलं आणि धावणाऱ्यांना हातांनीच येऊ नका, धावू नका असा इशारा दिला. पण तो धुडकावून ते धावतच सुटले. ऐकत नाहीत असं पाहून बाबांनी मग रुळाकडेच्या खडीतले दोन तीन दगड घेतले आणि धावणाऱ्यांच्याकडे भिरकावले. मग मात्र धावणारे थबकले. बाबा निघून गेले ते कधीच कोणाला आपल्या पाया पडू देत नसत. दूर लोटत असत. कीर्तन संपल की एकदम पळून जात असत. लपून बसत असत. भाबडे भक्त याला चमत्कार समजून बाबा अदृश्य झाले असं म्हणत असत. पण असले चमत्कार बाबांनी कधीच केले नाहीत. मोक्षाची लालूच दाखवून भाबड्यांना चकवले नाही, परलोकातल्या सुखाची झळाळी सांगून इहलोकातल्या दु:खाकडे कानाडोळा केला नाही. फार नाही पण अशीच अधूनमधून या संत माणसाची संगत लाभली.

## साने गुरूजी

गाडगेबाबांची संतसंगती अशी अधूनमधून आणि दुरून दुरून लाभली, तर साने गुरुजींची सोबत अगदी निकटची मिळाली. पंढरीत शाळेत शिकत होतो तेव्हा एकदा आम्ही राष्ट्रसेवादलाच्या वतीनं एकदा राष्ट्रीय गणेशोत्सव साजरा केला होता. साने गुरूजी व्याख्यानासाठी आले होते. माझी ती पहिली प्रत्यक्ष भेट. त्याआधी ते मला 'श्यामची आई', 'पत्री', 'विश्राम' या त्यांच्या पुस्तकांमधून आणि 'स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई । सुखवू प्रियतम भारतमाई ॥' 'पेटू दे देश, उठू दे देश येथून तेथून सारा पेटू दे देश।' अशा त्यांच्या प्रभातफेरीतल्या उर्जस्वल स्वातंत्र्यगीतांनी मनात ठाणं मांडले होते. त्यानंतर १९४१ च्या सुमारास साने गुरूजींची दुसरी भेट झाली. ती सुद्धा पंढरीतच. त्यावेळी त्यांनी गीतेवर तीन प्रवचने दिली होती. आणि नंतरच्या तिसऱ्या भेटीत मी त्यांच्या जणू कळपातच दाखल झालो.

१९४६-४७ सालातले ते दिवस. पंढरपूरचे प्राचीन विठ्ठलाचे मंदीर अस्पृश्य बांधवांना दर्शनासाठी खुले व्हावे म्हणून साने गुरूजींनी प्राणांतिक उपोषणाने आपले प्राण पणाला लावले होते. त्या आधी सेनापती बापट यांच्यासह हरिजनांना मंदीर प्रवेश मिळावा यासाठी लोकमत तयार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रव्यापी असा झंझावाती दौरा त्यांनी काढलेला होता. त्या दौऱ्यात आम्ही राष्ट्रसेवादलाच्या कलापथकातील शाहीर सामील झालो होतो. सेनापती आणि गुरूजी यांच्या भाषणानंतर आम्ही मंदीर प्रवेशाच्या संदर्भातच गाणी, पोवाडे आणि लोकनाट्या सादर करीत असू. दौऱ्यासाठी आम्ही एक लॉरी विकत घेतली होती आणि दिवसातून चार-पाच गावी खेडोपाडी जाऊन आम्ही प्रचार करीत असू. माझ्या दृष्टीने तर ह्या दौऱ्यात मला पुष्कळ पहायला, ऐकायला आणि शिकायला मिळाले. निसर्ग, स्थळं, खेडी, गावं आणि लोकजीवन जवळून निरखता आलं. सेनापती आणि गुरूजी या दोन संत माणसांच्या सहवासातील जंगम विद्यापीठात माझ्या पदरी बरचसं काही पडलं. गाठी बांधता आलं. या संतसंगतीतील कित्तीतरी आठवणी आहेत. इथं त्या किती सांगणार? ...

दौऱ्यानंतर गुरूजींचं उपोषण १ मे १९४७ रोजी पंढरीत सुरू झालं. सर्व महाराष्ट्रभर खळबळ उडालेली होती. बडवे हट्टाला पेटले होते. कॉंग्रेस सरकार नाकर्तेपणाची भूमिका घेऊन तटस्थ होते. बरेच काही घडत होते. गुरूजी उपोषणकाळात 'सत्य-असत्याशी मन केले ग्वाही मानियले नाही जनमता' अशा तुकारामी बाण्याने शांत निश्चिंत होते. उपवासकाळात त्यांच्या खिशात त्यांनी हृदयाशी पांडुरंगाचे चित्र ठेवलेले होते.



दौऱ्यात प्रवासात आम्ही एकत्रच जेवत खात असू. राहात असू. त्यावेळी थट्टा-विनोद चालायचे. शब्दांच्या भेंड्या खेळायचे. लहान थोरपणा असा आमच्यात राहिलेलाच नव्हता.

## विनोबा भावे

गुरुजी आणि सेनापती यांच्यानंतर काही वर्षांनी एका महान वैष्णवाचे, आधुनिक ऋषींचे, थोर संतांचे सान्निध्य मला माझ्या महानभाग्याने लाभले. १९५२ साली विनोबांचे भूदान आंदोलन सुरू झाले. धर्मचक्र फिरले आणि या संतांची पाऊले भारताच्या भू वरून राज्याराज्यातून फिरू लागले. भारतीय संस्कृतीतले दान महात्म्य सर्वदूर जनलोकांना संतवाणीतून कानी पडू लागले. चित्तात शिरू लागले. हजारो एकर जमिनींचे दान संतांच्या झोळीत पडू लागले. एक अद्‌भूत घडले. त्यावेळी भूदान आंदोलनाचा प्रचार करण्यासाठी सर्व भारतीय भाषांमधून पाक्षिके, मासिके, साप्ताहिके आणि पुस्तके प्रसिद्ध होऊ लागली. होती. पुण्याहून मराठीत निघणाऱ्या 'भूदानयज्ञ' या साप्ताहिकाच्या संपादनकार्यात मला प्रवेश मिळाला. विनोबांची शेकडो प्रवचने या निमित्ताने भाषांतरीत करण्याची संधी मला लाभली. विनोबांच्या विचारयात्रेत त्यांच्या बरोबर राहण्याची ही पर्वणीच मला लाभली होती.

त्या काळात शिबीरे होत असत, पदयात्रा निघत असत आणि संमेलने आदी भरत असत. मला त्यातून भाग घेण्याचे भाग्य लाभले. प्रत्यक्ष विनोबांच्या पदयात्रेतही त्यांच्यामागून चाललो. त्यांची प्रवचने ऐकली. एरवीही गाठीभेटी होत राहिल्या. 'साने गुरुजींची जीवनगाथा' लिहित असताना विनोबांनी मला महत्त्वपूर्ण मुलाखत दिली होती. विनोबांच्या संगतीत अनेक वेळा मला ज्ञानदेवांचा भास झाला. महाराष्ट्रातली संतपरंपरा आता 'ज्ञानोबा ते विनोबा' अशीच मानली जाते. विनोबांच्या संगतीतल्या आठवणीही पुष्कळ पुष्कळ आहेत इथे त्या किती सांगणार? ....

एक आठवण मात्र अशी आहे : एकदा आधुनिक वाल्मीकी ग.दि. माडगुळकर यांच्यासह पवनारच्या परंमधाम आश्रमात विनोबांच्या दर्शनासाठी गेलो होतो. त्यावेळी अण्णा माडगुळकरांनी एका कागदाच्या कपट्यावर एक ओवी लिहून विनोबांच्या पुढे ठेवली होती ती अशी होती:

**ज्ञान करुणेच्या सागरा।**
**वृद्धत्व लेइल्या ज्ञानेश्वरा।**
**आशीर्वाद असावा लेकरा।**
**आण नाही ॥**

❀ ❀ ❀





# संत संगाचा कृपाप्रसाद

## ग. के. कुलकर्णी

**श्री गजानन कुलकर्णी हे लेखक म्हणून 'श्री साईलीला' च्या वाचकांना उत्तम परिचित आहेत. त्यांचे लेखन सातत्यही विलक्षण आहे. त्यांच्या या लेखनाचे रहस्य त्यांना लाभलेला संत संग आहे. नानामहाराज व अण्णामहाराज अशा दोन अधिकारी सत्पुरुषांचा त्यांना कृपाप्रसाद लाभला आणि जीवन धन्य झाले. शारिरीक रोग तर पळालेच पण मानसिक अखंड प्रसन्नताही प्राप्त झाली. सुखाचा ठेवाच सापडला.**

सांप्रत कलीयुगाचा काळ सुरू आहे आणि कलीचा महिमा अत्यंत झपाट्याने आसमंत व्यापून टाकीत आहे. जीवन अत्यंत गतिमान आणि स्पर्धात्मक झाले आहे. जो तो भौतिक सुखाच्या मागे लागलेला आहे. सतत धावतो आहे आणि तिकाच दु:खी होत आहे. लोकांना आता धर्मग्रंथ वाचन, मनन चिंतन नकोसे झाले आहे. भगवंताबद्दलची अंतरिक प्रिती आणि भक्ती तेल संपलेल्या दिव्यातल्या वातीप्रमाणे मंद मंद होत चालली आहे.

इ.स. १३ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत संतांची एक मालिकाच तयार झाली होती. त्यामुळे हरिनामाचा गजर घराघरात दुमदुमत होता. मधल थोडा काळ ही मालिका खंडीत झाल्याने मलूल झाला होता. परंतु १८ व्या शतकाच्या अखेरीस आणि १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात तीन दत्तावतारी पुरुष एकाच वेळी थोड्या फार फरकाने प्रकट झाले. एक म्हणजे शेगावी गजानन महाराज, दुसरे अक्कलकोटला श्री स्वामीसमर्थ महाराज आणि **तिसरी विभूती शिडीचे श्रीसाईबाबा**. ह्या तीन महान विभूतींनी मलूल महाराष्ट्रात पुन्हा भक्ती चैतन्यनिर्माण केले. आज तरी महाराष्ट्रात घराघरात ह्या तीन विभूतींची भक्ती सुरु असलेली दिसते.

बालपणापासूनच माझ्या जीवनावर अध्यात्मिकसंस्कारसतत होत आले. तशा वातावरणातच माझे बालपण गेले आणि वाढत्यावयाबरोबर भक्तीची ओढ वाढत गेली. वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत मी पुष्कळ संतचरित्रे वाचली तो एक प्रकारचा **सत्संगच** होता. म्हणजे हुंदडायचे वय परंतु लहानपणापासून कानावर सतत हरिनामाचा, शिवनामाचा गजर होत राहिल्याने व वाचनाने मी कळत नकळत भक्तीमार्गाकडे खेचला गेलो आणि मनात रुजली ती दत्त भक्ती!

दत्तभक्तीची ओढ निर्माण झाली आणि दत्त हे माझ ऐकमेव श्रद्धास्थान बनलं. दत्तवाङ्मयाचा अभ्यास करता करता नाथपंथाची ओळख झाली आणि गुरूचरणाची ओढ लागली. येथपर्यंत जीवनातली २५ वर्ष सरली होती. जिथे जिथे अशा तऱ्हेच्या विभूतींचा वास आहे अस कळलं तिथे तिथे जाऊन आलो परंतु गुरु भेटेना २४ व्या वर्षी विवाह झाला आणि नंतर मी फार आजारी पडलो. हजारो रुपये गेले अनेक उपचार झाले. परंतु गुण आला नाही. आता आपण जगत नाही असंच मला त्यावेळी वाटत होत... आणि अचानक गुरू महाराज येऊन पुढ्यात उभे राहीले. त्याचं नाव श्रीमत् सद्‌गुरू नानामहाराज ओगले.

तुमच्या आमच्यासारखा अगदी सामान्य संसारी माणसासारखा पेहराव. अंगात कफनी नाही की गळ्यात रुद्राक्षाच्या माळा नाहीत. त्याचं वास्तव्य अंधेरी मुंबई येथे कामारोड वरील साध्या झोपडीत होतं. भेट झाली होती. अलिबागला त्यांचे एक शिष्य फौजदार श्री. एन्. डी पाटील यांच्या मार्फत.

महाराजांनी एकवेळ तीक्ष्ण दृष्टीने माझ्याकडे पाहीले. छातीला हात लावला आणि म्हणाले जा आजपासून तू बरा झालास. आणि खरोखरच मी पूर्ण बरा झालो. अर्थात त्या क्षणापासून मी महाराजांच्या मागोमाग निघालो.

महाराजांचे वास्तव्य अलिबागेत असताना मी माझ्या डोळ्यांनी आणखी एक चमत्कार पाहिला. महाराज ज्या ठिकाणी उतरले होते त्या घराच्या अगदी समोरच्या घरातच आबा कोचरेकर नावाचे गृहस्थ राहात होते. त्यावेळी ते अलिबाग नगरपालिकेत नगरसेवक होते. आणि राजकीय क्षेत्रात वजनदार व्यक्ती म्हणून वावरत होते. त्याबरोबर ह्या आबांच्याकडे

आणखी एक जमेची बाजू होती ती म्हणजे ते उत्तम ज्योतिषी होते. त्यांना डायबेटीससारख्या दुर्धर व्याधीने ग्रासलं होतं. डावा पाय पार नासला होता. दुसऱ्या दिवशी पायाचे ऑपरेशन होते. पाय पूर्ण काढायचा होता.

अचानकपणे महाराजांच्या काय मनात आलं कळेना त्यांनी पाटील (फौजदार) यांना हाक मारली आणि म्हणाले, 'अहो तुमच्या समोरचे हे आबा कोचरेकर उत्तम ज्योतिषी आहेत म्हणे ! बोलवा त्यांना बोलवा, जरा माझी पत्रिका तरी दाखवू या त्यांना. पाटील साहेबांनी आबांना बोलावले. आबांनी पत्रिका पाहिली आणि म्हणाले, 'ही निश्चितपणे योगी पुरुषाची पत्रिका आहे. पाटील साहेब ही पत्रिका कुणाची आहे ते सांगा आधी. पत्रिका देण्याआधी आबांना पत्रिका कुणाची आहे हे सांगितले नव्हते की पत्रिकेवर नाव नव्हते. आबा आपला हेका सोडीनात अखेर खरं ते सांगणं भाग पडलं आणि आबांनी अक्षरश: महाराजांच्या चरणावर लोटांगण घातलं आणि म्हणाले, 'माझ्या आईने मला तिच्या मृत्यूपूर्वी सांगितलं होतं, ''आबा तुला तुझ्या वयाच्या ५२ व्या वर्षी तुझा गुरू भेटेल आणि सर्व संकटांतून तुझी सुटका होईल.'' महाराज आज ती वेळ आली आहे. मला वाचवा. मला आपला म्हणा.'' महाराजही कळवळले. एव्हढ्या मोठ्या माणसाच्या डोळ्यातले अश्रू पाहून आम्हांलाही गहीवरून आले. महाराज म्हणाले, 'आबा ऊठ, घाबरू नकोस. दत्तमहाराज सार ठीक करतील. जा घरी जा आणि तुझा चिघळलेला पाय स्वच्छ करून ये. गरम पाण्याने धुवून जखमा पुसून ये.'' आबा उठले घरी गेले आणि लगेच पाय धुवून आले. आबा येताच महाराज पाटील साहेबांना म्हणाले. पाटील यांना भरपूर साखर टाकून चांगला गोड चहा करून आणून पाजा. काय आबा घेणार ना चहा?

कित्येक वर्षात साखरेला स्पर्श न केलेल्या आबांनी लगेच होकार भरला. महाराजांना हेच पाहायचे होतं. पाटलांनी चहा आणला आणि आबांनी तो बिन दिक्कत घेतला. ते पहाताच महाराजांनी क्षणाचाही विलंब लावला नाही आणि डबीतून विभूती काढली आणि आबांच्यापायाला झालेल्या जखमांवर टाकली. आम्ही सारे उघड्या डोळ्यांनी जागृतावस्थेत हे पहात होतो. मित्रहो ! सांगितले तर आश्चर्य वाटेल परंतु दुसऱ्या दिवशी कापून टाकावयाचा आबांचा पाय ठणठणीत बरा झाला. तोही एका तासाच्या आत. सर्व जखमा सुकल्या. दु:ख नाहीसं झालं आणि आबा नॉर्मल माणसासारखे हिंडू फिरू लागले. भरपूर साखर खाऊ लागले. डायबेटीस कुठे गेला कळलंच नाही.

ह्या नाना महाराजाच्या सान्निध्यात मी किमान दहा वर्ष होतो. त्यांनी मला नाथपंथांची खरी ओळख करून दिली. शाबरी मंत्राची किमया समजावून सांगितली. आज मितीला ते समाधिस्त आहेत.

माझे दुसरे गुरू परमपूज्य योगीराज अ.ल. भागवत. सन १९८० सुमारास त्यांनी मला अनुग्रह दिला. तोही पत्र पाठवून बोलावून. त्यांच्याकडूनही मला पुष्कळ ज्ञान प्राप्ती झाली. ज्योतिषशास्त्राची आवड मला पहिल्यापासूनच होती. परंतु खरी ओळख मला अण्णा महाराजांनी करून दिली. त्यांनी मला अध्यात्म आणि ज्योतिषशास्त्रावर लेखन करण्याची आज्ञा केली आणि तसा मनापासून आशीर्वादही दिला. माझे सर्व लेखन हे अण्णामहाराज आणि नाना महाराजांच्या आशिर्वादाचे फळ आहे इतकंच मी म्हणेन. आज माझे दोन्ही गुरू समाधीस्त आहेत पण मी त्यांचा संत संग आजही मनाने अनुभवितो ही त्यांचीच कृपा .

✿ ✿ ✿

# सत्संग

**श्रीरामकृष्ण क्षीरसागर महाराज**

एकदा नारदांना प्रश्न पडला की खरोखर सत्संगाचा काय उपयोग असतो? त्यांनी हा प्रश्न भगवंतांना विचारला. भगवंतांनी नारदांना सांगितले,

''जा, त्या किड्याला हा प्रश्न तुम्ही विचारा.''

नारदांनी किड्याला प्रश्न विचारताच तो किडा मरून पडला.

नारद देवाकडे परत गेले आणि म्हणाले, 'देवा, किडा तर उत्तर न देताच मेला.''

मग देवांनी नारदांना सांगितले, 'जा, त्या समोरून येण्याऱ्या श्वापदाला तोच प्रश्न विचारा.'

नारदांनी तो प्रश्न विचारताच ते श्वापदही मरून पडले.

नारद परत देवाकडे आले. तेव्हा देवांनी सांगितले, 'जा, त्या नुकत्याच जन्मलेल्या गाईच्या वासराला तुम्ही तोच प्रश्न विचारा'. ते वासरुही मरून पडले.

मग देवांनी नारदांना सांगितले 'जा त्या राजपुत्राला हाच प्रश्न विचारा, तेव्हा नारद म्हणाले, 'देवा नको, आधीचे सर्व मी प्रश्न विचारताच मेले येथपर्यंत ठीक, पण आता मानवाच्या जीवनाचा प्रश्न आहे.''

देव म्हणाले, 'नारदा जा, तुम्ही प्रश्न विचारा, मी तुमच्यामागे आहे.''

देवाची आज्ञा शिरसावंद्य मानून नारद राजवाड्याच्या दरवाजापाशी गेले आणि सांगितले की मला राजपुत्राला एक प्रश्न विचारायचा आहे.

राजा म्हणाला की राजपुत्राचा आत्ताच जन्म झाला आहे. त्याला तुमचा प्रश्न काय कळणार?

नारद म्हणाले, 'तशी देवाज्ञा आहे.''

हे ऐकून राजाने नारदांना राजपुत्राला प्रश्न विचारायची परवानगी दिली.

नारदांनी त्या अर्भकास प्रश्न विचारला, **'सत्संगाचा उपयोग काय?'**

आणि ते अर्भक बोलू लागले, म्हणाले,

''नारदा, तुम्ही मला मी किडा होतो तेव्हापासुन पहात आहात. त्या जन्मात आणि प्रत्येक पुढील जन्मात तुमच्या संत्संगतीमुळेच माझी सुटका झाली आणि मानवजन्मातही राजपुत्र होण्याचं भाग्य मला लाभलं. तेव्हा माझे तुम्हाला शतश: प्रणाम!'' आणि नारदांना सत्संगाचा उपयोग कळला.

सत्संगाचे महत्त्व इतके असते की जे शिष्य म्हणुन एखाद्या गुरुंकडे जातात ते गुरुंची परंपरा चालविण्यास पात्र होतात. विवेकानंदांचे उदाहरण सर्वश्रुतच आहे.

# संत संगतीचे काय सांगू सुख

## संत नामदेव

प्र. द. निकते

**संत संगतीने काय होते? असा खवचट प्रश्न अनेक कुतर्कवादी विचारतात. त्यांना एवढेच सांगावेसे वाटते की – संत संगाने वानराचा नर आणि नराचा नारायण होतो. वाल्या कोळ्याचा वाल्मिकी ऋषी हे त्याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. म्हणूनच संतशिरोमणी, उत्तरेत महाराष्ट्राची भक्तीध्वजा फडकाविणारे नामदेव महाराज आपल्या अभंगात म्हणतात– 'संत संगतीचे काय सांगू सुख।' संत नामदवेमहाराज वर्णीत संतसंग महती**

श्री पंढरीरायाचे प्रेम भांडारी, वैष्णवांचे राव आणि संत तथा भक्त शिरोमणी असणारे श्रीसंत नामदेवराय आपल्या अभंगातून 'संतसंग महात्म्य वर्णितांना म्हणतात,

**संतसंगतीचे काय सांगू सुख।**
**आपण पारिखे नाही तेथे॥**

खरोखरीच संतसंगतीचे सुख मोठे अलौकिक आहे. आपण तिथे पारिखे म्हणजे परके नाहीत. या कलियुगात सर्वश्रेष्ठ असे साधू आहेत. संत आहेत. त्यांना आपण शरण जावे. त्यांच्या संगतीत रहावे. ज्यायोगे देवांची भेट होते. हे सांगताना श्री नामदेवराय म्हणतात,

**संतापायी माथा धरिता सद्भावे।**
**तेणे भेटे देव आपोआप।**
**म्हणवून संता अखंड भजावे।**

स्वत: देवसुद्धा संतसंगतीकरिता आसुसलेला असतो. त्यालाही संतसंगतीत आनंद होतो.

**नामा म्हणे देव इच्छी संतसंग।**
**आम्हा जिवलग जन्मोजन्मी॥**

मानवी जीवनात तर संतसंगतीस विशेष महत्त्व आहे. संतसंगती शिवाय ज्ञान नाही. ब्रह्मप्राप्ती नाही. मानवी जीवनाची परिपूर्णता नाही. म्हणून जो संतसंगत करतो. तो धन्य होतो. ही धन्यता सांगताना नामदेवराय म्हणतात.

**धन्य नरदेही संतसंग करी।**
**त्रैलोक्य उद्धरी हेळामात्रे॥**

ही भारतभूमी धन्य आहे. कारण इथे संतांची मंदिराळी जन्माला आली. त्या सकल संतांनी नरदेहाचे सार्थक करण्यासाठी भक्तीमार्ग दाखविला. ते वाट कृपेची करीत, ते दिशाची स्नेहे भरीत, भक्तिबोध करीत, प्रेमसुख देत, नरदेहाचे सार्थक केले. संत हे साक्षात ब्रह्ममूर्ती आहेत. दीन जनांचा उद्धार करण्यासाठी संत अवतार घेतात. अशा साक्षात ब्रह्ममूर्ती असणाऱ्या संतांच्या संगतीत जीव धन्य होतो. त्याचा





उद्धार होतो. नामदेवराय म्हणतात.

**हो का दुराचारी विषयी आसक्त।**
**संतकृपे त्वरित उद्धरतो ॥**

**अखंडित नामा त्याचा वास पाहे।**
**निशिदिनी ध्याय संतसंगती ॥**

परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते. तसे संतांचे संगतीने अर्थात संतांच्या स्पर्शाने जीवनाचे सोने होते. जीवन धन्य होते. परिस प्राप्त झालेल संत परसा भागवत संत नामदेवांच्या सहवासात जेव्हा येतात तेव्हा संत नामदेवांच्या स्पर्शाने परसा भागवत हे खरे परिस होतात, त्यांचे जीवन धन्य होते. जीवनाचं सोनं करण्याचं अर्थात जीवन धन्य करण्याचं सामर्थ्य हे फक्त संतांच्यात आहे. परिसाच्या संगतीने लोखंडाचे सोने तसे संतांच्यासंगतीने नारायणाची प्राप्ती होते हे सांगतांना संत नामदेवराय म्हणतात,

**परिसाचेनि संग लोह होय सुवर्ण।**
**तैसा भेटे नारायण संतसंगे ॥**

**सरिता ओघ जाय सिंधूसी मिळून।**
**तैसा भेटे नारायण संतसंगे ॥**

याकरिता नामदेवराय देवाजवळ मागणे मागतात.

**नामा म्हणे केशवा मज देई संतसंग।**
**आणिक काही तुज न मागे बापा ॥**

संत संगतीचे महात्म्य वर्णन करतांना एका अभंगात संत नामदेवराय म्हणतात की, बहुरूप्याला ब्राह्मण मित्र मिळाला की, त्यांच्या सहवासाने तो सुद्धा अधिकारी बनू शकतो. कारण संतसंगतीने त्याचे बहुरूपीकरण जाते व तिथे त्याच्या आचार, विचारात संस्कार होतात. परिणाम त्या दोघांची जातकुळी एकच होते. दोघांचे गोत्रही एकच होते. हा विलक्षण परिणाम संतसंगतीचा होतो.

**बहुरूप्या पडियेले मित्र।**
**दोहीचे ते गोत्र एक झाले ॥**

अधिक स्पष्टीकरण करतांना नामदेवराय पुढे म्हणतात, वेश्येला जर पतिव्रतेचा शेजार मिळाला तर ती सुद्धा सदाचारी स्त्री बनू शकते. दोहींचा आचार एक होऊ शकतो.

**वेश्या पतिव्रते पडियेला शेजार।**
**दोहींचा आचार एक झाला ॥**

संतसंग मानवाला संसारातून तारून नतो. त्याला माणूस बनवितो याकरिता संतसंग धरावा. या उलट जर कुसंग धरला तर तो मानवास अधोगतीला नेतो. त्याची संगत तुम्हाला बाधल्याशिवाय रहात नाही हे सांगताना नामदेवराय म्हणतात –

**संग तोचि बाधी संग तोचि बाधी।**
**कुसंग तो बाधी नारायण ॥**

इथे नामदेवराय आपल्या स्वानुभव सांगताना म्हणतात, मी सुद्धा संतसंगतीमुळेच तरलो आहे, संतसंगतीमुळेच मी पांडुरंगमय झालो. माझे ध्यानी, मनी, चित्ती श्री पांडुरंग स्थिरावला. मी कृतार्थ झालो ही कृतार्थता व्यक्त करताना ते म्हणतात,

**नामा विष्णुदास सत्संगति बोधला।**
**आत्मा हा लाधला पांडुरंग ॥**

संतांच्या विषयी तथा संतांच्या संगती विषयी संत नामदेवराय आपल्या संत माहात्म्य या अभंग प्रकरणात खूप अभंगातून गुणगान गातात. सतत अंतरी असणाऱ्या प्रेमाच्या जिव्हाळ्याने सांगतात. अत्यंत आर्ततेने सांगतात, संतसंगत करा. सतत संतांच्या सहवासात रहा. ज्यायोगे चित्त समाधान पावेल व त्यास आपोआप निवृत्ती येईल. वैराग्याची प्राप्ती होईल. मोक्ष लाभेल.

**नामा म्हणे त्यांचे संगती।**
**चित्ता आपोआप येईल निवृत्ती ॥**

**याकरिता संतांच्या चरणा द्यावे आलिंगन।**
**जीवे निंबलोण उतरावे ॥**

**संतांचे द्वारीचा होईल द्वारपाळ।**
**तुटे मायाजाळ मोहपाश ॥**

**नामा म्हणे संत आहेत कृपासिंधू।**
**देती भक्ती बोधू प्रेमसुख ॥**

महाराष्ट्रीय संत कवीत हिन्दी भाषेत अभंग लिहिणारे संत नामदेवराय हे आद्य संत होत. त्यांनी मराठी प्रमाणे हिन्दी भाषेतही संतसंगतीचा महिमा गाईला आहे. ''नामे नारायण नही भेद।'' हे त्यांचे ध्येय होते. त्यास अनुसरून त्यांनी भागवतधर्माचा प्रचार पंजाबपर्यंत केला, सारा विस्कटलेला समाज संघटीत केला. सारे भेदभाव दूर सारून त्यांना माणूसधर्म शिकविला. तिथेही नामदेवराय संतसंगतीचा अपरंपार महिमा गातात. एका हिंदी अभंगात ते म्हणतात,

**हरी की भक्ति साधु की संगति**
**सोई दिन धाने लेख्यों।**

हरीची भक्ती, साधूची संगती ती ज्या दिवशी लाभेल तो दिवस धन्य होय. हा भवसागर तरून जाण्यासाठी एका हिंदी अभंगात संत नामदेवराय





म्हणातात, संतांपासून घ्यावे आणि संतांना द्यावे. संतसंगतीत मिळवून भवसागर जो तरावयास कठीण तो तरून जावा.

**संत सूं लेना संत सूं देना ।**
**संत संगति मिलि दुस्तर तिरना ॥**

संत हे आपले माता-पिता आहेत. मी स्वत: संत संगती मिळवून तरलो आहे.

**संतही माई संतही बाप ।**
**संत संगति मिलि तिरबो आप ॥**

आपला विलक्षण अनुभव सांगाताना नामदेवराय पुढे म्हणतात, संतांच्या मायेच्या सावलीत संतसंगती मिळवून मला प्रत्यक्ष गोविंदाची प्राप्ती झाली.

**संतकी छाया संतकी माया ।**
**संत संगति मिलि गोविंद पाया ॥**

असा संतसंगतीचा अपरंपार महिमा आहे. त्याकरिता संत नामदेवराय म्हणतात, मी दुष्टांच्या संगतीत कदापि जाणार नाही. संतसंगती सामावून राहीन.

**असंत संगति नामा कबहू न जाई ।**
**संत संगति मैं रह्यौ समाई ॥**

खरोखरीच संत भाग्य, संतसंगती, संतसहवास मोठा अलौकिक आहे.

**नामा म्हणे संत भाग्य अलौकिक ।**
**शुद्ध निष्कलंक पुण्यरूप ॥**

✿ ✿ ✿

# सत्संग

**गोंदवलेकर महाराज**

## सत्संगाचे महत्त्व

आयुष्यात संगतीला फार मोठे महत्त्व असते. संगतीचा परिणाम विनासायास आणि बराचसा न कळत होत असतो. संतसंगति लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्वपुण्याईमुळेच लाभते. ज्याच्याशी आपण संगत करावी, त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात हें आपण पाहतो. समजा, काही लोकांनी इथे यायचे ठरविले. एकाने विचार केला की आपण पायीच जाऊ, दुसरा बैलगाडीने निघाला, तिसऱ्याने आगगाडीने प्रवास केला, तर चौथा मोटाराने आला, सर्वजण जर एकाच ठिकाणाहून निघाले तर साहजिकच मोटारीने येणारा सर्वात लवकर पोहोचेल; म्हणजे ज्याच्याशी संगत केली त्या वाहनाचे गुणधर्म त्याला विनासायास लाभले. संगतीची दुसरी गंमत म्हणजे अशी की ज्याच्या संगतीत आपण जातो. त्याच्यापुढे आपले कर्तृत्व लोप पावते. इथून पुष्कळ मुले शिक्षण घेऊन पुढे कुणी वकील झाले, तर कुणी डॉक्टर झाले. परत येथे आल्यावर त्यांनी इथल्या मुलींशी लग्ने केली. त्या मुली फारशा शिकलेल्या नसतील; परंतु वकिलाशी लग्न केलेली वकिलीणबाई, डॉक्टरशी लग्न केलेली डॉक्टरीण झाल्या. असे जर देहाच्या संगतीने सामान्य माणसाचेही गुणधर्म आपल्यात येतात, तर सत्संगतीचा परिणाम किती होत असला पाहिजे ! आपण तिकीट काढून गाडीत बसतो. आपल्या शेजारी कोण येऊन बसेल ते आपल्या हाती नसते. तो विडी ओढणारा असला आणि आपल्याला धूर सहन होत नसला तरी नाईलाजाने तिथेच बसावे लागते. व्यसनी किंवा विषयी माणसाची संगत अशी तापदायक, घातक असते. उलट, सत्पुरुषाची संगत ही उत्तम लाभदायी ठरते. सत्संगतीपासून सद्वासना आणि सद्विचार प्राप्त होतात.

एखादा साधु बैरागी असेल, झाडाखाली बसला असेल. तो स्वत: उपाशी असेल तर त्याच्याकडे येणारी मंडळीही उपाशी राहतील. समर्थांच्याकडे कुणी गेला तर ते म्हणतील, 'मी भिक्षेची झोळी घेतो, तुही घे; दोघेही भिक्षा मागून आणू आणि जे मिळेल ते शिजवून खाऊ,' पण संत गृस्थाश्रमी असेल तर आपल्याकडे येणारा तो वाटेल ते करून खायला घालील. अन्नानुसार वासना बनते. म्हणून संताघरचे अन्न मागून घेऊन खावे. संतांची देहाने संगति लाभणे सुलभ नाही. तो रहात असेल तिथून आपण लांब रहात असू; आणि जवळ राहत असलो तरी प्रपंच - कामधंद्यामुळे चोवीस तासांत त्याच्या सान्निध्यात कितीसे राहता येणार? मग देहसंगतीचा लाभ कितीसा मिळेल? तेव्हा नामाची संगत हीच सर्वांना सदासर्वकाळ लाभण्यासारखी उत्तम सत्संगत होय.

✿ ✿ ✿



# सदा संगती सज्जनांची धरावी ।

– समर्थ रामदास

## पद्माकर बोंडाळे

**संतांना समर्थ रामदासांनी 'आनंदाचे स्थळ', 'सुखचि केवळ' 'विवेकाचे भांडार' आदी विशेषणांनी गुणवर्णीत केले असून संसाराची अंतिम फलश्रुती सुख 'असल्याने ते संतांच्याच सहवासात निश्चितपणे लाभू शकते. असा त्यांचा विचार आहे. या विचाराला अनुलक्षूनच समर्थ म्हणतात – सदा संगती सज्जनांची धरावी !**

**युनायटेड वेस्टर्न बँकेचे एक शाखाधिकारी श्री पद्माकर बोंडाळे यांनी समर्थ साहित्याचा धांडोळा घेऊन संतसंग महती सांगणाऱ्या श्लोकांचे केलेले संकलन व निरुपण –**

**सत्संगता भवति हि**
**साधुता खलानां**
**न हि खलसंगमात् खलत्वम्**
**आमोदं धरति मृदेव पुष्पंज हि**
**न तु कुसुमानि धारयंति**

सत्संग म्हणजेच संतसंग, संताचा सहवास होय. सत्संगाने दुष्टांचे दुष्टत्व नष्ट होते व त्यांच्यात सुष्टत्व येते. ''**पुष्पासंगे मातीस वास लागे** '' असे म्हणतात ते अगदी खरे आहे.

प्रपंचात आणि परमार्थात दोन्हीकडे सत्संगाशिवाय यश नाही हे सत्य अनेक संतांनी विविध प्रकारांनी समजावून दिलेले आहे.

समर्थ रामदासांनी ''संत संगावर'' आपल्या मनोबोधात आणि दासबोधात विशेषकरून लिहिले, आहे. प्रस्तुत लेखात समर्थ रामदासांनी वर्णिलेली संतसंग महती आपण अभ्यासणार आहोत.

**देहेबुद्धिचा निश्चयो दृढ झाला**
**देहातीत ते हीत सांडीत गेला ।**
**देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी**
**सदा संगती सज्जनांची धरावी ॥१६३॥**

समर्थ रामदास पारमार्थिक संत होते. देहबुद्धि म्हणजे 'मी देह आहे' या भावनेमुळे मनुष्य अहंकाराच्या भोवऱ्यात सापडतो. अहंकारामुळे जे अनर्थ ओढावतात त्याची अनेक उदाहरणे. रामायण-महाभारतात सापडतात –त्याचबरोबर दैनंदिन जीवनातही आपण याअहंकाराचे दुष्परिणाम भोगत असतो. 'मी आणि माझे' ही देहबुद्धिची वैशिष्ट्ये होत. आणि या देहबुद्धिनेच सर्वप्रकारची दुःखे मनुष्य भोगत असतो. पण हे मनुष्याला कळत नाही. या उलट 'मी आत्मा आहे'' ही भावना आत्मबुद्धि दृढ करणारी असून तेच शाश्वत सत्य होय. हे सत्य कळण्यासाठी या सत्याचा अनुभव घेतलेले संतच जवळ असणे किंवा आपण संतांच्या सहवासात रहाणे आवश्यक आहे. मनुष्य ज्या उत्कटतेने देहबुद्धि धारण करतो त्याच तीव्रतेने जर तो आत्मबुद्धि धारण करील तर तो 'महात्मा' होईल असे समर्थांचे म्हणणे आहे.





देहाच्या पलिकडे पहाण्याची दृष्टी संत देतात म्हणून समर्थ म्हणतात - 'सदा संगती सज्जनांची धरावी '

**मने कल्पिला विषयो सोडवावा**
**मने देव निर्गुण तो ओळखावा ।**
**मने कल्पिता कल्पना ते सरावी**
**सदा संगती सज्जनांची धरावी ॥** मनो-१६४

हे जग कल्पनेचे आहे. स्मरणशक्ती अनुकरण शक्ती, विचारशक्ती, क्रियाशक्ती इ. शक्ती बरोबरच मनुष्याला कल्पना शक्ती असते. सामान्य माणूस चांगल्या वाईट गोष्टींबद्दल जेव्हा विचार करतो तेव्हा त्यात विविधता आढळते. तसेच काही गोष्टी तो गृहीत धरतो. कल्पना करतो आणि मग त्या आधारे निष्कर्ष काढतो. कृती करतो. या प्रक्रियेमुळे अनेकदा विकृती निर्माण होतात. माणूस सत्य शोधू जातो पण सत्य गवसत नाही. वस्तुस्थिती ओळखण्यास तो असमर्थ होतो. कारण त्याच्या मनात जे कल्पनेचे भूत स्वार झालेले असते त्यामुळे देहबुद्धिचा पगडा त्याच्यावर बसून माणूस विवेक हरवून बसतो. स्वाभाविकच जाणीव आंधळी होते. म्हणून समर्थ सांगतात आपले आपले मन जे कल्पील, तो विषय नीट पारखून सोडावा. इंद्रिये ही देहबुद्धिमुळे बाह्यांगाला भुलतात व सारासार विवेक गमावून जे अहितकारक आणि खरे नाही, त्यालाच सत्य समजतात. संतांच्या सहवासाने विवेक जागृत होतो. व या दृश्य पसाऱ्याच्या मागे निर्गुण-निराकार परमेश्वर आहे; सत्ता त्याची आहे याची खात्री पटते. जे साकार आहे जे मूर्त आहे, जे दृश्य आहे, जे भासते आहे, जे दिसते आहे - त्या सर्वांचे मागे सत्तामात्र असणारे जे तत्त्व तेच ईश्वर स्वरुप होय. पण हे सामान्य माणसाला समजण्यासाठी संतसहवास अत्यावश्यक आहे. कारण संतांचे अनुभव विश्व कल्पनातीत असते. देही असोनि विदेही अशी त्यांची स्थिती असते. ज्ञानी असल्याने केवळ परोपकरार्थ इदं शरीरम्'' असे त्यांचे वर्तन असते. आपल्याला लाभलेला आत्मानंद मुक्त हस्ताने उधळणारे महात्मे, त्यांच्या संपर्कात येणाऱ्या अनेकांना 'संत' करतात. ''आपणासारीखे करीती तात्काळ'' असे त्यांचे सामर्थ्य असते.




**देह्यादीक प्रपंच हा चिंतियेला परी अंतरी लोभ निश्चित ठेला ।**
**हरीचिंतने मुक्तिकांता वरावी सदासंगती सज्जनांची धरावी ॥ १६५**

माझा देह, माझा प्रपंच, माझी मालमत्ता, मी मोठा, हे मी केले, ते मी केले या सगळ्या ममत्वयुक्त विचाराने मनुष्याचे अहंकार लोभादी विकार बळावून मनुष्य अवाजवी लोभी बनतो; स्वार्थी बनतो. नित्यानित्य विवेक तो करू शकत नाही. या ममत्वामुळे मनुष्य आयुष्यभर दुःख भोगून अंती वासना राहिल्याने पुनर्जन्म घेतो. निवार्सन होणे म्हणजेच मुक्ति होय ! नि:संगता म्हणजे निर्वासनता ! अर्थात लोभाचे मूळ सुखाच्या कल्पनेत आहे. मनुष्याच्या सुखाच्या कल्पना देहबुद्धिवर आधारीत असतील तर लोभ वाढून अहित होते. पण हाच लोभ जर आत्मबुद्धिवर आधारीत सुखाच्या कल्पनेकडे वळवीला तर लोभाचे बंधन मारक होत नाही. म्हणजे, गाड्या घोडे, संपत्ती, नातलग यांच्या आकर्षणाऐवजी स्वार्थत्या निरपेक्ष प्रेम, दानशूरपणा, परोपकार अशा गोष्टींचे आकर्षण जर माणसात वाढत गेले तर या प्रकारचा लोभ निश्चितच हितकारक असतो.